होळी व रंगपंचमीच्या शुभेच्छा

# जनमाध्यम

Epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, मंगळवार ३ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० पृष्ठ १०






### सुट्टीची सूचना

मंगळवार ३ मार्च रोजी धुलीवंदनानिमित्त जनमाध्यम कार्यालयाला सुट्टी असल्यामुळे बुधवार ४ मार्च चा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

-व्यवस्थापक

## खामेनी यांच्या मृत्यूनंतर भारतात निदर्शने



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांच्या निधनानंतर जम्मू आणि काश्मीरमध्ये सलग दुस-या दिवशी निदर्शने सुरू झाली. श्रीनगरच्या बेमिना भागात सुरक्षा दलांनी निदर्शकांवर लाठीमार केला आणि अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. काही लोकांना ताब्यात घेण्यात आले. शोपियान, बारामुल्ला आणि बांदीपोरा येथे बाजारपेठा बंद ठेवण्यात आल्या. श्रीनगरमधील बेमिना परिसरात सुरक्षा कर्मचा-यांनी आंदोलकांवर अश्रु धुराचे गोळे फेकले आणि लाठीचार्ज केला. भारताव्यतिरिक्त पाकिस्तानातही खामेनेई यांच्या मृत्यूच्या विरोधात गोंधळ सुरू आहे. आज सकाळी पाकिस्तानव्याप्त जम्मू-काश्मीर मध्ये निदर्शने हिंसक झाली आहेत. गिलगिट-बाल्टिस्तानमध्ये आंदोलकांनी युनायटेड नेशन्सच्या कार्यालयांना आग लावली आहे, ज्यात गिलगिटमधील युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम (UNDP) च्या कार्यालयाचाही समावेश आहे. त्याचबरोबर, स्कर्दूमध्ये एसपी कार्यालय आणि अनेक सरकारी इमारतींनाही आग लावण्यात आली. आंदोलकांवर गोळीबार केल्यामुळे ७ आंदोलक ठार झाले, १२ हून अधिक जखमी आहेत. येथील रुग्णालयांमध्ये आणीबाणी घोषित करण्यात आली आहे. गिलगिट आणि स्कर्दूमध्ये सुरक्षा उच्च सतर्कतेवर आहे.

# खामेनेई यांच्या पत्नीचाही मृत्यू

### हल्ल्यात अर्ध कुटुंब ठार!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिका आणि इस्त्रायलने केलेल्या भीषण हवाई हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनेई यांच्यानंतर आता त्यांच्या पत्नी मंसूरेह खोजस्तेह बाघेरजादेह यांचाही मृत्यू झाला आहे. शनिवारी झालेल्या या हल्ल्यात त्या अत्यंत गंभीर जखमी झाल्या होत्या. इराणची सरकारी वृत्तवाहिनी 'प्रेस टीव्ही'ने सोमवारी त्यांच्या निधनाची पुष्टी करत त्या 'शहीद' झाल्याचे म्हटले आहे.



मन्सूरेह खोजस्तेह बागेरजादेह यांचा जन्म १९४७ साली मशहाद येथे एका पर्शियन धार्मिक कुटुंबात झाला. त्यांचे वडील मोहम्मद इस्माइल खोजस्तेह बागेरजादेह हे मशहादमधील एक प्रतिष्ठित व्यापारी होते. त्यांचे भाउ हसन खोजस्तेह बागेरजादेह हे इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण ब्राडकास्टिंग (सेदा-ओ-सिमा) चे उपसंचालक म्हणून काम करत होते. मन्सूरेह खोजस्तेह बागेरजादेह यांची पहिली भेट १९६४ मध्ये एका खाजगी समारंभात अयातुल्ला अली खामेनी यांच्याशी झाली.यानंतर, १९६५ मध्ये त्यांचे अयातुल्ला खामेनेई यांच्याशी लग्न झाले. त्यांना मुस्तफा, मोजतबा, मसूद, मेसम हे चार मुलगे आणि बोशरा व हुदा या दोन मुली आहेत. मोजतबा यांच्याकडे खामेनेई यांचा उत्तराधिकारी म्हणून बघितले जात होते. मात्र सध्या अलीरेजा अराफी यांची लीडरशिप कौन्सिलमध्ये नियुक्ती (पान २ वर)

### इराण-इस्त्रायल युद्ध, जेद्दाहहून भारतासाठी 10 स्पेशल फ्लाइट्स

# ओमानमध्ये भारतीयाचा मृत्यू पाक संसदेत खामेनींना श्रद्धांजली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इस्त्रायल-इराण युद्धादरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बहरीनचे राजा आणि सौदी अरेबियाचे क्राउन प्रिन्स यांच्याशी फोनवरून चर्चा केली. पंतप्रधानांनी दोन्ही देशांच्या नेत्यांसोबत भारतीय समुदायाच्या सुरक्षेबाबत चर्चा केली. भारताने बहरीनमध्ये व्हिसा आणि पासपोर्ट सेवा देखील निलंबित केल्या आहेत. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि पाकिस्तानी संसदेच्या इतर सदस्यांनी अली खामेनी यांना श्रद्धांजली वाहिली. दरम्यान, सोमवारी ओमानच्या आखातात एका तेल टँकरवर बॉम्बने भरलेल्या ड्रोन हल्ल्यात एका भारतीय खलाशीचा मृत्यू झाला.

यापूर्वी, दिल्लीत कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्याशी भेट घेतल्यानंतर, पंतप्रधान मोदी म्हणाले, पश्चिम आशियातील परिस्थिती चिंताजनक आहे. भारत आपल्या नागरिकांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी सर्व देशांसोबत काम करेल.दरम्यान, सोमवारी ओमानच्या आखातातील एका तेल टँकरवर बॉम्बने भरलेल्या ड्रोन बोटीने हल्ला केला, ज्यामध्ये एक भारतीय खलाशी ठार झाला. मध्य पूर्वेतील सध्याच्या



परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, अबू धाबीमधील BAPS हिंदू मंदिर ९ मार्चपर्यंत पर्यटकांसाठी बंद करण्यात आले आहे. इकडे, जम्मू-काश्मीरमध्ये सलग दुस-या दिवशी इराणचे सर्वोच्च नेते खामेनेई यांच्या मृत्यूवर निषेध निदर्शने सुरू आहेत. श्रीनगरमधील बेमिना परिसरात सुरक्षा दलांनी निदर्शकांवर लाठीमार केला आणि अश्रु धुराचाही वापर केला. काही लोकांना ताब्यात घेण्यात आले. शोपियान, बारामुल्ला, बांदीपोरा येथे लोकांनी बाजारपेठा बंद ठेवल्या आहेत. रविवारी पाकिस्तानच्या कराची येथील अमेरिकन वाणिज्य दूतावासात खामेनेई यांच्या मृत्यूच्या निषेधार्थ गोंधळ झाला होता. घुसखोरी करणा-या आंदोलकांवर दूतावासाच्या आतून गोळ्या झाडण्यात आल्या होत्या. आतापर्यंत २३ लोकांचा मृत्यू झाला आहे. १० हून अधिक जखमी आहेत. हा गोंधळ इमामिया विद्यार्थी संघटनेने केला होता.

**इराणमध्ये १० हजार भारतीय-** इराणमध्ये सुमारे १० हजार भारतीय नागरिक राहतात, शिक्षण घेतात आणि काम करतात. तर ४०,००० हून अधिक इस्त्रायलमध्ये राहतात. आखाती आणि पश्चिम आशियामध्ये सुमारे ९० लाख भारतीय आहेत.

## अफगाणचा पाकच्या नूर खान एअरबेसवर हल्ला

**लाहोर :** अफगाणिस्तान आणि पाकिस्तानच्या सीमेवर गेल्या चार दिवसांपासून हवाई हल्ले आणि



गोळीबार सुरू आहे. तालिबान सरकारने म्हटले आहे की त्यांनी रावळपिंडी येथील पाकिस्तानच्या अत्यंत संवेदनशील नूर खानवर हल्ला केला आहे.यासोबतच, तालिबानच्या एका मंत्र्याने दावा केला की त्यांचे सैनिक ड्युरंड रेषा ओलांडून पाकिस्तानच्या भूमीत घुसले आहेत. तालिबाननुसार, क्वेटा आणि खैबर पख्तूनख्वा येथील काही लष्करी तळांवरही हल्ले करण्यात आले आहेत. ही कारवाई पाकिस्तानने काबुल, बगराम आणि इतर भागांमध्ये केलेल्या हवाई हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून करण्यात आली. दुसरीकडे, पाकिस्तानने पलटवार करत मोठा दावा केला आहे. पाकिस्तानी सरकारच्या मते, आतापर्यंत ४०० हून अधिक अफगाण सैनिक मारले गेले आहेत आणि शेकडो जखमी झाले आहेत.

## 'हा तर फक्त ट्रेलर, खरी लाट अजून यायची आहे'

### ट्रम्प यांची पहिली प्रतिक्रिया

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्ध आता निर्णायक आणि अत्यंत विनाशकारी वळणावर पोहोचले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एका मुलाखतीत इराणवर सुरू असलेल्या हल्ल्यांबाबत खळबळजनक माहिती दिली. 'इराणवर आमचे भीषण आणि विनाशकारी हल्ले सुरू असून आम्ही त्यांना गुडघ्यावर आणले आहे, पण हा तर फक्त ट्रेलर आहे. यापेक्षा भीषण हल्ल्यांची मोठी लाट अजून येणे बाकी आहे,' अशा शब्दांत ट्रम्प यांनी इराणला संपूर्ण विनाशाचा इशारा दिला आहे.



**इराणमध्ये हाहाकार, ५५० हून अधिक मृत्यू-** अमेरिका आणि इस्त्रायलने केलेल्या संयुक्त हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी यांच्यासह अनेक बड्या लष्करी अधिका-यांचा खात्मा झाला आहे. स्थानिक माध्यमांच्या दाव्यानुसार, आतापर्यंत ५५० हून अधिक जणांचा मृत्यू झाला असून संपूर्ण इराणमध्ये विध्वंसाची स्थिती आहे. ट्रम्प यांनी स्पष्ट केले की, इराणची नौदलाची १० जहाजे आता समुद्राच्या तळाशी आहेत आणि त्यांची क्षेपणास्त्र यंत्रणा पूर्णपणे उद्धवस्त केली जात आहे. हल्ल्याचे समर्थन करताना ट्रम्प म्हणाले की, 'इराणचा बॅलिस्टिक मिसाईल्सचा कार्यक्रम अत्यंत वेगाने वाढत होता. त्यांच्याकडे युरोप आणि अमेरिकेच्या लष्करी तळांवर मारा करण्याची क्षमता होतीच, पण लवकरच ते आमच्या सुंदर अमेरिकेपर्यंत पोहोचणारी क्षेपणास्त्रे तयार करणार होते. ओबामा यांनी केलेल्या कमकुवत (पान २ वर)

## घरगुती सौर वीजनिर्मितीत प्रचंड बदल

**नागपूर :** घरगुती सौर ग्राहकांसाठी प्रति किलोवॉट दरमहा १५० युनिटपेक्षा जास्त वीज निर्मितीची नोंद केली जाणार नाही आणि १०० युनिटपेक्षा अधिक वीज ग्रीडला निर्यात झाल्यास ती ग्राह्य धरली जाणार नाही, असा निर्णय महावितरणने घेतला आहे. हा निर्णय बेकायदेशीर असल्याचा आक्षेप घेत सुधीर बुध्ये यांनी राज्य वीज नियामक आयोगाकडे महावितरणविरोधात याचिका दाखल केली आहे. महावितरणने हा निर्णय वीज नियामक आयोगाच्या आदेशानुसार घेतल्याचा दावा दिशाभूल करणारा असल्याचेही याचिकेत नमुद आहे. याचिकेनुसार, राज्य वीज नियामक आयोगाच्या कोणत्याही नियमांत प्रति किलोवॅट १५० युनिट निर्मिती किंवा १०० युनिट निर्यात अशी मर्यादा नाही. आयोगाच्या नियमानुसार, सौर प्रकल्पाची क्षमता ही ग्राहकाच्या मंजूर भारापर्यंत (पान २ वर)

### युद्धाचा परिणाम!

## सोने-चांदी महागले

***जळगाव / प्रतिनिधी-*** सोने-चांदी खरेदी करणा-यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. सोने-चांदीच्या दरात पुन्हा मोठी वाढ झाली आहे. जळगावच्या सराफा बाजारामध्ये सोने-चांदीला चांगलीच चकाकी आली आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या युद्धामुळे थेट परिणाम सोने आणि चांदीच्या दरावर झाल्याचे पाहायला मिळत आहे. जळगावच्या सुवर्णनगरीमध्ये गेल्या २४ तासांमध्ये सोन्याच्या दरामध्ये ११,००० रुपयांची वाढ झाली तर चांदीच्या दरामध्ये २५,००० रुपयांनी वाढ झाली आहे. त्यामुळे सोने-चांदी खरेदी करताना ग्राहकांच्या खिशाला कात्री लागणार आहे.२०२६ या वर्षाच्या सुरुवातीलाच सोने आणि चांदीने उच्चांक गाठल्याचे ग्राहकांनी अनुभवले. त्यानंतर सोने आणि चांदीच्या दरात घसरण झाली आणि ग्राहकांना कुठेतरी दिलासा मिळाला होता पण त्यानंतर अमेरिका- इस्त्रायलने संयुक्तरीत्या इराणवर हल्ले केले. या देशांमध्ये युद्ध सुरू झाले आहे. या युद्धाचा मोठा परिणाम सोने-चांदीच्या दरांवर झाला आहे. जळगावच्या सुवर्णनगरीमध्ये गेल्या २४ तासांमध्ये सोन्याच्या दरात ११००० रुपयांनी आणि चांदीच्या दरामध्ये २५,००० रुपयांनी वाढ झाली आहे. अचानक सोने-चांदीच्या दरामध्ये वाढ झाल्यामुळे ग्राहकांमध्ये नाराजी आहे. सोने-चांदीच्या वाढत्या दरांमुळे ग्राहकांमध्ये चिंता वाढली आहे. लग्नसराईदरम्यान सोने-चांदीचे दर वाढत असल्यामुळे ते खरेदी करताना ग्राहकांच्या खिशावर ताण येणार आहे. २ मार्च रोजी २४ कॅरेटच्या १ तोळा सोन्याचा दर जीएसटीसह १ लाख ७५ हजारांहून अधिक झाला आहे. तर चांदीचा दर जीएसटीसह ३ लाख ३ हजार रुपये इतका झाला आहे.



## व्हीएसआर कंपनीच्या मालकाची पायलटच्या सीटवर डुलकी

### जय पवार यांनी केला व्हीडीओ शेअर

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या विमानाला २८ जानेवारी २०२६ रोजी अपघात झाला. या भीषण अपघातात अजित पवारांसह ५ जणांचा मृत्यू झाला. अजित पवारांच्या निधनानंतर आता या अपघाताभोवतीचे गूढ अधिक गडद झाले आहे. अजित पवारांच्या निधनाला एक महिना उलटल्यानंतर आता त्यांचे पुत्र जय पवार यांनी एक धक्कादायक पोस्ट शेअर केली आहे. त्यांच्या या पोस्टने सध्या महाराष्ट्रात खळबळ उडाल्याचे पाहायला मिळत आहे.

जय पवार यांनी नुकतीच त्यांच्या अधिकृत इन्स्टाग्रामवरून एक पोस्ट शेअर केली आहे. यात त्यांनी ज्या व्हीएसआर कंपनीच्या विमानात अजित पवार यांचा अन्त झाला, त्या कंपनीच्या मालकावर गंभीर आरोप केले आहेत. जय पवार यांनी शेअर केलेल्या व्हीडीओमध्ये, व्हीएसआर कंपनीचा मालक रोहित सिंह हा मुख्य पायलटच्या सीटवर बसलेला दिसत आहे. धक्कादायक बाब म्हणजे विमान आकाशात असताना रोहित सिंह चक्क झोपलेला आहे. या गंभीर निष्काळजीपणावर जय पवार यांनी संताप व्यक्त केला आहे.



जय पवार यांनी हा व्हीडीओ पोस्ट करत तीन प्रमुख मागण्या केल्या आहेत. माझ्या वडिलांना आपण गमावले ही वेदना आयुष्यभर साथ देणार आहे. या व्हीडीओमध्ये व्हीएसआरचे मालक रोहित सिंह मुख्य पायलटच्या सीटवर उड्डाणादरम्यान झोपलेले दिसत आहेत. आकाशात असताना असा निष्काळजीपणा असू शकत नाही. हे अत्यंत गंभीर आणि धक्कादायक आहे. मी डीजीसीएला ठामपणे मागणी करतो. या प्रकरणात तात्काळ कठोर कारवाई व्हावी. संपूर्ण चौकशी (पान २ वर)









## दारू गोळा कंपन्यांबाबत कायद्यात बदलाचा अहवाल केंद्राकडे पाठवणार -मुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यात राउळगाव येथील एसबीएल एनर्जी लिमिटेड कंपनीत आता झालेला स्फोट तसेच मागील काळात घडलेल्या घटना बघता संपूर्ण प्रक्रियेकडे पुनरावलोकन करून बघण्याची गरज आहे. दारु गोळा कंपन्यांबाबत जे कायदे आहेत, ते केंद्र सरकारच्याअंतर्गत येते. राज्याच्या वतीने या कायद्यात काय बदल केला पाहिजे, प्रक्रियेत काय बदल केले पाहिजे याबाबत अभ्यासपूर्ण अहवाल तयार करून केंद्र सरकारकडे पाठविण्यात येईल. आताच्या प्रक्रियेत बदल घडवण्याचा प्रयत्न राज्य सरकारकडून केला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी नागपुरात प्रसारमाध्यमासोबत बोलताना सांगितले.

काटोल तालुक्यातील राउळगाव येथे रविवारी सकाळी एसबीएल एनर्जी लिमिटेड या बारूद आणि डेटोनेटर (विस्फोटक साहित्य) तयार करणा-या कंपनीच्या डिटोनेटर पॅकिंग युनिटमध्ये भीषण स्फोट झाला. यात १९ जणांचा मृत्यू झाला. १७ जखमींवर उपचार सुरू असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी त्यांच्या उपचाराबाबत ऑरेंज सिटी हास्पिटलमध्ये जाउन पाहणी केली. त्यानंतर ते प्रसारमाध्यमासोबत बोलत होते.

जखमींची प्रकृती गंभीरच आहे. ऑरेंज सिटी हास्पिटल व्यवस्थापनाने शर्थीचे प्रयत्न करून उत्तम उपचार दिले आहे. ड?क्टरांनी दिलेल्या माहितीनुसार पुढील बराच गंभीर जखमी कामगारांवर उपचार करावे लागणार आहे. अशा प्रकरणात तीन आठवड्यानंतरही संसर्ग किंवा अडचणी निर्माण होउ शकतात. सर्वोत्तम उपचार देण्याचा प्रयत्न सुरू आहे. या प्रकरणात पोलिसांनी २१ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.



व्यवस्थापकीय संचालकासह ११ जणांना अटक केली आहे. काही लोक फरार आहेत, त्यांचा शोध घेण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.कंपनीच्या वतीने मृतकांच्या कुटुंबीयांना ७५ लाख रुपये दिले आहे. मुख्यमंत्री निधीतून ५ लाख व पंतप्रधान निधीतून २ लाख रुपये दिलेले आहेत. जखमीसाठी कंपनीने २५ लाख रुपये दिले आहे. परंतु आता तसेच मागील काळात घडलेल्या घटना बघता संपूर्ण प्रक्रियेकडे पुनरावलोकन करून बघण्याची गरज आहे. या कंपन्यांमध्ये तीव्र ज्वलनशील रसायन आहेत. एखादा रसायन भरलेला डबा खाली पडला तरी स्फोट होउ शकतो. त्यामुळे यातील काही बाबी मनुष्यरहित करता येतील का, या दृष्टीने लक्ष दिले गेले पाहिजे. काही ठिकाणी कामगार आवश्यक (पान २ वर)




# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, ३ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## प्रशिक्षित स्वयंसेवक हीच प्रशासनाची खरी ताकद - जिल्हाधिकारी

### आपदा मित्र व आपदा सखी यांना आपदा किटचे वितरण





**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

**आपत्तीच्या प्रसंगी स्थानिक पातळीवर प्रशिक्षित स्वयंसेवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. आपदा मित्र व आपदा सखी यांनी आपले प्रशिक्षण समाजहितासाठी वापरून संकटसमयी तत्परतेने मदतकार्य करावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.**

मंगरूळपीर तालुक्यातील तऱ्हाळा येथे आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या आपदा मित्र व आपदा सखी यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते आपदा किटचे वितरण करण्यात आले. ፘ

आपत्तीच्या काळात तात्काळ व प्रभावी मदतकार्य करण्यासाठी स्वयंसेवक सक्षम व्हावेत, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी उपविभागीय अधिकारी रवी काळे, पोलीस निरीक्षक किशोर शेळके, वनपरिक्षेत्र अधिकारी अमित शिंदे, जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत, नायब तहसीलदार रवींद्र राठोड तसेच दिपक बडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमादरम्यान 'श्रीमती पंचफुलाबाई देशमुख स्वतंत्र सैनिक एमपीएससी-यूपीएससी अभ्यासिका'चे उद्घाटनही जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी दर्जेदार व शांत अभ्यासाचे वातावरण उपलब्ध होणे ही काळाची गरज आहे; ही अभ्यासिका त्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल.

एमपीएससी-यूपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांसाठी सातत्य, शिस्त आणि योग्य साधनसामग्री आवश्यक असते; या अभ्यासिकेमुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा आणि आवश्यक सुविधा एकाच ठिकाणी मिळतील.असे प्रतिपादन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमास स्वामी विवेकानंद आपत्ती व्यवस्थापन पदकाचे सदस्य, तऱ्हाळा व पांगरी महादेव येथील नागरिकांसह विविध मान्यवर उपस्थित होते.

## स्मशान होलीकोत्सवात केली व्यसनाची होळी, स्मशानभूमिची साफसफाई



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

सामाजीक कार्यात अग्रेसर असलेल्या संकल्प मल्टीपर्पज फाऊंडेशनच्या वतीने २ मार्च रोजी दरवर्षीप्रमाणे यावर्षीही होळी सणाच्या पार्श्वभूमिवर मोक्षधाम स्मशानभूमिमध्ये स्मशान होलीकोत्सव कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या आधी तब्बल दोन तास अथकपणे स्वच्छता अभियान राबवून स्मशानभूमिचा परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर स्मशान होलीकोत्सवात व्यसनाची होळी करण्यात आली. संकल्प फाऊंडेशनच्या वतीने गेल्या २० वर्षापासून हा उपक्रम अव्याहत व यशस्वीपणे सुरु आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून व्यसनमुक्ती व स्वच्छतेचा संदेश देण्यात येत आहे.

या कार्यक्रमात प्रारंभी स्मशानभूमिचा संपूर्ण परिसर खराट्याने झाडून स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर गुटखा, विडी, सिगारेट, तंबाखु, दारु, गांजरगवत, प्लॉस्टीक पन्या आदींची होळी पेटविण्यात आली. या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे हे वीसावे वर्ष होते. उपक्रमाचे मुख्य आयोजन संकल्प मल्टीपर्पज फाऊंडेशनचे अध्यक्ष सुशील भिमजीयाणी यांनी केले होते. या उपक्रमात ॲड. सुरेश टेकाळे, राजु धोंगडे, आशिष इंगोले, रवि गुप्ता, विशाल पट्टेबहादुर, हर्षवर्धन टेकाळे, रवि हजारे, विष्णू इंगळे, नवनिर्माण महिला बहूउद्देशिय संस्थेच्या अध्यक्षा सौ. वृषाली टेकाळे, दत्तगुरु बहूउद्देशिय संस्थेच्या अध्यक्षा रुपाली देशमुख, दिव्यश्री टेकाळे, पत्रकार मनोज जैस्वाल, शंकरराव देशमुख, गणेश डुबे, बंडु गव्हाणे, सखाराम भडके, प्रविण इंगोले, प्रदीप पट्टेबहादुर, भगवान वाकुडकर यांच्यासह तरुण मंडळींनी या समाजसेवी उपक्रमात सहभाग घेवून यशस्वीरित्या पार पाडला.

## मालेगाव - मेहकर रस्ता जीवघेणा

### अतिवृष्टीमुळे चाळण, वाहनचालक त्रस्त



**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

मालेगाव ते मेहकर या अत्यंत महत्त्वाच्या व रहदारीच्या रस्त्याची यंदाच्या अतिवृष्टीने अक्षरशः चाळण झाली आहे. ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी धोकादायक ठरत असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी खचलेले भाग, मधोमध उंचवटे आणि खोल खड्डे यामुळे दुचाकीस्वारांचे हाल अधिक होत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी खड्डे नजरेस न पडल्याने अपघातांची मालिका सुरू आहे. खड्डे चुकविण्याच्या प्रयत्नात अनेकदा वाहनचालकांचे नियंत्रण सुटून किरकोळ ते गंभीर अपघात घडत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली. काही वाहनचालक रस्त्याच्या कडेला तुलनेने सपाट भागावरून जाण्याचा प्रयत्न करतात; मात्र तिथेही छोटे-मोठे खड्डे असल्याने धोका टळत नाही. या मार्गावरील पांगरी कुटे, मुंगळा फाटा, डोंगरकिन्ही, धार पिंपरी, चांडस, कळमगव्हाण, केनवड, कुकसा, पिंपरी सरहद्द या गावांतील नागरिकांनी अनेक दिवसांपासून दुरुस्तीची मागणी लावून धरली आहे. दोन महिन्यांपूर्वी काही ठिकाणी डागडुजी करण्यात आली होती; परंतु अल्पावधीतच त्या ठिकाणांची पुन्हा दयनीय अवस्था झाली आहे. संपूर्ण रस्त्याची मजबुतीकरणासह नव्याने दुरुस्ती करणे अत्यावश्यक असल्याची मागणी वाहनचालक व ग्रामस्थांकडून होत आहे. संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अन्यथा मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## नशा सोडा, शरीर घडवा!

**■ प्रतिनिधी | रिसोड ■**

आजची तरुणाई ही देशाचे भविष्य आहे, पण हेच भविष्य जर व्यसनांच्या विळख्यात अडकले तर प्रगतीचा मार्ग खुंटेल.जिममध्ये येऊन घाम गाळणे सोपे आहे,पण बाहेर पडल्यावर व्यसनांना 'नाही' म्हणणे हीच खरी ताकद आहे,' असे रोखठोक प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते आणि संस्थेचे सक्रिय सदस्य जियाउर खान यांनी केले.

रिसोड शहरातील नामांकित " हेल्थ क्लब येथे आयोजित विशेष मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष प्रदिप खंडारे यांच्यासह शहरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक आणि शेकडो व्यायामप्रेमी युवक उपस्थित होते.

## पोलीस अधीक्षक कार्यालयातून सेवा पुस्तिकेची चोरी !

### गुन्हा दाखल करण्याची सेवानिवृत्त ए.एस.आय मोरे यांची मागणी

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

सध्या मालेगाव येथील अडोळ कॉलनीतील रहिवासी असलेले तेजराव आनंदराव मोरे यांनी पोलीस विभागात दीर्घकाळ सेवा देऊन रिसोड पोलीस स्टेशन येथून ए.एस.आय पदावरून सेवानिवृत्त झाल्यानंतर पोलीस अधीक्षक कार्यालयातच मुळ सेवापट जमा असल्याने त्यांनी पेंशनसाठी 'कार्यालयाने तुमचा पेंशन प्रस्ताव संबंधित कार्यालयात पाठवला आहे असे सांगितले.परंतु पोलीस अधीक्षक कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांनी मोरे यांचे सेवापट चोरी केल्याची तक्रार तेजराव मोरे यांनी ता. २० फेब्रुवारी रोजी वाशीम शहर पोलीस स्टेशनला देवून संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

तेजराव आनंदराव मोरे यांनी दिलेल्या तक्रारीत नमुद केले आहे की, मी महाराष्ट्र पोलीस विभागात अमरावती परिक्षेत्र मधील अकोला येथे १९८२ रोजी पोलीस भरती झालो होतो. अकोला येथे नोकरी करुन सन १९९३ साली कारंजा पोलीस स्टेशन व वाशीम जिल्हा निर्मीती झाली तेंव्हापासून वाशीम जिल्ह्यात सेवा करुन रिसोड पोलीस स्टेशन येथून ए.एस.आय. पदावरून सेवानिवृत्त झालो. त्या काळात आस्थापन शाखेत सेवानिवृत्ताचे कामकाज बघणारे कारकून यांनी २०१८ मध्ये मला बोलावून माझे मुळ सेवापट महालेखापाल कार्यालयात नागपूर येथे एकूण २८ कर्मचाऱ्यांची सेवापट पाठविण्यात आले आहेत असे सांगितले महालेखापाल कार्यालयात माझे सेवापट प्राप्त झाल्याबाबत स्वाक्षरी आहे.त्यानंतर सेवा पटाची पडताळणी होवुन एकूण २८ सेवापट पैकी २६ सेवापट ए.जी कार्यालयातून वाशिम कार्यालयात प्राप्त झाल्याचे.कार्यालयातील बाबू यांनी मला बोलावुन सांगितले.सेवापट पाठविल्याच्या ओ.सी. मध्ये माझ्या नांवाची नोंद नसून मला माझे दुय्यम मुळ सेवापट परत केले नाही.माझे सेवापट मला परत करण्याची मागणी वारंवार करूनही ते मला दिले नाही.याचा अर्थ माझ्या सेवापटाची चोरी करून मला त्रास दिला आहे.पेंशनबाबत वेळोवेळी विचारले असता नंतर माझे सेवापट अमरावती येथून एस. पी. कार्यालयात पाठविण्यात आल्याचे सांगितले.

माझे सेवापट चोरीला गेल्यावर सेवासीट नसताना कार्यालयातील बांबूनी मला तात्पुरते पेंशन लागू केले. याबाबत सेवाशिट बाबत वारंवार विचारणा केली. परंतु कोणतेच उत्तर मिळाले नाही.

सेवापट मिळावे म्हणून मी आत्मदहनाचा इशारा दिल्यावर मला अंदाजे पेंशन लागू केले आहे. परंतु, माझ्या सोबतच्या ए.एस.आय पेंशनधारकांना माझ्यापेक्षा ३५०० रुपयाने जास्तीचे पेंशन आहे.त्यामुळे माझे फार मोठे आर्थिक नुकसान होत आहे. माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती सुद्धा दिली नाही.तसेच सर्व्हिस सिट नसताना मला पेंशन कोणत्या आधारे लागु केले ? असे अनेक वेळा मोरे यांनी कार्यालयात विचारले असता कार्यालयातून माहिती दिली नाही.मागिल सात वर्षांपासून तेजराव मोरे सर्व्हिस सिटची मागणी करीत आहेत.

अखेर कंटाळून तेजराव मोरे यांनी वाशीम शहर पोलीस स्टेशनला ता. २० रोजी लेखी तक्रार दाखल करून संबंधित आधिकारी व कर्मचारी यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. तेजराव मोरे यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद केले की, कार्यालय प्रमुखांनी फाईलचा आढळ होत नाही, मिळून येत नाही अशी उत्तरे देता येणार नाही. ?

## विद्याभारती शाळेत पर्यावरणपूरक होळी उत्साहात साजरी



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

होळी हा सण आनंद, सकारात्मकता व सामाजिक एकतेचा संदेश देतो – सुमीत सुरेशराव मिटकरी वाशीम होळी हा भारतीय संस्कृतीतील अत्यंत आनंदाचा, उत्साहाचा आणि सकारात्मकतेचा सण आहे. हा सण केवळ रंगांचा उत्सव नसून प्रेम, बंधुत्व, स्नेह तसेच चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे. याच संदेशाला अनुसरून विद्याभारती प्राथमिक शाळा, विनायक नगर येथे यंदा पर्यावरणपूरक होळी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक नितेश मिटकरी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे संचालक सुमीत सुरेशराव मिटकरी व पर्यवेक्षक विजय गोटे उपस्थित होते. पारंपरिक पद्धतीने होलिका दहन करून वाईट विचार, प्रवृत्ती व व्यसनांचे दहन करण्याचा संदेश देण्यात आला.

यावेळी बोलताना सुमीत सुरेशराव मिटकरी म्हणाले, 'होळी हा केवळ बाह्य रंगांचा सण नसून मनातील द्वेष, राग व कटुता दूर करून प्रेम, आपुलकी व बंधुत्व वाढविण्याचा सण आहे. प्रल्हाद–हिरण्यकश्यपू यांच्या पौराणिक कथेतून सत्याचा विजय व अहंकाराचा नाश होतो, हा संदेश मिळतो. शाळा हे केवळ शिक्षणाचेच नव्हे, तर संस्कारांचे केंद्र असल्याने अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये मूल्यसंस्कार रुजवणे अत्यंत आवश्यक आहे.'

यंदाच्या होळी उत्सवाला विशेष रंगत आली ती बंजारा समाजातील बांधवांच्या सहभागामुळे. त्यांनी पारंपरिक गीते, ढोल-ताशांच्या गजरात नृत्य सादर करून विद्यार्थ्यांना आपल्या समृद्ध संस्कृतीची ओळख करून दिली. त्यामुळे कार्यक्रमाचा उत्साह द्विगुणित झाला.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शाळेमध्ये होळीपूर्वी शेणापासून चाकोल्या तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध आकारांच्या चाकोल्या बनवून त्यापासून तयार केलेल्या माळा होळीला अर्पण केल्या. तसेच परिसरातील कचरा, पालापाचोळा व वाळलेल्या झाडांच्या फांद्या गोळा करून परिसर स्वच्छ करण्यात आला.

## रमजानमध्ये वार्ड क्र. ४ ला २४ तास पाणीपुरवठा

### स्वखर्चातून २ किमी पाईपलाईन, १६ नळ उभारणी

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

शहरात सध्या तीव्र पाणीटंचाईचे सावट असताना आणि शासनाच्या पाणीपुरवठा योजनेस होत असलेल्या विलंबाच्या पार्श्वभूमीवर वार्ड क्रमांक ४ मध्ये स्वखर्चातून २४ तास पिण्याच्या व वापराच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. रमजानच्या पवित्र महिन्यात हा उपक्रम पूर्ण झाल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे.

शेख हबीब भाई (वेल्डिंग वाले) यांच्या विहिरीतून सुमारे २ किलोमीटर लांबीची पाईपलाईन टाकण्यात आली. नगरसेविका मरियम बी साबिरशा व ताज ग्रुप यांच्या पुढाकाराने संपूर्ण वार्डमध्ये १६ नळ स्टॅन्ड उभारून पाण्याची सोय करण्यात आली. अवघ्या तीन दिवसांत काम पूर्ण करण्यात आले असल्याची माहिती संबंधितांनी दिली.



शहरात पाणीटंचाईमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत कोणतीही स्वार्थाची अपेक्षा न ठेवता केलेल्या या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत होत आहे. रमजान महिन्यातील सेवाभाव जपणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उदाहरण ठरत आहे.

या कार्यात रवि भूतड़ा, अयूब सर, गुलाब भाई, गणेश अहिर, अयूब शेख, संदीप भाऊ, ओम भाऊ, बालू सावंत, राजू गीत, गफ्फार शाह, विशाल सौभागे, रफीक चौधरी, शरीफ भाई, जमीर भाई (सरपंच), वसीम भाई, शेख अफरोज, शाहरुख शाह, शेख फिरोज (बबलू भाई), शाकिब शाह, अकरम सर, निलेश मानधने, अभिषेक देवकते, शेख आसिफ आदींचे सहकार्य लाभले. दरम्यान, शहरातील पाणीप्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी प्रशासनानेही तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## जागतिक महिला दिनानिमित्त स्वच्छता अभियान सप्ताह

**मानोरा :** तालुक्यातील भुली येथील ग्रामस्वच्छता महिला मंडळाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून १ ते ८ मार्च विविध ठिकाणची ग्रामसफाई करून ग्राम स्वच्छता अभियान राबवण्याचा संकल्प केला. त्या निमित्ताने दारव्हा तालुक्यातील मुंगसाजी महाराज संस्थान धामणगाव देव येथे शुभारंभ करण्यात आला .

भुली च्या पोलीस पाटील तथा ग्रामस्वच्छता महिला मंडळाचे अध्यक्ष छायाताई अरुणराव डहाके यांनी ग्राम स्वच्छता महिला मंडळनां सोबत सोबत घेऊन १ ते ८ च्या दरम्यान जागतिक महिला दिनानिमित्त स्वच्छता अभियान राबविण्याचा संकल्पन केला आहे , तिर्थक्षेत्र धामणगाव देव येथे दि १ मार्च रोजी सुरवात केली आहे तेथील यात्रे निमीत्ताने सर्वत्र झालेली गान स्वच्छ केली, सप्ताह दरम्यान दररोज भुली गावा सह विविध ठिकाणची ग्रामसफाई करून ८ मार्च रोजी वाशिम येथे जाऊन जिल्हा परिषद परिसराची स्वच्छता करण्याचा संकल्प छाया डाहाके यांनी केला आहे.

## त्या शिक्षकांच्या वेतन स्थितीचा आदेश मागे



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

जिल्ह्यातील कॉपीप्रकरणी नाहक दोषी ठरवून फेब्रुवारी महिन्याचे वेतन काढु नये असे आदेश माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी काढले होते. याप्रकरणी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, मुख्याध्यापक संघ, शिक्षकेतर संघाने शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर केलेल्या संयुक्त धरणे आंदोलनाला यश मिळाले असून शिक्षकांचे वेतन काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

उच्च माध्यमिक शालांत परीक्षेदरम्यान शिक्षणाधिकारी ससाने यांनी ९ शाळा, ५८७ विद्यार्थी व तब्बल ६० शिक्षकांवर कॉपी प्रकरणात सहभागी असल्याचे दोषारोपन करीत कारवाई केली होती, तसेच या प्रकरणातील शिक्षकांचे वेतन थांबविण्याचे आदेश शिक्षणाधिकारी यांनी दिले होते. याप्रकरणी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे विभागीय कार्यवाह बाळासाहेब गोटे, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष विनोद नरवाडे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाचे सदस्य विनायक उज्जैनकर, विमाशि संघाचे जिल्हाध्यक्ष रामेश्वर अवचार, जिल्हा कार्यवाह कुलदीप बदर, शिक्षकेतर संघाचे जिल्हाध्यक्ष कैलास ढवळे, कार्यवाह रामराव कायंदे यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन केले होते.

तसेच याप्रकरणी गंभीर दखल विमाशि संघाचे आमदार सुधाकर आडबाले यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना संपर्क साधून शिक्षकांवर कारवाई करण्याचे अधिकार तसेच वेतन थांबविण्याचे अधिकार शिक्षणाधिकारी यांना नाहीत, त्यामुळे याप्रकरणी तात्काळ वेतन काढण्याचे आदेश न दिल्यास सभागृहात अधिकार्यांना निलंबित करण्याची मागणी करण्यात येईल असा इशारा दिला.


### जाहीर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), बार्शिटाकळी, जि. अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५६/२०२६ — प्रोसेस नं.२०९/२०२६

चौ.ता. ०२/०४/२०२६ — दिनांक : २७/०२/२०२६

**अर्जदार :** १) सौ मनोरमा गोपाळराव निचळ अर्जदार रा. 'दत्तकृपा', हनुमान मंदिराजवळ, गणेश नगर, लहान उमरी, अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

**मयताचा पत्ता :-** मयत : सरस्वताबाई किसनराव कावरे

**पत्ता :-** रा. दोनद बु., ता. बार्शिटाकळी, जि. अकोला

या अर्धीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सरस्वताबाई किसनराव कावरे यांचे दिनांक १७/०४/२००९ रोजी दोनद बु., ता. बार्शिटाकळी. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकार हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क. स्तर), बार्शिटाकळी जि. अकोला

### जाहीर समन्स

**मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. ८४/२०२४ — जा. क्र. ८३४/२०२६

ने.ता. ०१/०४/२०२६ — दिनांक : ०२/०३/२०२६

**वादी :-** सन्मित्र अर्बन को-ऑप. बँक लि. अकोला

**विरुद्ध**

**प्रतिवादी :-** शिवाजी सुधाकर आमटे व इतर

प्रति,

प्रतिवादी क्र . ३ ) सुनील तुळशिदास बुलकळे रा. गायत्री नगर, कौलखेड, अकोला ता. जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. ३,१८, ७९१/- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवुनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दि. ०१ माहे एप्रिल, २०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजरराहण्याचे सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची / वादाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी.

आज दि. ०२ माहे मार्च, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये.

शिक्का

**(ए. डब्ल्यू. इंगळे )**
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

### जाहीर समन्स

**मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. २५५/२०२५ — जा. क्र. ८३१/२०२६

ने.ता. ३०/०३/२०२६ — दिनांक : २७/०२/२०२६

**वादी :-** भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या. अकोला शाखा - मुर्तिजापुर

**विरुद्ध**

**प्रतिवादी :-** सचिन सुभाष इंगळे व इतर

प्रति,

प्रतिवादी क्र. १ ) सचिन सुभाष इंगळे रा. सरोदे प्लॉट, भवानी नगर, मुर्तिजापुर ता. मुर्तिजापुर जि. अकोला क्र. ३ ) प्रशांत रामदास गढवाले रा. आझाद चौक, जुनी वस्ती, मुर्तिजापुर ता. मुर्तिजापुर जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. १,२५,५३२/- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवुनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दि. ३० माहे मार्च, २०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजर राहण्याचे सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे. उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची / वादाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी.

आज दि. २७ माहे फेब्रुवारी, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये.

शिक्का

**(ए. डब्ल्यू. इंगळे )**
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ९६ ■ मंगळवार ३ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु




## रेतीघाटावरील सिमावादातून रक्तरंजित शेवट

# भाजप शहर महामंत्री भारत नागपाल यांची हत्या

**वर्धा । हिंगणघाट । जनमाध्यम** होळीच्या रंगोत्सवाच्या उंबरठ्यावर जिल्ह्याच्या सीमेवरील नदीपात्र मात्र रक्ताने न्हाऊन निघाले. हिंगणघाट तालुका (जि. वर्धा) आणि वरोरा तालुका (जि. चंद्रपूर) यांच्या सीमेवरील बांबर्डा-ढिवरी पिपरी रेती घाटावर रविवारी (१ मार्च) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास सिमावादातून पेटलेल्या वादाने थेट हत्येचे रूप घेतले. पुलगाव येथील भाजपचे शहर महामंत्री भारत नागपाल (वय ३८) यांच्यावर तलवार, फर्सा व इतर धारदार शस्त्रांनी सपासप वार करून त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली. या हल्ल्यात तिघे जखमी झाले असून परिसरात संतापाची तीव्र लाट उसळली आहे.

### सिमारेषा, ठेका आणि कोट्यवधींचा व्यवहार

मिळालेल्या माहितीनुसार, बाबर्डा आणि ढिवरी-पिपरी हे दोन्ही रेती घाट नदीच्या मधोमध विभागले गेले असून, नदीच्या पात्रातूनच दोन्ही जिल्ह्यांची सीमा जाते. याच हद्दीवरून तसेच घाटाच्या ठेक्याशी संबंधित आर्थिक व्यवहारांवरून मागील काही दिवसांपासून दोन्ही गटांत तणाव वाढत होता. संबंधित व्यवहारात सुमारे एक कोटी रुपयांच्या देवान-घेवानची चर्चा स्थानिक पातळीवर होती. गतवर्षी बाबर्डा रेती घाटाचा ठेका भारत नागपाल व त्यांच्या सहकाऱ्यांकडे होता; यावर्षी तो प्रतिस्पर्धी गटाला मिळाल्यानंतर वाद चिघळल्याचे सांगितले जाते.

### पोकलँड आडवी, वाद थेट रक्तपातात

रविवारी सायंकाळी आरोपी गट घाटावर पोहोचताच पोकलँड मशीन रस्त्यात आडवी उभी करून नागपाल यांच्या वाहनांचा मार्ग अडविल्याचा आरोप आहे. काही क्षणांतच शाब्दिक चकमक हाणामारीत बदलली. त्यानंतर तलवार, फर्सा आणि इतर धारदार शस्त्रांनी नागपाल व त्यांच्या सहकाऱ्यांवर हल्ला चढविण्यात आला. नागपाल यांच्यावर वारांचा मारा करण्यात आला. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना नदीच्या पाण्यात ढकलण्यात आल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली.

### रुग्णालयात मृत घोषित; तिघे जखमी

घटनेनंतर नागपाल यांना तातडीने बाहेर काढून हिंगणघाट येथील उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. झटापटीत पंकज वानखेडे, अमित साहू आणि अमोल ठोंबरे जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

### संतप्तांचा उद्रेक; जेसीबी पेटवली

घटनेची वार्ता पसरताच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने घाटावर जमा झाले. संतप्त जमावाने तेथे उभी असलेली जेसीबीची तोडफोड करून ती पेटवून दिली. काही वाहनांचेही नुकसान करण्यात आले. त्यामुळे काही काळ तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी वरोरा, हिंगणघाट आणि वडनेर पोलिसांची पथके घटनास्थळी दाखल झाली. अतिरिक्त बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.



### टोल नाक्यावर सापळा; संशयित तिघे ताब्यात

दरम्यान, आरोपी कारने वर्धेकडे पळ काढत असल्याची माहिती मिळाल्यानंतर वडनेर पोलिसांनी दारोडा टोल नाका परिसरात सापळा रचून संशयितांची कार अडविली. कारमधून सुनील झोरे, प्रफुल उमाटे, अतुल मोटघरे, या तिघांना ताब्यात घेतले असून त्यांना मंगळवारी न्यायालयात हजर केले असता न्यायाधीश यांनी ९ मार्च पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे, इतर आरोपी हरार असून त्यांचा शोध वरोरा पोलीस येत आहे, आहे. फरार आरोपींमध्ये सौरभ ठाकूर, अक्षय खडसे, अमोल कामडी, गितेश सातपुते व आदींचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे.

### रुग्णालयात तणाव; पोलिसांचा कडक बंदोबस्त

भारत नागपाल यांच्या निधनाची वार्ता समजताच उपजिल्हा रुग्णालयात नातेवाईक व समर्थकांची मोठी गर्दी झाली. वातावरण अत्यंत तणावपूर्ण बनले होते. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी रुग्णालय परिसरात कडक बंदोबस्त तैनात केला आहे.

या प्रकरणी संबंधित पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून आर्थिक व्यवहार, सिमावाद आणि पूर्वीचे मतभेद या सर्व अंगांनी तपास सुरू आहे. रेती घाटांवरील नियंत्रण, ठेके आणि त्यातील कोट्यवधींची उलाढाल यावरून निर्माण होणारे वाद पुन्हा एकदा चर्चेत आले असून प्रशासनासमोर कायदा-सुव्यवस्थेचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. जिल्ह्याचे लक्ष आता पुढील पोलिस कारवाईकडे लागले आहे.

### भारत नागपाल यांना अश्रूंनी अखेरचा निरोप

ङ हजारोंच्या उपस्थितीत पुलगाव येथे अंत्यसंस्कार; आमदार समीर कुणावार, राजेश बकाने यांची उपस्थिती

पुलगाव : रेती घाटातील हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले पुलगावचे भाजप शहर महामंत्री भारत नागपाल यांना मंगळवारी दुपारी शोकाकुल वातावरणात अखेरचा निरोप देण्यात आला. पुलगाव येथील स्मशानभूमीत हजारो नागरिकांच्या उपस्थितीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

नागपाल यांच्या निधनाची वार्ता समजताच हिंगणघाट, देवळी तसेच पुलगाव परिसरातून नागरिक अंत्यदर्शनासाठी मोठ्या संख्येने लोटले. व्यापारी, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, युवक कार्यकर्ते व सर्वसामान्य नागरिकांनी अंत्ययात्रेत सहभाग घेतला. भारतभाई अमर राहो च्या घोषणांनी वातावरण दुमदुमले होते. अंत्यसंस्कारावेळी हिंगणघाटचे आमदार समीर कुणावार तसेच देवळीचे आमदार राजेश बकाने यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, माजी लोकप्रतिनिधी, नगरसेवक आणि अनेक गणमान्य व्यक्ती उपस्थित होत्या. त्यांनी नागपाल कुटुंबीयांचे सांत्वन करत घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला.

अंत्ययात्रा शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली. मार्गावर ठिकठिकाणी नागरिकांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. अनेक व्यावसायिकांनी दुकाने बंद ठेवत शोक व्यक्त केला. शहरात काही काळ शोककळा पसरली होती.

# भाविकांच्या पावलांना दिलासा : आर्वी-शिरपूर मार्गासाठी ९ कोटींचा निधी

### खासदार अमर काळे यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न



**आर्वी जनमाध्यम** : वर्षानुवर्षे खड्ड्यांनी विदीर्ण झालेल्या आर्वी-शिरपूर मार्गाला अखेर नवसंजीवनी मिळाली आहे. विदर्भातील श्रद्धास्थान असलेल्या श्री संत लहानुजी महाराज देवस्थान येथे जाणाऱ्या हजारो भाविकांच्या प्रवासाला दिलासा देणाऱ्या या रस्त्यासाठी सीआरआयएफ अंतर्गत तब्बल ९ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला. या कामाचे भूमिपूजन खासदार अमर काळे यांच्या हस्ते १ मार्च रोजी उत्साहात पार पडले.

नांदपूरमार्गे जाणारा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असल्याने भाविकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत होता. त्यामुळे शिरपूरमार्गेच मोठ्या प्रमाणावर वर्दळ वाढली होती. या मार्गाचे धार्मिक आणि सामाजिक महत्त्व लक्षात घेऊन खासदार काळे यांनी केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला.

भूमिपूजनप्रसंगी भानुदासजी टिपले, सौ. मंगलाताई भोंगाडे, जुबेर खाँ युसूफ खाँ यांच्यासह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याशिवाय स्थानिक विकास निधीतून सिमेंट नाली, पेव्हिंग ब्लॉक व सिमेंट रस्त्यांच्या कामांनाही प्रारंभ करण्यात आला. या निर्णयामुळे परिसरात समाधानाची भावना व्यक्त होत आहे.

### प्रशासन लोकांच्या दारी'चा ध्यास

# छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियानाच्या पहिल्या टप्प्याची माहिती

सेलू जनमाध्यम : सर्वसामान्यांना महसूल विभागाच्या सेवा एकाच छताखाली, जलद व पारदर्शक पद्धतीने मिळाव्यात, या उद्देशाने राज्य शासनातर्फे ७ मार्च ते २५ मे २०२६ दरम्यान राबविण्यात येणाऱ्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियानच्या पहिल्या टप्प्याची सविस्तर माहिती आज तहसील कार्यालयात घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली. तहसीलदार डॉ. शकुंतला पाराजे यांनी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसह अभियानाचा आराखडा स्पष्ट केला.

या अभियानात गावागावांत चावडी वाचन करून ७/१२ उताऱ्यांवरील नोंदी दुरुस्त करणे, वारस हक्क प्रकरणांना गती देणे, तसेच जाती, उत्पन्न व नॉन-क्रिमिलेयर दाखले जागेवरच उपलब्ध करून देण्यावर भर राहणार आहे. शेती बांधावरून होणारे वाद 'सलोखा योजने'तून आपसी संमतीने सोडविण्याचे प्रयत्न केले जाणार आहेत.

शिधापत्रिका दुरुस्ती, नवीन अर्ज स्वीकृती याबाबत अन्न पुरवठा विभागाने मार्गदर्शन केले. 'ई-मोजणी' व 'डिजिटल ७/१२'सारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशासन अधिक पारदर्शक करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. दप्तर दिरंगाई संपवून प्रशासन लोकांच्या दारी पोहोचवू, अशी ग्वाही तहसीलदारांनी दिली. ग्रामसचिव, नगरपरिषद मुख्याधिकारी, वनपरीक्षेत्र अधिकारी, भूमी अभिलेख अधिकारी, उपनिबंधक व तलाठी यांची उपस्थिती होती.

# अज्ञात इसमाकडून चण्याच्या गंजीला आग; तीन लाखांचे नुकसान

### सुजातपूर शिवारात मध्यरात्रीची घटना; तळेगाव पोलिसांत तक्रार



**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील सुजातपूर येथील मौजा नरसिंगपूर शेत शिवारात अज्ञात व्यक्तीने चण्याच्या गंजीला आग लावल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या आगीत साडेतीन एकरातील चण्याची गंजी जळून खाक झाली असून शेतकरी रामेश्वर प्रभाकर धुर्वे यांचे सुमारे तीन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. धुर्वे यांनी कष्टाने पिकवलेला चणा सोंगून गंजी करून ठेवला होता. नेहमीप्रमाणे राखवालीसाठी ते शेतात जात असताना ही घटना समोर आली. रात्री जेवणासाठी घरी गेल्यानंतर परत शेतात येताच गंजी पेटलेली दिसली. तोपर्यंत अज्ञात इसमाने पोबारा केला होता.

डोळ्यादेखत उभा हंगाम जळताना पाहून धुर्वे काही काळ सुन्न झाले. घटनेची माहिती तळेगाव पोलीस स्टेशन येथे देण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## आष्टी तालुक्यात चार ठिकाणी महाराजस्व समाधान शिबिरांचे आयोजन

वर्धा जनमाध्यम : तहसील कार्यालय आष्टीच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा एक अंतर्गत महसूल मंडळाच्या ठिकाणी ४ शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात नागरिकांना विविध सेवा उपलब्ध होणार असल्याने शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानांतर्गत दि.७ मार्च रोजी ग्रामपंचायत कार्यालय साहूर, दि.१४ मार्च रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मंदिर अंतोरा, दि.१० एप्रिल रोजी ग्रामपंचायत तळेगाव तर दि.१७ एप्रिल रोजी पंचायत समिती कार्यालय आष्टी येथे शिबिर होणार आहे.या समाधान शिबिरात सर्वसामान्य नागरिकांना विविध प्रकारच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यात प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क, लोकसेवा हक्क कायदा-तत्काळ संपा, अकृषक तरतुदीसंदर्भातील सुधारणाबाबत मार्गदर्शन, भूसंपादन केलेल्या व अकृषिक परवानगी दिलेल्या प्रकरणी कमी-जास्त पत्रके तयार करुन गाव दप्तर अद्ययावत करणे,

# संत तुकाराम महाराज बीज उत्सवाला भक्तिभावात प्रारंभ

### रामनगर मठात सप्ताहाची सुरुवात; पालखी, दीपोत्सव व महाप्रसादाचे आयोजन



**वर्धा जनमाध्यम :** विदर्भातील वारकरी संप्रदायाची 'पंढरी' म्हणून ओळख असलेल्या रामनगर येथील संत तुकाराम महाराज मठ येथे संत तुकाराम महाराज बीज (वैकुंठ गमन) सप्ताहाला भक्तिभावात प्रारंभ झाला. २७ फेब्रुवारी ते ६ मार्च दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी पहाटे तीर्थस्थापना व वीणा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. दररोज सकाळी ७ ते ११ या वेळेत हभप प्रवीण महाराज साबळे यांच्या वाणीतून तुकाराम गाथा पारायण होत आहे. दुपारी भजन, सायंकाळी हरिपाठ व भारुड, तर रात्री नामसंकीर्तनाने परिसर भक्तिरसात न्हाऊन निघत आहे. ५ मार्च रोजी दीपोत्सव, तर ६ मार्चला गोपालकाला कीर्तनानंतर पालखी मिरवणूक, अश्व रिंगण व दहीहंडी होणार आहे. सायंकाळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्त मंडळाने केले आहे.

### सुट्टीची सूचना

आज मंगळवार, दि.०३ मार्च २०२६ रोजी धुलीवंदन असल्यामुळे जनमाध्यम कार्यालयास सुटी राहील. त्यामुळे बुधवार दि.०४ मार्च २०२६ रोजीचा अंक प्रकाशीत होणार नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

- व्यवस्थापक

# ४३ गोवंशाची सुटका; ४१.८० लाखांचा मुद्देमाल जप्त

**समुद्रपूर;** पोलिसांनी अवैधरित्या कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या ४३ गोवंशाची सुटका करत वाहनासह ४१ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरंभा टोल नाका परिसरात संशयास्पद वाहन थांबवून तपासणी केली असता एमएच ३४ बीझेड ७६९८ क्रमांकाच्या वाहनात जनावरांना अमानुषपणे कोंबून वाहतूक केली जात असल्याचे आढळले. ४३ जनावरे जिवंत तर तीन मृत अवस्थेत सापडली. पोलिसांनी वाहन ताब्यात घेतले. याप्रकरणी सरगम गुलाबसिंग धुर्वे (रा. सालई, मध्यप्रदेश) व इमरान कुरेशी (रा. गडचांदूर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई झाली.

### आवाजाबाबत विचारणा; काठीने मारहाण

आर्वी: तालुक्यातील टाकरखेडा येथे जोरात आवाज का करता, अशी विचारणा केल्याने वाद होऊन काठीने मारहाण करण्यात आल्याची घटना ११ फेब्रुवारी रोजी घडली. राजू देवराव मारबते यांनी प्रभाकर मधुकरराव बावणे यास आवाजाबाबत जाब विचारला. त्यावरून संतप्त झालेल्या बावणे यांनी काठीने मारहाण केली. यात मारबते जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले. तक्रारीवरून आर्वी पोलिसांनी प्रभाकर बावणे विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

### चाकू घेऊन दहशत; एकावर गुन्हा

वर्धा : सावंगी ते पालोती मार्गावर सार्वजनिक रस्त्यावर चाकू घेऊन दहशत पसरविणाऱ्या नितीन दमडुजी पिंपळे याच्यावर पोलिसांनी कारवाई केली. नागरिकांमध्ये भीती निर्माण होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर सावंगी (मेघे) पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पिंपळे यास ताब्यात घेऊन त्याच्याकडील चाकू जप्त करण्यात आला. याप्रकरणी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### तलवार घेऊन फिरणाऱ्यास अटक

हिंगणघाट: येथील संत चोखोबा वॉर्ड परिसरात तलवार घेऊन दहशत निर्माण करणाऱ्या शुभम मधुकर डेकाटे यास पोलिसांनी अटक केली. परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ कारवाई करत त्याच्याकडील तलवार जप्त केली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### कीटकनाशक प्राशन; तरुणाचा मृत्यू

आष्टी : सुसुंद्रा येथील दीपक प्रभाकर जेवडे (३५) यांनी राहत्या घरी कीटकनाशक प्राशन केल्याने त्यांचा मृत्यू झाला. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते; मात्र उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी आष्टी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.


### जाहीर सूचना

माझे पती निलेश भीमरावजी दुबे याचे दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या मालकीची मोटर सायकल होंडा युनिकॉर्न वाहन क्रं. श्प्३ रैं४९८३

चेचीस नंबर र्ईँख्व्०९र्ष्८६४०९५०

इंजिन नंबर ख्व्०९८६६५१०७३ हा आहेत. (नाते पत्नी ) माझे नाव मेघा निलेश दुबे, घारपुरे लेआउट नागरी बँक कॉलनी सिंदी मेघे) वर्धा, हे असून, ते वाहन माझ्या नावाने हस्तांतरण करण्यासाठी माझा कुटुंबातील सदस्यांनी ना-हरकत परवानगी दिली आहे. वाहन हस्तांतरण करण्यासाठी कुणाचा आक्षेप असल्यास दहा दिवसांच्या आत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय वर्धा येथे आक्षेप नोंदवावा.

आपली नम्र

**मेघा निलेश दुबे**

रा, घारपुरे लेआउट वर्धा नागरी बँक कॉलनी सिंदी (मेघे) वर्धा,

# शालेय अभ्यासक्रमात श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानाच्या इतिहासाचा समावेश करणार-मुख्यमंत्री

## गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत हिंद दि चादर कार्यक्रमाचे खारघरमध्ये भव्य आयोजन



नवी मुंबईत त्यांच्या नावाने रुग्णालय उभारणार

**मुंबई/प्रतिनिधी :** हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी धर्म व संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेली शहादत ही जगाच्या इतिहासातील अद्वितीय घटना आहे. त्यांच्या बलिदानाची गाथा केवळ एका कार्यक्रमापुरती मर्यादित न राहता ती पुढील पिढीपर्यंत पोहचली जावी. यासाठी शालेय अभ्यासक्रमात श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानाच्या इतिहासाचा समावेश केला जाणार आहे. तसेच नवी मुंबई परिसरात त्यांच्या नावाने रुग्णालय उभारण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

अल्पसंख्याक विकास विभाग आणि राज्यस्तरीय समागम समिती यांच्या वतीने खारघर येथे हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शिख समाजाचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी भारतीय संस्कृती वाचवण्यासाठी १६७५ मध्ये आपले शीश अर्पण करून शहादत दिली. त्यांच्या या बलिदानामुळे आज आपण स्वाभिमानाने आपली श्रद्धा जोपासू शकतो. त्यांच्या या बलिदानाच्या स्मरणार्थ संपूर्ण महाराष्ट्रात शहिदी समागम आयोजित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला.

हा कार्यक्रम केवळ शीख समाजापुरता मर्यादित नसून सर्व श्रद्धावान नागरिकांचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नागपूर, नांदेड आणि नवी मुंबई येथे शहिदी समागम मोठ्या प्रमाणावर पार पडल्याचे सांगून देश-विदेशातून भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाल्याचा उल्लेख त्यांनी केला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र आणि पंजाब यांचे नातेही विशेष आहे. संत नामदेव महाराज महाराष्ट्रातून पंजाबमधील घुमान येथे गेले. त्यांच्या रचना गुरु ग्रंथ साहिबमध्ये आहेत. तसेच गुरु गोविंद सिंग महाराष्ट्रात आले आणि त्यांनी नांदेड येथे अखेरचा श्वास घेतला. गुरु गोविंद सिंग यांच्या कुटुंबातील तीन पिढ्यांनी शहादत दिली, असे उदाहरण जगात क्वचितच आढळते.

यावेळी वनमंत्री गणेश नाईक, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, राज्यस्तरीय समन्वय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, अखिल भारतीय धर्मजागरणचे प्रमुख शरदराव ढोले, शहिदी समागम समितीचे मार्गदर्शक बाबा हरनाम सिंह जी, मुखी, दमदमी टकसाल, प्रधान संत समाज, बंजारा समाजाचे धर्मगुरू बाबूसिंग महाराज, राज्यस्तरीय समन्वय समितीचे निमंत्रक बल मलकित सिंह, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार मंदाताई म्हात्रे, मुंबईच्या महापौर रितू तावडे, पनवेलचे महापौर नितीन पाटील, आदी उपस्थित होते.

## मानवतेसाठी अद्वितीय बलिदान आजही प्रेरणादायी- सुनेत्रा अजित पवार

'हिंद दी चादर' म्हणून ओळखल्या जाणा-या श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी धर्मस्वातंत्र्य आणि मानवाधिकारांच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान आजच्या काळातही प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या की, सतराव्या शतकात अन्यायाविरुद्ध निर्भयपणे उभे राहून श्री गुरु तेग बहादुर साहिबांनी भारताच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक अस्मितेचे रक्षण केले. त्यांच्या त्यागाचे स्मरण करणे आणि त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे, हीच या समागम कार्यक्रमाची खरी प्रेरणा आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी गुरु नानक देव यांना वंदन करत श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या शिकवणीचा उल्लेख केला. प्रार्थना, परोपकार, सेवा, साधेपणा आणि निर्भयता यांचा संदेश श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी दिला. त्यांच्या वचनांचा समावेश गुरु ग्रंथ साहिबमध्ये असून, त्यांच्या बलिदानामुळे सिख धर्मातील शौर्य आणि त्यागाची परंपरा अधिक बळकट झाली. कुणालाही घाबरवू नका आणि कुणालाही घाबरू नका हा संदेश आजच्या धावपळीच्या जीवनात अधिकच महत्त्वाचा ठरतो, असे नमूद करत समाजात प्रेम, एकता आणि बंधुभाव जोपासण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले. हा ३५० वा शहिदी समागम कार्यक्रम सर्व भाविकांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त त्यांनी व्यक्त केला.

## श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे कार्य संपूर्ण मानवतेच्या इतिहासातील एक गौरवशाली पान- एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, 'हिंद की चादर' म्हणून ओळखले जाणारे, मानवतेचे रक्षक आणि महान त्यागी श्री गुरु तेग बहादुर साहीबजी यांचा त्याग मानवतेच्या इतिहासातील गौरवपूर्ण पर्व आहे. श्री गुरु तेग बहादुर साहिबजींचे बलिदान हे केवळ इतिहास नाही, तर ते संपूर्ण मानवतेच्या इतिहासातील एक गौरवशाली पान आहे. संस्कृती, परंपरेच रक्षण करण्यासाठी श्री गुरु तेग बहादुर साहीबजी यांनी प्राणांची आहुती दिली. त्यांचे कार्य अतूट श्रद्धा आणि अतूट धैर्याचे उदाहरण आहे. श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्याकडे शस्त्रे नव्हती, पण त्यांच्याकडे सत्य आणि करुणेची ताकद होती. त्यांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवून गोरगरिबांना न्याय मिळवून दिला. सच्चा धर्म तोच, जो दुस-याच्या धर्माचा आदर करतो आणि रक्षण करतो, असेही श्री.शिंदे यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र आणि पंजाबच्या ऐतिहासिक संबंधांवर प्रकाश टाकत नांदेड ही गुरु गोविंद सिंहजींची कर्मभूमी आहे, तर संत नामदेव महाराजांनी भागवत धर्माची पताका पंजाबमध्ये फडकवली असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. श्री गुरु तेग बहादुर साहिबजींचे विचार जनमानसात पोहोचवण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. आम्ही राज्यभरात डिजिटल रथांच्या माध्यमातून या महान बलिदानाची गाथा घराघरात पोहोचवित आहोत. सिख, सिकलकर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मीकी, उदासीन आणि भगत नामदेव (वारकरी) संप्रदाय या सर्व समाजांना एका सूत्रात बांधून श्री गुरु तेग बहादुर साहिबाजी यांचे कार्य व विचार पुढील पिढीपर्यंत पोहचविण्याचा मानस उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

# भारत-पाक सीमेवरील पुंछ येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारणार

## शिवस्वराज्य यात्रेचे दिल्लीतील महाराष्ट्र सदनात जंगी स्वागत

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतीय शौर्याचे प्रतीक आणि कोट्यवधी भारतीयांचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा आता जम्मू-काश्मीरमधील भारत-पाकिस्तान सीमेवर असलेल्या पुंछ येथे दिमाखात उभा राहणार आहे. या ऐतिहासिक सोहळ्यानिमित्त पुणे येथून निघालेली भव्य 'शिवस्वराज्य यात्रा' राजधानी दिल्लीतील महाराष्ट्र सदनात दाखल झाली. यावेळी 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषात या रथाचे आणि शिवरायांच्या पुतळ्याचे अत्यंत उत्साहात जंगी स्वागत करण्यात आले.

या गौरवशाली सोहळ्याप्रसंगी महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला, ,महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार आणि जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, आम्ही पुणेकर' संस्थेचे अध्यक्ष हेमंत जाधव यांनी उपस्थित राहून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे विधिवत पूजन केले. यावेळी दिल्लीतील विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि मोठ्या संख्येने मराठी बांधव उपस्थित होते. आयुक्त आर. विमला यांनी सांगितले की भारतीय सेना सीमेवर शौर्याने कार्यरत आहे. सीमेवर उभारण्यात येणारा हा पुतळा जवानांना आणि देशवासीयांसाठी प्रेरणादायी ठरेल.मराठ्यांच्या देदिप्यमान इतिहासाची साक्ष देणारा हा पुतळा पुणे येथून रवाना झाला असून, त्याने पुणे - मुंबई - बडोदा - अहमदाबाद - उदयपूर - जयपूर असा प्रवास करत दिल्ली गाठली आहे. इथून पुढे हा रथ पानिपत आणि पठाणकोट मार्गे



पुंछ येथे पोहोचणार आहे. या प्रवासात ठिकठिकाणी शिवप्रेमींकडून रथाचे स्वागत करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, या स्मारकाच्या भूमिपूजनासाठी महाराष्ट्रातील साल्हेर, शिवनेरी, लोहगड, रायगड, प्रतापगड यांसह युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट असलेल्या ११ किल्ल्यांची आणि तमिळनाडूतील जिंजी अशा एकूण १२ किल्ल्यांची माती आणि पवित्र पाणी नेण्यात येत आहे. या स्मारकाचे आणि पुतळ्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे पुण्याचे ज्येष्ठ शिल्पकार विवेक खटावकर आणि त्यांच्या तिस-या पिढीतील कलाकार विपुल आणि विराज खटावकर यांनी या नउ फूट उंच पुतळ्याची निर्मिती केली आहे. हा पुतळा उच्च दर्जाच्या फायबरपासून तयार करण्यात आला असून, त्याची रचना अत्यंत देखणी आणि प्रेरणादायी आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबर २०२३ मध्ये जम्मू-काश्मीरमधील कुपवाडा येथे अशाच प्रकारे पुतळा उभारण्यात आला होता. त्यानंतर आता पुंछ येथे अधिक भव्य पुतळा बसवून परिसराचा कायापालट करण्यात येणार आहे.

या ऐतिहासिक उपक्रमाचे आयोजन 'आम्ही पुणेकर' संस्था, 'श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ' आणि 'श्री शिवशंभू विचार मंच' यांच्या वतीने करण्यात आले आहे. 'आम्ही पुणेकर' संस्थेचे अध्यक्ष हेमंत जाधव, विश्वस्त अखिल झांजले, विपुल कांबळे आणि संदीप मते यांनी या मोहिमेचे नियोजन केले आहे. या कार्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आणि सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. या स्मारकाची सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे याची सुरक्षा आणि देखभालीची संपूर्ण जबाबदारी भारतीय लष्कराच्या 'मराठा लाइट इन्फंट्री' कडे सोपवण्यात आली आहे. पाकिस्तान सीमेपासून अवघ्या ५०० मीटर अंतरावर असलेल्या या ठिकाणी ५०० जवान तैनात असून, त्यांनी या स्मारकाची सर्व जबाबदारी स्वीकारली आहे. केवळ पुतळाच नाही, तर या ठिकाणी शिवरायांच्या इतिहासावर आधारित एक विशेष संग्रहालय आणि 'लाईट अँड साउंड' शो देखील आयोजित करण्याचे नियोजन आहे, जेणेकरून सीमेवर तैनात असलेल्या जवानांना आणि पर्यटकांना शिवरायांच्या पराक्रमाचा इतिहास अनुभवता येईल. मार्चच्या पहिल्या आठवड्यात या अश्वारूढ पुतळ्याचे अधिकृत अनावरण होणार असून, हा क्षण प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा ठरणार आहे.

# बारामतीतील शासकीय रूग्णालय व आयुर्वेद महाविद्यालयाला 'स्व. अजित (दादा) पवार' यांचे नाव

**मुंबई/प्रतिनिधी :** पुणे जिल्ह्यातील बारामती येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालय तसेच शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयाचे नामकरण स्व. अजित (दादा) पवार यांच्या नावाने करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या ३ जानेवारी २०१३ च्या शासन निर्णयान्वये बारामती येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ५०० रुग्णखाटांचे संलग्नित रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर २० जुलै २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व १०० रुग्णखाटांचे आयुर्वेद रुग्णालयही सुरू करण्यात आले. या दोन्ही संस्था ग्रामीण व अर्धनगरी भागातील नागरिकांसाठी महत्त्वाचे आरोग्यकेंद्र ठरली आहेत. येथे विशेषज्ञ वैद्यकीय सेवा, आपत्कालीन उपचार, शस्त्रक्रिया सुविधा तसेच आयुर्वेद उपचार स्थानिक स्तरावर उपलब्ध होत आहेत. परिणामी, पुणे शहरावरील तृतीयस्तरीय आरोग्यसेवेचा ताण कमी होउन परिसरातील नागरिकांना गुणवत्तापूर्ण व परवडणारी सेवा मिळत आहे. यापूर्वी ३१ मे २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामतीचे नामकरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती असे करण्यात आले होते.



आता त्याच अनुषंगाने शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचे नामकरण स्व. अजित (दादा) पवार सर्वोपचार रुग्णालय, बारामती असे करण्यात येणार आहे. तसेच शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती व शासकीय आयुर्वेद रुग्णालय, बारामती यांचे नामकरण अनुक्रमे स्व. अजित (दादा) पवार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, बारामती असे करण्यात येणार आहे.

दिवंगत अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री, वित्तमंत्री तसेच विविध विभागांचे मंत्री म्हणून कार्य करताना राज्याच्या अर्थसंकल्पात आरोग्य क्षेत्राला विशेष प्राधान्य दिले होते. जिल्हास्तरीय वैद्यकीय पायाभूत सुविधा मजबूत करणे, नवीन वैद्यकीय व आयुर्वेद महाविद्यालयांची स्थापना, आधुनिक वैद्यकीय उपकरणांची उपलब्धता आणि ग्रामीण भागात तृतीयस्तरीय आरोग्यसेवेचा विस्तार या बाबींमध्ये त्यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या प्रयत्नांमुळे बारामती परिसरातील आरोग्य व शैक्षणिक विकासाला गती मिळाल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. नामाधिकरणानंतर संबंधित संकेतस्थळे, अभिलेखे, नोंदवही, फलक, अधिकृत पत्रव्यवहार व इतर कागदपत्रांमध्ये आवश्यक ते बदल करण्याची जबाबदारी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबईचे आयुक्त तसेच संबंधित संस्थांचे अधिष्ठाता यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

## गृहमंत्री अमित शाह यांनी दिली लंगरसेवा

**नवी मुंबई, दि. २८ (विमाका):-** गृहमंत्री अमित शाह यांनी खारघर, नवी मुंबई येथे आयोजित हिंद-दी-चाद समागम कार्यक्रम दरम्यान स्वतः लंगरमध्ये संत महंताना भोजन वाढून सेवा दिली. सेवा हीच खरी श्रद्धा या शीख परंपरेचा आदर्श त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही भोजन वाढून लंगर सेवा दिली. कार्यक्रमस्थळी सकाळपासून रात्रीपर्यंत अखंड लंगर सुरू असून सर्वधर्मीय भाविकांसाठी विनामूल्य भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. आठ ठिकाणी सुरू असलेल्या लंगरमध्ये हजारो स्वयंसेवक सेवा बजावत आहेत. भाई जैताजी लंगर सेवा, राधास्वामी ब्यास लंगर सेवा, बाबा मक्खन शाह लबाना लंगर सेवा, संत सेवालाल महाराज लंगर सेवा, बाबा दीप सिंघा ब्यास लंगर सेवा, भगवान झुलेलालजी लंगर सेवा, भाई मतीदासजी लंगर सेवा या आठ सेवादार लंगरमध्ये पहिल्या दिवशी लाखो भाविकांनी लंगरचा लाभ घेतला, तर दुस-या दिवशी हा प्रतिसाद अधिक वाढला असल्याची माहिती आयोजकांनी दिली. या समागम कार्यक्रमात गुरु ग्रंथ साहिब यांच्या पावन उपस्थितीत कीर्तन व धार्मिक कार्यक्रम सुरू होते. वाहे गुरु आणि बोले सो निहाल, सत श्री अकालच्या जयघोषात भाविकांनी दर्शन व लंगर सेवेचा लाभ घेत घेतला. लंगर ही केवळ भोजन व्यवस्था नसून समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश देणारी परंपरा आहे. गृहमंत्री आणि मुख्यमंत्री यांनी स्वतः लंगर सेवा देत या परंपरेचा सन्मान केला. हिंद-दी-चादर समागमातून सामाजिक ऐक्य आणि एकात्मतेचा प्रभावी संदेश दिला.

## राउळगाव स्फोटातील मृतांच्या वारसांना पाच लाखांची मदत

**मुंबई/प्रतिनिधी :** नागपूर जिल्ह्यातील राउळगाव येथे स्फोटकांच्या एका फॅक्टरीत झालेल्या स्फोटाची घटना अतिशय दुर्दैवी आणि दुःखद असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुर्घटनेत मृत्यू झालेल्यांच्या वारसांना पाच लाख रुपये आर्थिक मदत देण्याचे जाहीर केले आहे. याशिवाय संबंधित कंपनी देखील मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणार आहे. या घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, मी स्थानिक प्रशासनाशी सातत्याने संपर्कात आहे. जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक हे तातडीने घटनास्थळी पोहोचले आहेत. एनडीआरएफ, एसडीआरएफचे पथक सुद्धा घटनास्थळी आहे. पेसो आणि डिश यांची पथके पोहोचली आहेत. मदतकार्याला वेग देण्यात आला असून आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झाला आहे, तर १८ जण जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने नागपूरला हलवण्यात आले आहे. मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत. तसेच जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

## मध्यपूर्वेतील तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतीय नागरिकांसाठी आपत्कालिन सूचना

**मुंबई/प्रतिनिधी :** मध्यपूर्व व आसपासच्या काही देशांमध्ये निर्माण झालेल्या तणावपूर्ण प्रादेशिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार परदेशात वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण सूचना जारी करण्यात आल्या आहेत. अशा परिस्थितीत नागरिकांनी आवश्यक माहितीसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष किंवा पोलीस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन मुंबई शहर जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालयाच्या नैसर्गिक आपत्ती शाखेमार्फत करण्यात आले आहे.पॅलेस्टाईन (रामल्लाह), कतार (दोहा), सौदी अरेबिया (रियाध), इस्रायल (तेल अवीव), इराण (तेहरान), इराक (बगदाद), कुवेत, बहारीन, मस्कत, जार्डन तसेच संयुक्त अरब अमिरात (अबू धाबी) येथे वास्तव्यास असलेल्या सर्व भारतीय नागरिकांनी अत्यंत सतर्क राहावे, अनावश्यक हालचाली टाळाव्यात व स्थानिक प्रशासन तसेच भारतीय दूतावासांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन शासनाच्या वतीने वेळोवेळी करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत संबंधित देशांतील भारतीय दूतावासांच्या २४न७ हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले असून, दूतावासांकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे.परदेशात वास्तव्यास असलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांनी शांतता व संयम राखावा, अधिकृत माहितीकडेच लक्ष द्यावे आणि आवश्यक असल्यास तात्काळ भारतीय दूतावासांशी संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र शासनाने केले आहे. केंद्र शासन व संबंधित दूतावासांशी समन्वय ठेवून, महाराष्ट्र शासनाच्या वतीने नागरिकांच्या सुरक्षेबाबत सतर्कता बाळगली जात आहे.

संबंधित देशांतील भारतीय दूतावासांचे संपर्क तपशील नागरिकांच्या सोयीसाठी प्रसिद्ध करण्यात आले आहेत. त्यानुसार पॅलेस्टाईन (रामल्लाह) येथे फोन : अ९७०-५९२९१६४१८, ई-मेल : repoffice@mea.gov.in/ cons.ramallah@mea.gov.in, कतार (दोहा) येथे फोन : ००९७४-५५६४७५०२, ई-मेल : cons.doha@mea.gov.in, सौदी अरेबिया (रियाध) येथे फोन : ००-९६६-११-४८८४६९७, व्हाट्साप : ००-९६६-५४२१२६७४८, टोल फ्री : ८००-२४७-१२३४, ई-मेल : cw.riyadh@mea.gov.in, इस्रायल (तेल अवीव) येथे फोन : अ९७२-५४-७५२०७११/ अ९७२-५४-२४२८३७८, ई-मेल : cons1. telaviv@mea. gov.in, इराण (तेहरान) येथे फोन : अ९८९१२८१०९११५, अ९८९१२८१०९१०९, अ९८९१२८१०९१०२, अ९८९९३२१७९३५९, संयुक्त अरब अमिरात (अबू धाबी / दुबई) येथे टोल फ्री : ८००-४६३४२, व्हाट्साप : अ९७१५४३०९०५७१ ई-मेल : pbsk.dubai@mea.gov.in .

## 'ऊमेद' अभियानांतर्गत वाशी येथील आयोजित राज्यस्तरीय खरेदीदार-विक्रेता संमेलनात 5.50 कोटींची उलाढाल

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागांतर्गत राबविण्यात येणा-या 'उमेद' - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या वतीने वाशी येथील सिडको प्रदर्शन केंद्रात आयोजित करण्यात आलेले राज्यस्तरीय खरेदीदार-विक्रेता संमेलन कमालीचे यशस्वी ठरले आहे. नुकत्याच पार पडलेल्या या एकदिवसीय संमेलनात सुमारे ५.५० कोटी रुपयांची विक्रमी उलाढाल झाली असून, महिला शेतकरी कंपन्यांना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यात 'उमेद'ला उल्लेखनीय यश आले आहे.

या खरेदीदार-विक्रेता संमेलनामुळे महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांमधील परस्पर खरेदी-विक्रीलाही मोठे प्रोत्साहन मिळाले आहे. 'उमेद'च्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला मोठी चालना मिळत असल्याचे आश्वासक चित्र पाहायला मिळत आहे.राज्यातील महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांनी पिकवलेल्या मालाला मध्यस्थांशिवाय थेट बाजारपेठ मिळावी आणि महिला शेतक-यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य भाव व अधिक नफा मिळावा, हा या संमेलनाचा मुख्य उद्देश होता. या व्यासपीठामुळे पहिल्यांदाच ७० महिला शेतकरी उत्पादक कंपन्या आणि नामांकित खरेदीदार समोरासमोर आले.



दिवसभरात २६७ टन उत्पादनांच्या विक्रीतून २.१५ कोटी रुपयांची थेट उलाढाल झाली. तसेच, भविष्यातील खरेदीसाठी विविध संस्थांसोबत ३.३५ कोटी रुपयांचे हेतू पत्र स्वाक्षरित करण्यात आले. या संमेलनात सलाम किसान, स्टार ॲग्री, कष्टकरी राजा शेतकरी उत्पादक कंपनी, प्राप्तीकृषी उद्योग, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पॅकेजिंग यांसारख्या नामवंत संस्थांसह कृषी उत्पन्न बाजार समितीतील खरेदीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे, प्रथमच प्रभागसंघ प्रतिनिधींनी सक्रिय सहभाग नोंदवत शेतकरी कंपन्यांशी थेट व्यवहार केले. या प्रदर्शनात महाराष्ट्राच्या विविध भागांतील भौगोलिक मानांकन प्राप्त आणि वैशिष्ट्यपूर्ण ३५ उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध होती. यामध्ये प्रामुख्यानेः कोकणातून काजू, कोकम, मॅंगो पल्प आणि नाचणी हा शेतमाल होता. पश्चिम महाराष्ट्रातून पुण्याचा इंद्रायणी तांदूळ, जुन्नरची द्राक्षे-कांदा, सोलापूरची मालदांडी ज्वारी आणि कोल्हापूरचा गुळ व मिरची या प्रकारचा शेतमाल होता. विदर्भ व मराठवाड्यातून वर्ध्याची वायगाव हळद, नागपूरची भिवापुरी मिरची, लातूरची पांढरी तूरडाळ, नांदेडची अर्धापूर हळद आणि भंडारा-गडचिरोलीचा चिनूर व कालीमुछ तांदूळ असा शेतमाल ग्रामीण महिलांनी उपलब्ध करून दिला होता. संमेलनाचे उद्घाटन अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर यांनी केले. उपस्थितांना सागर आणि अभियानाचे अतिरिक्त संचालक निखिलकुमार ओसवाल यांनी मार्गदर्शन केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपसंचालक संदीप जठार यांनी केले.

## ऐतिहासिक गुरु द्वारा विकला

### खरेदीदार २ पत्नींसाठी बुटीक बनवत आहे

**लुधियाना/वृत्तसंस्था ::** पाकिस्तानमध्ये शीख आणि हिंदूंच्या धार्मिक स्थळांना सातत्याने नुकसान पोहोचवले जात आहे. अलीकडेच, पाकिस्तानमधील एबटाबाद शहरातून गुरु द्वारा साहिबची इमारत पाडल्याचा आणि जमीन विकल्याचा प्रकार समोर आला आहे. खालसा वोक्सच्या अहवालानुसार, पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतातील एबटाबाद येथील ऐतिहासिक गुरुद्वारा इव्हॅक्युई ट्रस्ट प्र?पर्टी बोर्डच्या एका अधिका-याने एक कोटी पाकिस्तानी रुपयांची लाच घेउन विकला आहे. इतकेच नाही, तर अधिका-याने गुरु द्वारा साहिब पाडण्याची परवानगीही दिली. आता त्याचा खरेदीदार येथे आपल्या पत्नींसाठी बुटीक बनवत आहे. सांगायचे म्हणजे, पाकिस्तानमध्ये ईटीपीबीही अल्पसंख्याक समुदायांच्या गुरु द्वारा, मंदिरे आणि इतर प्रार्थनास्थळांच्या देखभालीसाठी जबाबदार संस्था आहे. पाकिस्तानमध्ये जेवढेही अल्पसंख्याक समुदाय आहेत, त्यांच्या धार्मिक स्थळांची देखरेख करण्यासाठी या बोर्डाची स्थापना करण्यात आली होती.

**गुरु द्वारा साहिबला बुटीकची परवानगी-** मीडिया रिपोर्ट्सनुसार, अटोक जिल्ह्यातील हसन अब्दाल येथील ईटीपीबी प्रशासकाने शीख राजवटीत बांधलेल्या गुरु द्वारा श्री गुरु सिंह सभा, एबटाबादचा ताबा वाहिद बाला नावाच्या एका स्थानिक रहिवाशाला दिला. अधिका-याने कथितरित्या गुरु द्वारा पाडून त्या जागी कपड्यांचे बुटीक बनवण्याची परवानगीही दिली.

**दोन पत्नींच्या नावावर केली-** गुरुद्वारा



सिंह सभाची जमीन खरेदी करणा-याचे नाव वाहिद बाला असल्याचे सांगितले जात आहे, ज्याने ही जमीन आपल्या दोन पत्नी रिदा जादून आणि आयशा वाहिद यांच्या नावावर केली आहे. आता त्या लवकरच येथे आपले बुटीक सुरू करणार आहेत.

**ईटीपीबी अधिका-याला बडतर्फ करण्याची मागणी-** पाकिस्तानमध्ये राहणा-या शिखांनी गुरु द्वारा साहिब विकण्याची आणि तो पाडण्याची परवानगी देणा-या ईटीपीबी अधिका-याला तात्काळ बडतर्फ करण्याची मागणी केली आहे. त्यांनी गुरु द्वारा साहिबची इमारत वाचवण्याची मागणीही सरकारकडे केली आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## विश्वयुद्धाची नांदी?

अमेरिका आणि इस्त्रायलने शनिवारी इराणविरोधात अत्यंत आक्रमक अशी संयुक्त मोहीम हाती घेऊन तुफानी हल्ले चढवले. यामध्ये इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला असून, त्यामुळे पश्चिम आशियात भडका उडाला. खामेनी समर्थक रस्त्यावर उतरल्याने आणि इराणने अमेरिकेवर मोठ्या हल्ल्याचा इशारा दिल्याने परिस्थिती चिघळताना दिसते. जगाला तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा खंडित होणार असून जगाच्या अर्थकारणालाच त्याची झळ बसेल. गाझापट्टी आणि युक्रेनमधील युद्धानंतर आता पश्चिम आशियात युद्ध सुरू झाले. त्याचे आंतरराष्ट्रीय राजकारण व व्यापारावर अत्यंत दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. अमेरिकेने 'एपिक फ्युरी' आणि इस्त्रायलने 'लायन्स रोअर' अशा मोहिमांच्या अंतर्गत सामुद्रिक तसेच हवाई हल्ले करून, तेहरानसह इस्फाहान कोम, कराज, शिराज, तबरीज आणि केरमानशाह या प्रमुख शहरांना लक्ष्य केले. इराणनेही इस्त्रायलसह कतार, कुवेत, बहारीन, संयुक्त अरब अमिराती येथील अमेरिकेच्या लष्करी तळांवर प्रतिहल्ले चढवले. इराणचे समर्थन असलेले येमेनमधील हुती आणि लेबनॉनमधील हेजबोला हे अतिरेकी गटही सक्रिय झाले असून, त्यांनी लाल समुद्रातील व्यापारी जहाजांवर हल्ले करण्याची धमकी दिली आहे. इराणने अण्वस्त्र कार्यक्रम गुंडाळावा, यासाठी अमेरिका व इस्त्रायलकडून दबाव होता. इराणने युरेनियम समृद्धीकरणाची पातळी अणुऊर्जा कार्यक्रमापुरती सीमित ठेवण्याची तयारी दर्शवली होती; परंतु क्षेपणास्त्र विकास कार्यक्रम थांबवावा, या अमेरिकेच्या मागणीस त्याची तयारी नव्हती. यासंबंधी ओमानमध्ये बोलणी सुरू होती आणि ती संपण्यापूर्वीच अमेरिका आणि इस्त्रायलने थेट युद्धच सुरू केले. इराणपासून आपल्या देशाला आणि जनतेला धोका होता. त्यामुळे हल्ला केला, असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. त्यांनी अण्वस्त्रे बाळगू नयेत, याची खबरदारी घेणे हे अमेरिकेचे ध्येय आहे. आम्ही त्यांच्या नौदलाचा नाश करू, तसेच पश्चिम आशियात त्यांच्याबद्दल सहानुभूती बाळगणाऱ्यांचाही सर्वनाश करू, अशी गर्जना करतानाच इराणी जनतेने स्वतःचे भवितव्य स्वतःच्या हातात घेण्याचे आवाहनही ट्रम्प यांनी केले. काही महिन्यांपूर्वी इराणमध्ये झालेल्या आंदोलनास अमेरिकेचीच चिथावणी होती. इराणमध्ये १९७९ मध्ये इस्लामी क्रांती झाल्यानंतर रुहल्ला खोमेनी हे इराणचे सुप्रीम लीडर बनले. त्यांच्या मृत्यूनंतर (१९८९) अयातुल्ला अली खामेनी सर्वोच्च धर्मगुरू बनले. नागरी वापरासाठी आण्विक कार्यक्रम हाती घेण्याची घोषणा त्यांनी केली. त्याचवेळी संहारक अण्वस्त्रांची निर्मिती करण्यावर बंदी घातली होती. खामेनी यांनी सरकारी क्षेत्रातील तेल व वायू उद्योगांचे खासगीकरण केले आणि इराणला ऊर्जा महाशक्ती बनवले. तथापि, त्यांनी शिया इस्लामवादास प्रोत्साहन दिले आणि अन्य देशांतही इराणी क्रांतीचा प्रसार केला. इराणने 'ॲक्सिस ऑफ रेझिस्टन्स'ला पूर्ण पाठिंबा दिला. सीरिया, इराक, येमेन, गाझा येथील युद्धांत त्यांनी थेटपणे सहभाग घेतला, तर युक्रेन युद्धात रशियाची बाजू घेतली. अमेरिकाविरोधावरच इराणमधील धार्मिक सत्तेचे राजकारण आधारलेले आहे. खामेनी इस्त्रायलला कट्टर शत्रू समजत होते. इस्त्रायलला संपवण्याचा इरादा त्यांनी जाहीर केला होता. त्यासाठी इस्त्रायल व पॅलेस्टाईन संघर्षात त्यांनी पॅलेस्टाईनची बाजू घेतली होती. १९९९, २००९, २०१७-१८ आणि २०२५ मधील स्त्रिया, विद्यार्थी व सर्वसामान्यांची आंदोलने त्यांनी निर्घृणपणे चिरडून टाकली. स्त्रीवादी कार्यकर्त्या, पत्रकार, ब्लॉगर्स यांनी विरोधी आवाज काढताच त्यांना तुरुंगात टाकण्यात आले. इराणमधील शहा पहलवी यांची राजवट संपल्यानंतर गेली ४७ वर्षे तेथे धर्मगुरूंचीच सत्ता असून, या काळात तेथे कट्टरतावाद रुजवला गेला; मात्र म्हणून इराणमधील राजवट उलथून पाडण्याचा अधिकार अमेरिका, इस्त्रायल वा कोणत्याही बाहेरील देशांना नाही. २००३ मध्ये सद्दाम हुसैन यांनी महासंहारक अस्त्रांचा साठा करून ठेवल्याचा आरोप करून, अमेरिकेने इराकवर आक्रमण केले. प्रत्यक्षात ही अस्त्रे सापडलीच नाहीत. इराकवर हल्ला करण्यास इस्त्रायलनेच अमेरिकेला प्रवृत्त केले होते, अशी माहिती नंतर पुढे आली. यावेळी अणुबॉम्बची निर्मिती करता येईल, अशाप्रकारचा कुठलाही आण्विक साठा आम्ही बाळगणार नाही, अशा आशयाची लेखी हमी देण्याची तयारी इराणने दर्शवली होती, असे ओमानचे परराष्ट्रमंत्री बद्र अलबू सैदी यांनी म्हटले आहे. अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबामा यांनी इराणशी केलेल्या करारात या गोष्टीचा उल्लेख नव्हता. त्यामुळे इराण युरेनियम समृद्धीकरण करत आहे, हा युक्तिवाद संदर्भहीन ठरला होता. अण्वस्त्र केंद्रांची अमेरिकेसह आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींना पाहणी करू देण्याची तयारी इराणने दर्शवली होती; परंतु त्यापूर्वीच ट्रम्प यांनी पश्चिम आशियात युद्धनौका धाडल्या. इराणवर हल्ला केल्यास त्याचे भयानक परिणाम होऊ शकतात, असा इशारा ट्रम्प यांना त्यांच्या सल्लागाराने दिला होता; परंतु तो त्यांनी धुडकावून लावला. हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने होर्मुझची सामुद्रधुनी रोखली, तर त्यामुळे व्यापार ठप्प होऊन जाईल. भारत आणि चीनसह इतर देशांचे शेकडो तेलाचे टँकर तेथूनच जातात. इराणच्या आखाताच्या तोंडावर असलेला हा अरुंद जलमार्ग जगातील २५ टक्के तेल व्यापार हाताळतो. इराणवरील या हल्ल्यांमध्ये फ्रान्स सहभागी नाही, असे फ्रान्सचे अध्यक्ष मॅक्रॉन यांनी म्हटले असून, रशियाने या हल्ल्याचा निषेध केला आहे. चीन, उत्तर कोरियानेही निषेध केला. खामेनींची हत्या करण्यात आली, अशी प्रतिक्रिया रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी दिली आहे, तीही महत्त्वाची ठरते. इराणसह पश्चिम आशियात नोकरी-धंद्यासाठी लाखो भारतीय गेले असून, त्यात विद्यार्थ्यांचाही समावेश आहे. शिवाय हजारो पर्यटकही आखाती देशांत अडकले आहेत. या सर्वांना सुरक्षितपणे परत आणण्याचे आव्हान आहे. संयुक्त राष्ट्र संघाची पर्वा न करता मनमानीपणे कोणत्याही देशावर हल्ले करणे आणि तेथे सत्तापालट घडवणे, ही साम्राज्यवादी मानसिकता असून, याचे कदापि समर्थन करता येणार नाही. या नव्या युद्धाने उरल्यासुरल्या जागतिक शांततेला धक्का बसला आहेच, त्यावर वेळीच तोडगा न निघाल्यास विश्वयुद्धाची ती नांदी ठरण्याचाही मोठा धोका संभवतो.

# मुख्यमंत्र्यांची मनसोक्त 'फडणविशी'

**राज्याच्या राजकीय इतिहासात कधी नव्हे असा राजकीय निरंकुशतेचा काळ सध्या सुरू झाल्याचे प्रतित होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हाती राज्याच्या विकासाची सारी सूत्र एकवटली आहेत. समोर विरोधीपक्षनेता नाही, मंत्रिमंडळातही त्यांच्या समोर टिकेल असे राजकीय व्यक्तिमत्व राहिले नाही. त्यामुळे ते ख-या अर्थाने देवेंद्र ठरले आहेत शिवाय त्यांना आता मनसोक्त 'फडणविशी' करून राज्याचा हवा तसा विकास करता येत आहे! हेच पहिल्या आठवड्याच्या अधिवेशनात पहायला मिळाले आहे.**



### राजकीय हालचालींचा सप्ताह

राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारीला सुरू झाले. प्रचंड राजकीय घटना, घडामोडी आणि त्यांच्यासाठीच्या राजकीय हालचालींचा हा सप्ताह राहिला. पहिल्या सप्ताहातील सलग सहा दिवसांच्या कामकाजातून अनेक महत्वाच्या गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत. या अधिवेशना दरम्यान राष्ट्रपतींचा महाराष्ट्र आणि मुंबईचा दौरा होता, तर पहिला दिवस राज्यपालांचे अभिभाषण आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजीत पवार यांच्या निधनाच्या शोकप्रस्तावाच्या कामकाजाचा होता. पहिल्याच दिवशी अजीत पवार यांच्या अपघाती निधनामुळे सा-याच्याच चेह-यावर सुतकी भाव आणि कसल्याश्या गुढ अनामिक भितीचे सावट जाणवत होते. भाजपचे काही आमदार नेते मात्र आता 'तुला भिती कश्याची, पर्वा की कुणाची?'अश्या अविर्भावात वावरताना दिसत होते. रोहित पवार, अमोल मिटकरी शशिकांत शिंदे अश्या काही नेत्यांच्या मनात या अपघातानंतरच्या संशयाच्या धुक्याचे निराकरण व्हावे यासाठीची धडपड असल्याचे दिसले, तर 'वरिष्ठ नेते पाहतील आपण उगाच कश्याला राजकारणात पडा' असा नेमस्त भाव अनेकांच्या चेह-यांवर पहायला मिळला. या अधिवेशना दरम्यान सभागृहात आणि बाहेर देखील वेगवान घटना घडामोडी घडत होत्या, मात्र त्यांचे फारसे प्रतिबिंब येथे उमटलेले दिसले नाही.

### 'दया कुछ तो गडबड जरूर है'

अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर डिजीसीए चा प्राथमिक अहवाल समोर आला त्यानंतर विमान अपघात चौकशी प्राधिकरणाचा (ैं ) प्राथमिक अहवाल देखील समोर आला आहे. त्यात विमान कंपनीने देखभाल दुरूस्तीमध्ये हयगय केल्याने त्यांची पाच विमाने जमीनीवरच ठेवण्याचा प्राथमिक निष्कर्ष काढण्यात आला. याचा अर्थ सदोष विमानातून हा प्रवास करण्यात आला होता. हे नकळत दुर्लक्षाने झाले की, जाणिवपूर्वक असे करण्यात आले?, याचा तपास आता झाला पाहिजे. या मागणीसाठी संबंधित व्हिएसआर कंपनीवर 'एफआयआर' दाखल करुन तपास केला पाहीजे या मागणीसाठी राष्ट्रवादीचे काही आमदार मरिनलाइन्स पोलीस ठाण्यात गेले मात्र त्यांचा जबाब नोंदवून घेतला जात असतानाच त्यांना तेथे दाखल झालेल्या वरिष्ठ पोलीस अधिका-यांकडून तेथे नकार देवून उर्मटपणे वागणूक देत घालवून देण्यात आल्याचे नंतर रोहित पवार यांनी माध्यमांसमोर सांगितले. त्या नंतर याच मागणीसाठी पवार यांनी बारामती येथे जावूनही प्रयत्न केला मात्र पोलीसांनी त्यांचा प्राथमिक गुन्हा अहवाल घेण्यास नकार दिला. दोनच दिवसांपूर्वी अजित पवार यांच्या निधनामुळे अतिव दु:ख व्यक्त करणारे सरकार, तोंडभरुन त्यांच्या कुटूंबियाच्या पाठिशी असल्याचे सांगणारे मुख्यमंत्र्यासह सारेच नेते दोन दिवसांनी त्यांच्या मृत्यूच्या अपघाताची चौकशी व्हावी म्हणून प्राथमिक गुन्हा कायदेशीर घटनात्मक पध्दतीने नोंदवून घेण्यास तयार का होत नाहीत? या सामान्यांच्या मनात पडलेल्या प्रश्नामुळे अजित पवारांच्या मृत्यूमागे मोठे षडयंत्र आणि मोठ्या शक्ती असल्याच्या संश्याला बळ मिळाले आहे. यातून 'दया कुछ तो गडबड जरूर है' असा जनमानसाचा संशय दृढ झाला आहे.

हे होत असताना अचानक महिना लोटल्यावर पुण्याच्या गुन्हे अन्वेषण विभागाने पत्रकार परिषद घेत आवश्यक सर्व बाबीचे पुरावे गोळा करण्याचे काम सुरू असून योग्य दिशेने तपास सुरू असल्याचे सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र या पत्रकार परिषदेतून फारसे काही बाहेर येणार नाही याची पुरेशी काळजी सीआयडीचे संबंधित अधिकारी घेताना दिसत होते. त्याचवेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांची निवड करण्यात आली, तर पार्थ पवार यांचे नांव राज्यसभेच्या निवडणूकीत राष्ट्रवादीचे उमेदवार म्हणून जाहीर करण्यात आले. त्यानंतर सुनेत्रा पवार यांनी विधिमंडळाच्या कामकाजातही भाग घेण्यास सुरूवात केल्याचे पहायला मिळाले.

### निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता

दरम्यान महाविकास आघाडीकडून राज्यसभेचा उमेदवार म्हणून शरद पवार यांच्या ऐवजी कॉंग्रेसच्या बाळासाहेब थोरात यांच्या नावाची चर्चा सुरू झाली आहे. शरद पवार यांच्या राज्यसभेचे काय? यावर मात्र अद्याप चुप्पी साधण्यात येत आहे. तर दुसरीकडे सर्वाधिक आमदार असल्याने शिवसेनेकडूनही या जागेवर दावा सांगण्यात येत आहे. तिकडे भाजपकडे 'एक अनार सौ बिमार' अशी स्थिती असल्याचे चित्र असून रावसाहेब दानवे यांच्या पासून प्रकाश जावडेकर धैर्यशील पाटील, पुनम महाजन गोपाळ शेट्टी विजया रहाटकर अश्या सुमारे दोन डझन नेत्यांच्या नावांची चर्चा करण्यात येत आहे. मात्र त्यात विनोद तावडे आणि आण्णामलई या तमिळ नेत्यांचे नाव निश्चित झाले असून रामदास आठवले यांच्या शिवाय अन्य एक नाव अद्याप अंतिम व्हायचे असल्याचे सांगण्यात येत आहे. शिवसेना शिंदे गटाकडून राहूल शेवाळे, गजानन किर्तीकर, यांच्यासह आनंदराव अडसूळ यांच्या नावांची चर्चा असून शेवाळे यांचे नाव अंतिम समजले जात आहे. शक्यतो ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता असून मतदानाची आवश्यकता राहू नये असा सत्ताधारी बाजूचा प्रयत्न असल्याचे सांगण्यात येत आहे. येत्या आठवड्यात याबाबतचा अंतिम निर्णय समोर येणार आहे.

### मेरे अंदर एक जमाना है

दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात अभिभाषणाच्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना सुमारे दोन तास तडाखेबंदपणाने महाराष्ट्राच्या विकासाचा समग्र आढावा घेतानाच मनसोक्त राजकीय आवेशपूर्ण भाषण केले. त्यात त्यांच्या देहबोलीतूनही ब-याच काही गोष्टी ध्वनीत झाल्याचे पहायला मिळाले आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यपालांच्या अभिभाषणाच्या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील विविध मुद्द्यांवर त्यांनी आपली भूमिका मांडली. त्यामध्ये, टीपू सुलतानच्या धार्मिक विध्वसांवर बोट ठेवले तर, दावोस करारातून साध्य केलेल्या उपलब्धींचा पाढा वाचला, विरोधकांचे आरोप परतवून लावताना त्यांनी केवळ विरोधासाठी विरोध केल्याने त्यांचे हसे होत असल्याचा शेलका कटाक्ष टाकला, याशिवाय एबीसीची रेड, नरहरी झिरवाळ प्रकरण, मराठी शाळा, हिंदी-मराठी भाषेसह अनेक विषयांवर चर्चा केली.

तसेच, सभागृहात आमदार भास्कर जाधव यांनी उपस्थित केलेल्या मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण अभियानासंदर्भातील प्रश्नावर उत्तर देताना तर ते असे काही बोलून गेले की, 'मुख्यमंत्री जेथे असेल तेथे अन्य मंत्र्याची काहीच किंमत नसते, त्यामुळे या अभियानातील प्रशिक्षणार्थींना कायम नोकरी देण्याची घोषणा कुणी करत असेल तर त्यांची शिफारस मी राज्यपालांकडे करेन'! हिंदी भाषा सक्तीचा निर्णय उध्दव ठाकरेंच्या काळातच झाल्याचे त्यांनी पुन्हा ठासून सांगताना ठाकरेबंधूना एकत्र आणल्याचे श्रेय आपल्याला दिले जात असल्याचा उल्लेख केला. त्यातून त्यांचा वाढलेला आत्मविश्वास आणि राज्याच्या कारभारावर आता 'पुन्हा येईन' च्या पुढचा टप्पा गाठल्याचे प्रतित होताना दिसत आहे. 'खुद से जितने की जिद है मुझे खुद ही को हराना है मै भिड नही हू दुनिया की मेरे अंदर एक जमाना है' या समुह माध्यमावर गाजलेल्या अज्ञात शायरीचा आधार घेत त्यांना लांबलेल्या प्रदिर्घ भाषणाचा समारोप केला.

### लालफितशाहीच्या एकाधिकार शाहीला शह

याच अधिवेशनात राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्याशी संबंधीत महामंडळाचे मुख्याधिकारी सभागृहाशी संबंधीत विषयाच्या बैठकीसाठी (ब्रिफींग) हजर न राहिल्याने त्यांना निलंबित करण्याचा प्रस्ताव सभागृहात आला आणि तो मंजूरही करण्यात आला. त्यावेळी अध्यक्ष राहूल नार्वेकर, मुख्यमंत्री किंवा विरोधीपक्षाचे महत्वाचे नेते सभागृहात नव्हते. विधानसभेच्या कामकाजाला तसेच मंत्र्यांना गृहीत धरणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंद्र सिंग यांना महागात पडले असून २६ फेब्रुवारी रोजी विधानसभेत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने राज्य शासनाने एम. देवेंद्र सिंग यांना निलंबित केले आहे. सामान्य प्रशासन विभागाने २७ फेब्रुवारी रोजी तत्संबंधाने आदेश निर्गमित केला आहे. त्यामुळे राज्यात अधिका-यांना हाताशी धरून सुरू असलेल्या लालफितशाहीच्या एकाधिकार शाहीला शह देण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे.

### आर्थिक नियोजनाचा बोजवारा

सध्या राज्य मंत्रिमंडळात काही मोजके मंत्री वगळता कोणतयाही मंत्र्याचे फारसे काही चालत नाही, अनेकांच्या खात्याला निधी नाही काम नाही अशी स्थिती आहे. तर काहींच्या खात्याचा निधी परस्पर अन्य योजनांकडे वळविण्यात आला आहे अशी स्थिती असल्याचे अर्थसंकल्पापूर्वी मांडण्यात आलेळ्या पंधरा हजार कोटी रूपयांच्या पुरवणी मागण्यातून स्पष्ट झाल्याचे दिसले. राज्याच्या मागील वर्षीच्या अर्थसंकल्पात १ लाख कोटींची तूट होती तर वर्ष संपताना सरकारकडून १ लाख कोटींच्या वाढीव मागण्या मांडण्यात आल्याने आर्थिक नियोजनाचा बोजवारा उडाला असून सरकारकडे आता विकासाच्या योजनांसाठी आवश्यक निधीच शिल्लक राहिला नसल्याचे स्पष्ट झाल्याचे या विषयातील तज्ज्ञ सांगत आहेत. सरकारकडून मांडण्यात आलेल्या पंधरा हजार कोटीच्या पुरवणी मागण्यापैकी मोठ्या प्रमाणात रक्कम शक्तिपीठ महामार्गासारख्या जनतेचा विरोध असलेल्या योजनेच्या भुसंपादनावर खर्च होत असल्याचे सांगण्यात येत आहे. राज्यात खनिकर्म आणि त्यासाठी आवश्यक भांडवली गुंतवणूकीवर हा पैसा खर्च होत असल्याचेही सांगण्यात येत आहे. मात्र भांडवलशहाच्या उद्योगांना या सुविधा पुरवण्यात येत असल्याचे वास्तव या चर्चातून बाहेर येणार नाही याची काळजी घेत १५हजार कोटीच्या मागण्यांपैकी केवळ दोन हजार कोटीच्या तरतूदीवर चर्चा घेवून अन्य मागण्या तश्याच मंजूर करण्यात आल्याचा आक्षेप शिंदेगटाचे आमदार डॉ निलेश राणे यांनी नेमकेपणाने केला. विधिमंडळाच्या या अधिवेशनात आता अर्थसंकल्प मुख्यमंत्री मांडणार आहेत. त्यामुळे आता सत्तेच्या चाव्या पूर्णत: त्यांच्याच हाती आल्या आहेत. गृह आणि वित्त अश्या दोन्ही महत्वाच्या विभागांच्या माध्यमातून 'फडणविशी' ते कशी करतात तेच आता पहायला मिळणार आहे!

**किशोर आपटे**

# संभाव्य युद्धाचा भारतावर होणारा परिणाम

इस्त्रायल, इराण आणि अमेरिका यांच्यातील वाढता तणाव आणि संभाव्य युद्धाचा भारतावर होणारा परिणाम हा अत्यंत गंभीर आणि बहुआयामी विषय आहे. जरी हे युद्ध भारताच्या भौगोलिक सीमांपासून दूर असले, तरी जागतिक अर्थकारण आणि राजकारणामुळे भारतावर याचे थेट आणि अप्रत्यक्ष परिणाम होतील.

महागाई आणि ऊर्जा संकट- इराण आणि इस्त्रायलमधील संघर्षाचा सर्वाधिक आणि पहिला फटका भारताच्या अर्थव्यवस्थेला बसू शकतो. कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ-भारत आपल्या गरजेच्या ८०% पेक्षा जास्त कच्चे तेल आयात करतो. मध्यपूर्वेत युद्ध सुरू झाल्यास कच्च्या तेलाचा पुरवठा विस्कळीत होईल. विशेषतः 'होरमुझची सामुद्रधुनी'बंद झाल्यास जागतिक स्तरावर तेलाचे भाव गगनाला भिडतील.पेट्रोल-डिझेलचे दर- तेलाच्या किमती वाढल्यामुळे भारतात पेट्रोल आणि डिझेल महाग होईल, ज्याचा परिणाम मालवाहतुकीवर होऊन जीवनावश्यक वस्तूंची महागाई वाढेल.रुपयाचे मूल्य-कच्च्या तेलासाठी अधिक डॉलर्स खर्च करावे लागल्यामुळे भारतीय रुपयाचे मूल्य डॉलरच्या तुलनेत घसरू शकते. व्यापारावर होणारा परिणाम-भारत आणि मध्यपूर्वेतील देशांमध्ये मोठा व्यापार होतो.निर्यात थांबणे-भारत या देशांना मोठ्या प्रमाणात तांदूळ, मसाले, चहा, कापड आणि औषधे निर्यात करतो. युद्धामुळे ही निर्यात ठप्प होऊ शकते. पुरवठा साखळी विस्कळीत होणे-तांबड्या समुद्रातील तणावामुळे जहाजांना लांबचा प्रवास करावा लागेल, ज्यामुळे आयात-निर्यात खर्च आणि वेळ दोन्ही वाढतील.चाबहार बंदर प्रकल्प-भारताने इराणमध्ये विकसित केलेले 'चाबहार बंदर' हे अफगाणिस्तान आणि मध्य आशियासाठी महत्त्वाचे आहे. युद्धामुळे या प्रकल्पाचे काम थांबून भारताच्या धोरणात्मक हिताला बाधा येऊ शकते. भारतीय समुदायाची सुरक्षा-मध्यपूर्वेतील देशांमध्ये (खाडी देश) सुमारे ९० लाख भारतीय राहतात आणि काम करतात.सुरक्षेचा प्रश्न-जर युद्ध पेटले, तर इराण आणि आसपासच्या देशांमध्ये राहणाऱ्या भारतीयांच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो.स्थलांतर आणि बेरोजगारी:-'ऑपरेशन गंगा' किंवा 'वंदे भारत' मिशनसारखी मोठी बचाव मोहीम राबवावी लागेल.



यामुळे सरकारवर आर्थिक ताण येईल आणि मायदेशी परतलेल्या लोकांमुळे बेरोजगारी वाढू शकते.

परकीय चलन- हे भारतीय दरवर्षी अब्जावधी डॉलर्स भारतात पाठवतात. युद्धामुळे हा परकीय चलनांचा ओघ कमी होऊन भारताच्या परकीय चलन साठ्यावर परिणाम होईल.राजनैतिक आणि धोरणात्मक आव्हान.भारतासाठी हा 'दोन्ही बाजूने कात्रीत' अडकल्यासारखा प्रकार आहे.इस्त्रायलशी मैत्री-संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रात इस्त्रायल भारताचा अत्यंत जवळचा मित्र आहे.इराणशी संबंध-ऊर्जा सुरक्षा आणि चाबहार बंदरासाठी इराण भारतासाठी महत्त्वाचा आहे.

अमेरिकेचे दडपण-अमेरिका भारताचा सर्वात मोठा व्यापारिक भागीदार आहे. अशा परिस्थितीत एखाद्याची बाजू घेणे भारतासाठी कठीण जाईल. भारताला आपले 'अलिप्ततावादी' धोरण राबवताना मोठी कसरत करावी लागेल. संरक्षण साहित्य-भारत इस्त्रायलकडून मोठी संरक्षण उपकरणे आणि क्षेपणास्त्रे खरेदी करतो. युद्धामुळे या उपकरणांचा पुरवठा लांबणीवर पडू शकतो. सायबर हल्ले: जागतिक स्तरावर युद्ध सुरू असताना सायबर हल्ल्यांचा धोका वाढतो, ज्याचा फटका भारताच्या बँकिंग किंवा पॉवर ग्रीड सिस्टीमला बसू शकतो.

थोडक्यात सांगायचे तर, इस्त्रायल-इराण-अमेरिका युद्ध भारतासाठी कोणत्याही दृष्टीने फायदेशीर नाही. यामुळे भारताची अर्थव्यवस्था मंदावू शकते, महागाई वाढू शकते आणि लाखो भारतीयांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. म्हणूनच भारत सातत्याने 'संयम' आणि 'मुत्सद्देगिरी' याद्वारे प्रश्न सोडवण्याचे आवाहन करत आहे.

**विरेंद्र सोनवने**
मो.८८८८२४८८८३

# राज्याची अर्थव्यवस्था सुदृढ...पण!

संवाद

राज्य सरकारने सन २०२९ पर्यंत एक लाख कोटी डॉलरच्या अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट सरकारने निर्धारित केले असून,राज्याची अर्थव्यवस्था आताच ५१ लाख कोटींवर पोहोचली आहे.याचे मनापासून स्वागत.कारण राज्याच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा होणे म्हणजे देशाच्या विकासाला हातभार लावणे होय.परंतु देशाचा केंद्र बिंदू आणि राज्याची उपराजधानी नागपूर आहे ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे.याच अनुषंगाने माझ्यामते राज्यातील व विदर्भातील युवावर्गानी रोजगारासाठी नागपूरमध्ये धाव घ्यायला पाहिजे होती, परंतु आज नागपूरसह विदर्भातील युवावर्ग रोजगारासाठी पुण्या-मुंबईत किंवा इतर राज्यात का धाव घेत आहे याचा गांभीर्याने सरकारने विचार करण्याची गरज आहे.देशातील एकूण गुंतवणूकीपेक्षा ३९ टक्के परदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात असल्याचे सांगितले जाते,मग राज्यातील संपूर्ण भागात भरघोस रोजगार निर्मिती का नाही? असे अनेक प्रश्न आजही राज्याच्या जनतेपुढे उपस्थित होतात.त्यामुळे सरकारने अर्थव्यवस्थेप्रमाणे रोजगार निर्मिती व वाढत्या महागाईनुसार रोजगारांना पगार दिले पाहिजे.सरकारने फक्त आश्वासने किंवा घोषणाबाजी करून चालणार नाही तर या संपूर्ण गोष्टी कृतीत बदलविल्या पाहिजे. त्याचप्रमाणे राज्याचा विकास भरभराटीला न्यायचा असेल तर सर्वप्रथम वाढत्या महागाईवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.कारण महागाई सर्वच गोष्टींमध्ये अडचण निर्माण करीत असते.

**रमेश लांजेवार**

# कौटुंबिक वादातून पत्नीची कु-याडीने निघृण हत्या

## शेतात मृतदेह लपवून आरोपी पती फरार, अवघ्या काही तासांतच बेड्या

जनमाध्यम प्रतिनिधी





यवतमाळ - सततच्या कौटुंबिक वादातून पतीने आपल्या पत्नीची कुऱ्हाडीने गळा चिरून निघृण हत्या केली. ही घटना वडकी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या बोरी (इचोड) शेतशिवारात रविवार, १ मार्च रोजी उघडकीस आली आहे.

वैजयंतीमाला श्रीनिवास येलके (४५) असे मृत महिलेचे नाव असून, याप्रकरणी पती श्रीनिवास येलके (५०) याला पोलिसांनी अटक केली आहे. पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मागील काही दिवसांपासून पती पत्नी दोघांमध्ये घरगुती कारणावरून खटके उडत होते. अशातच शनिवारी दुपारी वैजयंतीमाला आणि श्रीनिवास हे दोघेही आपल्या मालकीच्या शेतात तूर काढणीसाठी गेले होते. शेतात काम सुरू असतानाच त्यांच्यात पुन्हा कडाक्याचे भांडण झाले. यावेळी संतापाच्या भरात असलेल्या श्रीनिवासने कुऱ्हाडीने पत्नीच्या गळ्यावर सपासप वार केले. या हल्ल्यात वैजयंतीमाला यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर श्रीनिवासने कोणाला संशय येऊ नये, यासाठी पत्नी वैजयंतीमालाचा मृतदेह शेतातील तुरीच्या गंजीमध्ये लपवून ठेवला आणि तिथून पळ काढला. रविवार, १ मार्च रोजी सकाळी ८ वाजताच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच वडकी पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुखदेव बोरखडे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनीही भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी तत्काळ फॉरेन्सिक लॅबच्या पथकाला पाचारण करून पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी राळेगाव येथे पाठवण्यात आला आहे. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत संशयाच्या आधारावर पती श्रीनिवासला ताब्यात घेतले. सुरुवातीला त्याने पोलिसांना गुंगारा देण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसी खाक्या दाखवताच त्याने पत्नीची हत्या केल्याची कबुली दिली. वारंवार होणाऱ्या वादातून आणि अपमानातून सुटका मिळवण्यासाठी आपण हे कृत्य केल्याचे त्याने कबूल केले आहे. या प्रकरणाचा अधिक तपास ठाणेदार सुखदेव बोरखडे यांच्या मार्गदर्शनाखाली वडकी पोलीस करत आहेत.

# रेमण्ड युको डेनिम लोहारा येथे संपावर तोडगा ; कामगारांचे उपोषण मागे



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : Raymond UCO Denim Pvt. Ltd., लोहारा येथे सुरू असलेल्या कामगारांच्या संप व आमरण उपोषणाला अखेर १ मार्च २०२६ रोजी झालेल्या बैठकीत तोडगा निघाला. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्रपाळीपासून कामगारांनी संप पुकारला होता, तर १८ फेब्रुवारीपासून एका कामगाराने आझाद मैदान येथे आमरण उपोषण सुरू केले होते.

तडजोडीसाठी कंपनी परिसरात झालेल्या बैठकीस आमदार बाळासाहेब मांगूळकर, व्यवस्थापनाचे प्रतिनिधी नितीनकुमार श्रीवास्तव व चंद्रशेखर पातुरकर, कामगार विभागाचे अधिकारी तसेच कामगार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. संपकरी कामगारांनी वेतन करार २०२४ अंतर्गत ७२५० रुपयांपेक्षा अधिक वाढ, १९ निलंबित/बडतर्फ कामगारांची विनाअट पुनर्नियुक्ती, संपकाळातील पूर्ण वेतन, बोनस करारात २० टक्के वाढ, पॅकेज रकमेची टप्प्याटप्प्याने अदा व ८०० कामगारांना देण्यात आलेल्या रिट्रेन्चमेंट नोटिसा रद्द करण्याच्या मागण्या मांडल्या. व्यवस्थापनाने अंतिम प्रस्तावात वेतनवाढ ५७०० रुपये (प्रत्यक्ष) देण्याचे मान्य केले. १९ कामगारांना विनाअट कामावर घेण्यास तसेच सर्वांकडून चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र घेण्याचे ठरले. संपकाळातील अनुपस्थितीबाबत ५० टक्के वेतन रोख देण्यात येईल, तर उर्वरित ५० टक्के रजा खात्यातून समायोजित करण्यात येईल. बोनस करारात २० टक्के वाढ मान्य नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. पॅकेज रक्कम ५०-१०-१०-३० टक्के अशा चार टप्प्यांत देण्यात येणार असून थकबाकीपैकी ५० टक्के रक्कम २० मार्च २०२६ पर्यंत व उर्वरित ५० टक्के डिसेंबर २०२६ पर्यंत अदा केली जाईल. तसेच ५०० कामगारांना दिलेल्या रिट्रेन्चमेंट नोटिसा रद्द करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली. रेमण्ड कामगार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी व संपकरी कामगारांनी हा प्रस्ताव मान्य केल्याने संप व उपोषण मागे घेण्यात आले. तृतीय पाळीपासून कामगार कामावर रुजू झाल्याने कंपनीचे कामकाज पुन्हा सुरू झाले आहे.

# पोलीस स्टेशन पांढरकवडाची मोठी कारवाई एनएच-४४ लगत गांजा विक्रीचा पर्दाफाश

## २.१२० किलो मुद्देमालासह चौघांना अटक

जनमाध्यम प्रतिनिधी



पांढरकवडा - दि.२७ फेब्रुवारी २०२६ पोलीसांनी एनएच-४४ महामार्गालगत सुरू असलेल्या गांजा विक्री प्रकरणाचा पर्दाफाश करत २ किलो १२० ग्रॅम गांजा व इतर मुद्देमाल जप्त केला असून चार आरोपींना अटक केली आहे. २७/०२/२०२६ रोजी पोलीस स्टेशन पांढरकवडा येथे गोपनीय माहिती मिळाली की, ग्राम पिपरी रोड येथील संदीप उर्फ बापू नामदेव गंधेवार (वय ३३) हा आपल्या शेताजवळ पांढऱ्या रंगाच्या मोपेडमधून ग्राहकांना प्लास्टिक पुड्यांमध्ये गांजा विक्री करीत आहे.या माहितीच्या आधारे मा. सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. रॉबीन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली एनडीपीएस कायद्यांतर्गत आवश्यक परवानगी घेऊन सापळा रचण्यात आला.

पोलिसांनी केलेल्या कारवाईत पुढील आरोपी मिळून आले -संदीप उर्फ बापू नामदेव गंधेवार (वय ३३, रा. वार्ड क्र. ०१, पिपरी रोड, ता. केळापूर, जि. यवतमाळ)आर्यन सतीश मुन (वय २१, रा. महात्मा ज्योतीबा फुले वार्ड, पांढरकवडा) सुजल अनिल कावडे (वय २१, रा. राममंदिर वार्ड, पांढरकवडा) त्यांच्या अंगझडती व वाहनाच्या डिक्कीतून ६८ लहान पारदर्शक प्लास्टिक पुड्यांमध्ये ३६९ ग्रॅम गांजा (फुले, पाने, बिया सहित) जप्त करण्यात आला.

प्रत्येक पुडी किंमत १५० रुपये प्रमाणे एकूण किंमत १०,२०० रुपये होती.या प्रकरणी पो.स्टे. पांढरकवडा येथे अपराध क्र. ३२८/२०२६ अन्वये कलम ८(क), २०(ब), २९ एनडीपीएस ॲक्ट तसेच भा.न्या.स. संहितेच्या कलम ३(५) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. वणी येथून मुख्य पुरवठादार अटक मुख्य आरोपीच्या कबुलीजबाबावरून वणी येथील निखील हेमंत घोडंगी (वय ३०, रा. चिखलगाव, वणी) याच्या राहत्या घराची झडती घेण्यात आली. त्यावेळी १ किलो ७५१ ग्रॅम गांजा (किंमत ३५,०२० रुपये) जप्त करण्यात आला. त्यालाही ताब्यात घेण्यात आले आहे.एकूण १.६० लाखांचा मुद्देमाल जप्त सदर कारवाईत आरोपींकडून एकूण - २ किलो १२० ग्रॅम गांजा (किंमत ४७,२२० रुपये) चार मोबाईल फोन (किंमत ४०,००० रुपये) दोन मोटरसायकली (किंमत ७५,००० रुपये) असा एकूण १,६०,२२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई मा. कुमार चिंता,मा. अशोक थोरात व मा.रॉबिन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार एल.डी. तावरे यांच्या नेतृत्वात पार पडली असून पुढील तपास सपोनि स्माकांत स्वंदारे करीत आहेत.

# • वेचक

## ट्रॅक्टरचलीत मळणीने हरभरा काढणीला वेग

महागाव : बदलत्या वातावरणाचा आणि अवकाळी पावसाचा अंदाज लक्षात घेता परिसरातील शेतकऱ्यांनी हरभरा काढणीसाठी अक्षरशः धावपळ सुरू केली आहे. गत चार-पाच दिवसांपासून शेतशिवारात ट्रॅक्टरच्या घरघराटासह मळणीची लगबग पाहायला मिळत आहे. यंदा हरभऱ्याला चांगली वाढ झाल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान होते. मात्र अचानक ढगाळ वातावरण व अवकाळी पावसाची शक्यता निर्माण होताच शेतकऱ्यांनी आपला वाळलेला हरभरा शेतात गंजी लावून मुळीद्वारे काढण्यास प्राधान्य दिले आहे. काढणीला आलेला माल झटपट काढून घेण्याचा मार्ग शेतकऱ्यांनी स्वीकारला असून ट्रॅक्टरचलित मळणी यंत्राद्वारे वेगाने मळणी केली जात आहे. शेतात सकाळपासूनच शेतकरी कुटुंबियांसह राबताना दिसत आहेत. कुठे गंजी बांधण्याची घाई, तर कुठे मळणीसाठी ट्रॅक्टर लावण्याची धावपळ दिसून येत आहे. पावसाचा अंदाज आहे, त्यामुळे जो माल तयार आहे तो लगेच काढून घेत आहोत, असे एका शेतकऱ्याने सांगितले. हरभरा हे नगदी पीक असल्याने त्याच्या गुणवत्तेवर हवामानाचा मोठा परिणाम होतो. अवकाळी पावसामुळे दाण्याचा रंग व दर्जा घसरू नये, यासाठी शेतकरी काढणी व मळणी झपाट्याने पूर्ण करत आहेत. महागाव परिसरातील शेतशिवारात सध्या हरभरा काढणीची लगबग शिगेला पोहोचली असून बदलत्या हवामानाशी दोन हात करत शेतकरी आपला मेहनतीचा माल सुरक्षित करण्यासाठी झटत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## अमेरिका-इराण युद्धात यवतमाळचे सहा जण दुबईत अडकले

यवतमाळ - आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू असलेल्या अमेरिका-इराण तणावाच्या पार्श्वभूमीवर विमानसेवांवर परिणाम होत असून त्याचा फटका थेट यवतमाळ जिल्ह्यातील सहा प्रवाशांना बसला आहे. हे सर्वजण २४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी दुबई येथे पोहोचले होते. नियोजित कार्यक्रम आटोपून ते परतीच्या प्रवासाला निघणार असतानाच त्यांची फ्लाईट अचानक रद्द झाल्याची माहिती त्यांना मिळाली आणि ते तेथेच अडकून पडले. दुबईत अडकलेल्या प्रवाशांमध्ये जागृती रवींद्र जाधव, राजीव निलावार, राजू लोहाना, सतीश बनगिनवार, निखील जिरापूर (सर्व रा. यवतमाळ) तसेच श्याम पाटील (रा. दिग्रस) यांचा समावेश आहे. मध्यपूर्वेतील तणावपूर्ण परिस्थितीमुळे अनेक उड्डाणे रद्द किंवा पुढे ढकलण्यात येत असल्याने त्यांना पुढील उपलब्ध फ्लाईटची प्रतीक्षा करावी लागत आहे.सदर सहाही जण सुरक्षित असल्याची माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी दिली असली, तरी अनिश्चिततेमुळे नातेवाईकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. विमान कंपन्यांकडून पर्यायी उड्डाणाची व्यवस्था करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, परराष्ट्र मंत्रालयामार्फत परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असल्याची माहिती मिळत आहे. लवकरात लवकर परतीची सोय व्हावी, अशी अपेक्षा कुटुंबीयांकडून व्यक्त केली जात आहे.

## भुलाई ते भांडेगाव मार्गावरील टोल नाका बंद करा

दारव्हा : कारंजा मार्गावरील भुलाई ते भांडेगाव मध्यतंरी सुरू करण्यात आलेला टोल नाका तत्काळ बंद करण्यात यावा. अन्यथा ११ मार्च रोजी टोलनाक्यावर काँग्रेस पक्ष, महाविकास आघाडी, मित्र पक्षाचे वतीने तोडफोड आंदोलन करण्याचा इशारा तालुकाध्यक्ष प्रकाश नवरंगे यांनी दिला आहे. भुलाई ते भांडेगाव मध्यंतरी सुरू करण्यात आलेल्या टोल नाक्यामुळे दैनंदिन कारंजा व दारव्हा बाजारपेठेत शेतकऱ्यांचा, व्यापाऱ्यांचा, शेतीमाल, कारंजा व दारव्हा येथे दैनंदिन शिक्षणासाठी येणे जाणे करणाऱ्या विद्यार्थ्यांना व स्थानिक परिसरातील शेतकरी, व्यापाऱ्यांसह नागरिकांना नाहक अतिरिक्त भुर्दड सहन करावा लागत आहक. हा टोल नाका कायमस्वरूपी बंद करण्यात यावा, यासाठी मुख्यमंत्री, बांधकाममंत्री व जिल्हाधिकाऱ्यांना उपविभागीय अधिकारी दारव्हा यांच्यामार्फत काँग्रेस पक्षाच्या वतीने दोन मार्च रोजी दुपारी १२ वाजता मागणी करण्यात येणार आहे. यासाठी माजी जि.प. अध्यक्ष राहुल ठाकरे, न.प. गटनेता सैय्यद फारुक, जि.प. चे माजी सभापती ज्ञानेश्वर बोरकर, मनमोहन सिंग चव्हाण, माजी नगराध्यक्ष अशोक चिरडे, माजी न.प. सदस्य पंढरीनाथ सिंहे, युकाँचे माजी अध्यक्ष गजानन बिबेकर, काँग्रेस पक्षाचे, तालुक्यातील व शहरातील, महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, सेवादल काँग्रेस, ओबीसी सेल, अल्पसंख्यांक सेल अनुसूचित जाती, जमाती सेल, एन.एस.यु. आय, व सर्व सेलचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, यांच्या प्रमुख उपस्थितीत निवेदन देण्यात येणार आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समितीतर्फे विदर्भस्थरीय महिला क्रिकेट संघाचा गौरव



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित दुसऱ्या पर्वातील चाळीसावे पूजन रविवारी दि.१ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता यवतमाळ येथील म. फुले चौक,आझाद मैदान समोर उत्साहात पार पडले.या पूजनाचा मान नुकत्याच पारपडलेल्या विदर्भस्थरीय महिला क्रिकेट संघाच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी यवतमाळ येथे पार पडलेल्या विदर्भस्तरीय क्रिकेट स्पर्धाच्या विजेता महिला संघाने यवतमाळ शहराचे नाव उज्ज्वल केल्याबद्दल सहभागी महिला संघाचा समितीतर्फे त्यांचा विशेष गौरव करण्यात आला.यावेळेस कर्णधार अनिता वराडे,क्रांती राऊत, ज्योती मसराम व आदी क्रिकेट पटुंचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास शोभा पुनसे, माला पुनसे,लतिका शेळके,श्रेया शिंदे,पवन थोटे,सुरेश भावेकर,पुरुषोत्तम ठोकळ,शशिकांत लोळगे, विजय शिंदे,सुनील सोडगीर, प्रदीप पुनसे, बलदेव गायनर, किशोर शेळके, डॉ. अशोक पुनसे, विष्णू गाडेकर,विजय जाधव, निलेश चामाटे,विलास अवघड,श्याम उघडे,दत्तात्रय फोकमारे,मंगेश खांदेल,पंकज अवघड, अविनाश कोल्हे, श्याम इंगलवार, स्वप्नील मिठे, विलास येवतीकर, शेखर येणोरकर, मंगेश गोडंबे, पंकज राऊत, सुमेद मेश्राम, चंद्रकांत हुडे आदी समाजबांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिरा देशमुखला 'विशेष सर्वोत्कृष्ट युवा पुरस्कार'; छत्रपती महोत्सवात सन्मान

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - आपल्या अष्टपैलू बुद्धिमत्तेने आणि नेतृत्वाने आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे नाव उज्ज्वल करणारी यवतमाळ येथील हिरा राखी देशमुख हिला शिवजयंती निमित्त आयोजित छत्रपती महोत्सवात 'विशेष सर्वोत्कृष्ट युवा पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. माजी मंत्री माणिकराव ठाकरे आणि राजाभाऊ ठाकरे यांच्या हस्ते हिराला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हिरा सध्या यवतमाळ पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता अकरावतीत विज्ञान शाखेत शिक्षण घेत आहे. इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत तिने कोणत्याही विषयाची खाजगी शिकवणी न लावता घवघवीत यश संपादन केले. दहावीच्या परीक्षेत तिने मराठी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून आपल्या भाषिक क्षमतेची मोहोर उमटवली. वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी हिराने महाभारत, भगवद्गीता, बायबल आणि कुराण यांसारख्या ग्रंथांचे सखोल वाचन पूर्ण केले आहे. यासोबतच तिला विज्ञान, मायथॉलॉजी, वास्तुशास्त्र आणि अध्यात्म अशा विविध विषयांत विशेष रुची आहे. तिने छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्यावर आधारित कविता लेखन करून आपली सर्जनशीलता सिद्ध केली आहे. व्हिएतनाममध्ये नुकत्याच पार पडलेल्या ७ व्या आंतरराष्ट्रीय युवा शिखर संमेलनात तिने भारताचे प्रतिनिधित्व केले. तिच्या प्रकल्पाला तेथे 'मोस्ट सस्टेनेबल प्रोजेक्ट अवॉर्ड' देऊन सन्मानित करण्यात आले. याशिवाय नागपूर येथील 'मॉडेल युनायटेड नेशन' स्पर्धेतही तिने 'बेस्ट व्हर्बल मेंशन' पुरस्कार पटकावला आहे.

# विज्ञान दिनानिमित्त विविध उपक्रमांचे उत्साहात आयोजन




जनमाध्यम प्रतिनिधी

पाटणबोरी - मांडवी येथील राजीव माध्यमिक व सूर्यतेज उच्च माध्यमिक विद्यालयात विज्ञान दिनानिमित्त विविध उपक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही विज्ञान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमानिमित्त विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, भाषण स्पर्धा आदी विविध उपक्रम घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत आपल्या ज्ञानाची चमक दाखवली. स्पर्धांमधून विज्ञानाविषयीची आवड आणि जिज्ञासा अधिक वृद्धिंगत झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री आगलावे सर, पांपट्टीवार मॅडम, भेदोडकर सर, बोळकुंटवार सर, कोगुरवार सर, बल्लाळ मॅडम, नुगुरवार सर, मारुती भाऊ व कासावार भाऊ यांनी अथक परिश्रम घेतले. विद्यालयाचे प्राचार्य श्री टोंगलवार सर यांनी मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना विज्ञाननिष्ठ विचारसरणी जोपासण्याचे आवाहन केले. कार्यक्रमामुळे विद्यालयात वैज्ञानिक दृष्टिकोनाची जाणीव अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# शासकीय वस्तीगृहात निकृष्ट 'तूप' प्रकरणी संतापाची लाट

## विद्यार्थ्यांचा प्रशासनावर दुर्लक्षाचा आरोप, चौकशी व कारवाईची मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - नेर-दारव्हा रोडवरील सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वस्तीगृहात एससी, एसटी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना निकृष्ट व भेसळयुक्त तूप पुरविले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तुपाची चव, वास आणि दर्जा संशयास्पद असल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी वारंवार करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप विद्यार्थ्यांकडून करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांनीच पुढाकार घेत हा प्रकार उघडकीस आणला. संबंधित अधिकाऱ्यांकडे यापूर्वीही तक्रारी देण्यात आल्याची माहिती विद्यार्थ्यांनी दिली. मात्र त्यावर ठोस कारवाई न झाल्याने संताप व्यक्त होत आहे. शासकीय वस्तीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी थेट संबंध असलेल्या अन्नपुरवठ्यात असा हलगर्जीपणा गंभीर मानला जात आहे. याप्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारांवर तातडीने कारवाई करावी, तसेच संबंधित तुपाचे अन्ननमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत, अशी जोरदार मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे. केवळ या एकाच वस्तीगृहापुरती मर्यादित चौकशी न करता जिल्ह्यातील सर्व शासकीय वस्तीगृहांतील अन्नपुरवठ्याची सकल तपासणी व्हावी, अशीही मागणी होत आहे. सामाजिक न्याय विभागांतर्गत येणाऱ्या या वस्तीगृहांकडे समाज कल्याण अधिकारी मंगला मून यांनी गांभीर्याने लक्ष देणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्यांना पाठीशी घालण्याऐवजी प्रशासनाने तातडीने कारवाई करून विश्वास पुनर्स्थापित करणे गरजेचे आहे. अन्यथा विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची ठिणगी पेटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# आरटीई प्रवेशासाठी अर्जाचा पाऊस; १० मार्चपर्यंत मुदत

## जिल्ह्यात १० दिवसांत दोन हजार २८० अर्ज, २०० शाळांमधील दोन हजार १७२ जागांवर प्रवेश

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिकार अधिनियमानुसारयन (आरटीई) शाळांमधील २५ टक्के राखीव जागांच्या प्रवेश प्रक्रियेला जिल्ह्यात मोठा प्रतिसाद मिळत आहे. १७फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या या प्रक्रियेत अवघ्या १० दिवसांत जिल्ह्यात २ हजार २८० अर्ज प्राप्त झाले आहेत. जिल्ह्यातील २०० शाळांमधील २ हजार १७२ जागांसाठी ही प्रवेश प्रक्रिया राबविली जात असून, पालकांना १० मार्चपर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहेत.


सामाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत व वंचित घटकातीलसून दूर मुले RTE राहू नये, त्यांना Right-मुख्य प्रवाहात आणण्यासाठी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिकार अधिनियमानुसार, आरटीई प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. या प्रवेश प्रक्रियेतून मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत २५ टक्के जागांवर मोफत प्रवेश दिला जातो. मागील वर्षी जिल्ह्यात १९७शाळांमधून १,९७० बालकांना प्रवेश देण्यात आला होता. मात्र, मागील To-Education वर्षी प्रवेश प्रक्रिया विविध तांत्रिक आणि प्रशासकीय कारणांमुळे प्रचंड चर्चेत राहिली होती. यंदा तसा कोणताही गोंधळ होऊ नये, यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घेतली आहे. ऑनलाईन पोर्टलवर इंग्रजी माध्यमांच्या शाळांच नोंदणी प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर १७ फेब्रुवारीपासून ऑनलाईन अर्ज प्रक्रियेला सुरुवात झाली. ही ऑनलाइन अर्ज प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ऑनलाइन लॉटरी काढण्याची तारीख निश्चित करण्यात येईल. २०२६-२७ या वर्षासाठी आरटीई अंतर्गत एकाच टप्प्यात लॉटरी काढली जाईल. तसेच शाळेत उपलब्ध जागा एवढी एक प्रतीक्षा यादी तयार केली जाईल. प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्याला पुरेसा कालावधी दिला जाईल. जागा रिक्त राहिल्यास पहिल्या प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना मॅसेज पाठविण्यात येणार आहे.

यंदा शाळा नोंदणीसाठी दोनवेळा मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर जिल्ह्यातील २०० इंग्रजी माध्यमाच्या शाळा पात्र ठरल्या आहेत. या शाळांमध्ये एकूण २,१७२ जागा उपलब्ध आहेत. आतापर्यंत उपलब्ध जागांपेक्षा अधिक अर्ज आल्याने यंदा प्रवेशासाठी मोठी चुरस पाहायला मिळणार आहे.

यंदा विनाअनुदानित शाळांसाठी प्रवेशाकरिता १ किलोमीटर अंतराची जाचक अट लादण्यात आली आहे. यापूर्वी ही मर्यादा ३ किलोमीटरपर्यंत होती. या नवीन अटीमुळे दुर्गम भागातील आणि शहरातील अनेक गरीब विद्यार्थी मोफत शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही अट रद्द करून जुनीच मर्यादा कायम ठेवावी, अशी मागणी विविध सामाजिक संघटनांकडून होत आहे.

# चिंतेत वाढ : सीसीआयच्या कापूस खरेदीसाठी मुदतवाढ अपुरी ?

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ : सीसीआयने कापूस खरेदी करण्यासाठी १५ मार्चपर्यंतची मुदतवाढ दिली आहे. या कालावधीत चार ते पाच दिवस सुटींचेच आले आहे. त्यामुळे उर्वरित १५ दिवसांत ४८ हजार शेतकरी कापूस विक्रीसाठी नोंदणी करू शकतील काय, असा प्रश्न आता विचारला जात आहे. त्यातून शेतकरीवर्गात नव्याने चिंतेचे सावट पसरले आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील ४८ हजार शेतकऱ्यांना नोंदणीनंतरही कापूस विक्री करता आली नाही. या शेतकऱ्यांना संकलन केंद्रावर कापूस विक्री करण्यासाठी प्रत्येक दिवशी ठराविक वाहनांनाच प्रवेश राहणार आहे. जिल्ह्यातील १३ केंद्रांचा विचार केला तर मोजक्याच वाहनांना केंद्रात प्रवेश मिळणार आहे. मात्र, इतर वाहनांना आतमध्ये उर्वरित दिवसात प्रवेशच मिळणार नाही. याशिवाय नव्याने अनेक शेतकरी या कालावधीत कापूस विक्रीसाठी नोंदणी करणार आहे. या शेतकऱ्यांना या केंद्रात कापूस विक्रीसाठी प्रवेश न मिळाल्यास या शेतकऱ्यांना खुल्या बाजारात कापूस विकावा लागण्याची शक्यता आहे. कापूस संकलन केंद्रात कापूस विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया राबविताना शेतकऱ्यांना बाजारसमितीमध्ये जावे लागते. बाजार समित्यांचा सण, उत्सवांमुळे बंद आहे. यामुळे पुढील दहा दिवसांत या केंद्रावर शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कापूस विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांना चांगलीच कसरत करावी लागणार आहे.

# नो-पार्किंग झोनचा विषय परिवहनमंत्र्यांच्या दालनात

## उमरखेड बसस्टॉप परिसरातील प्रकार, २०० मीटर नो पार्किंग झोनमध्ये अवैध प्रवासी वाहतूक

जनमाध्यम प्रतिनिधी

उमरखेड - येथील बस स्टॉप परिसरात होत असलेल्या २०० मीटर नो-पार्किंग झोनमध्ये अवैध प्रवासी वाहतुकीचा मुद्दा ऐरणीवर आला होता. या अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या ट्रॅव्हल्स चालकांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. त्यातच आता सदर प्रकरण आता परिवहनमंत्र्यांच्या दालनात गेले आहे.

२७ फेब्रुवारी रोजी मंत्रालय येथे परिवहन मंत्र्याच्या दालनात बस स्टॉप परिसरातील २०० मीटर नो पार्किंग झोनमध्ये होत असलेल्या अवैध प्रवासी वाहतुकी संदर्भात महत्त्वाची बैठक बोलावण्यात आली होती. सदर बैठकीत अवैध प्रवासी वाहतुकीमुळे महाराष्ट्र परिवहन महामंडळाचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचा मद्दा चर्चीला जाणार आहे. परिवहनमंत्र्यांच्या दालनात झालेल्या अवैध प्रवासी वाहतुकी संदर्भातील बैठकीनंतर लगेच विभाग नियंत्रक परिवहन महामंडळ यवतमाळ यांनी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यवतमाळ यांना तत्काळ अशा अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची माहिती देत अशा वाहनांवर तत्काळ कायदेशीर कारवाई करून रा.प महामंडळाला सहकार्य करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर आता उपप्रादेशिक परिवहन विभाग यवतमाळ यांच्यामार्फत काय कारवाई केली जाते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पिंपळगाव सूतगिरणीत 'चेक बाऊन्स'चा स्फोट

महागाव : सूतगिरणी चालविण्याच्या करारातून उद्भवलेल्या वादात, दहा लाख रुपयांचा धनादेश अनादरित झाला आहे. याप्रकरणी सूतगिरणीचे अध्यक्ष शामराव पाटील यांच्यासह २० संचालकांना कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे. हा प्रकार बा.ना. कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणी येथे उघडकीस आला. पिंपळगाव येथील ही सूतगिरणी अकोला येथील कृष्णा फायबर्स यांना भागीदारी तत्त्वावर चालवण्यासाठी देण्यात आली होती. ३१ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या करारानुसार, व्याजापोटी ठेव म्हणून ५० लाख रुपये आणि करारांतर्गत १ कोटी रुपये, अशी एकूण १ कोटी ५० लाख रुपयांची रक्कम संबंधितांकडून प्राप्त झाली होती. नियमानुसार १० लाख रुपयांच्या वरील व्यवहारासाठी परवानगी आवश्यक असते. या व्यवहाराच्या अनुषंगाने प्रत्येक संचालकाकडून १० लाख रुपयांचे सात धनादेश देण्यात आले होते. यात युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा पुसद येथून ३१ डिसेंबर २०२५ रोजी १० लाख रुपयांचा एक धनादेश काढण्यात आला होता. हा धनादेश २९ जानेवारी २०२६ रोजी एसबीआय, शाखा अकोट येथे वटवण्यासाठी जमा केला असता, खात्यात 'पुरेशी शिल्लक नसल्याने' तो अनादरित झाला. धनादेश बाऊन्स झाल्याने सूतगिरणीचे अध्यक्ष शामराव भाऊराव पाटील, व्यवस्थापकीय संचालक एम. आय. पात्री यांच्यासह एकूण २० संचालकांना २६ फेब्रुवारीला उच्च न्यायालयाचे अधिवक्ता आर. बी. अग्रवाल यांच्यामार्फत कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे. सदर रक्कम १५ दिवसांच्या आत अदा करावी. रक्कम न दिल्यास कलम १३८ अंतर्गत फौजदारी कारवाई केली जाईल. असे नोटिसीमध्ये नमूद आहे. सूतगिरणीचे संचालक मंडळ या कायदेशीर कचाट्यात सापडल्याने सभासद, कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### 'हॉर्टिकलचर डे-' निमित्त डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाला भेट

**अमरावती-**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या उद्यानविद्या महाविद्यालयाच्या पुढाकाराने 'हॉर्टिकलचर डे- २०२६' हा उपक्रम राबविण्यात आला असून जिरायती शेती पद्धतीचा वापर असलेल्या विदर्भात शेती शाश्वत आणि शेतकऱ्यांची भरभराट व्हावी हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या निमित्त आयोजित प्रदर्शनाला पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयाच्या चतुर्थ सत्राच्या विद्यार्थ्यांनी भेट देऊन उद्यानविद्या विभागाचे तंत्रज्ञान जाणून घेतले. विदर्भातील वातावरणात उत्पादित होणारे व बाजारपेठेत चांगली मागणी असणारी फळे, भाजीपाला व फूल पिकांचे प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांनी पाहून शास्त्रज्ञांकडून लागवड तंत्रज्ञान जाणून घेतले. या प्रदर्शनामध्ये २१ भाजीपाला पिकांचे ३४ वाण २० एकर क्षेत्रावर तसेच १७ फळ पिकांचे ३४ वाण २०० एकर क्षेत्रावर आणि २३ विविध फूल पिकांचे ३१५ शोभिवंत प्रकार १० एकर क्षेत्रावर असे एकूण २३० एकर क्षेत्रावर उद्यानविद्या विषयक ५८ पिकांचे ३८३ पीक प्रात्यक्षिके सर्व तंत्रज्ञानासह प्रत्यक्ष पाहण्याचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. कृषी महाविद्यलयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे व उप प्राचार्य नितेश चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली या भेटीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. स्वप्नील देशमुख व प्रा. प्राप्ती दंदे यांच्यासह ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

### विकसित भारत जिल्हास्तरीय युथ पार्लमेंट

**अमरावती-** मेरा युवा भारत अमरावती, युवा कार्यक्रम एवं खेळ मंत्रालय भारत सरकार, व बॅरी. आर.डि.आय.के. महाविद्यालय बडनेरा द्वारा ५ मार्च २०२६ ला सकाळी ९ वाजता युथ पार्लमेंटचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील १८ ते २५ वयोगटातील युवकांचा यात सहभाग राहणार आहे. विकसित भारत जिल्हास्तरीय युवा संसद यामध्ये जिल्हास्तरीय चर्चेचा विषय हा ङ'आणीबाणीच्या ५० वर्षे : भारतीय लोकशाहीसाठीचे धडे'ङ हा असून सहभागी स्पर्धक इंग्रजी, हिंदी किंवा मराठी भाषेत विकसित भारत युथ पार्लमेंट २०२६ मध्ये आपले मत मांडू शकतात. जिल्हास्तरावर निवडलेल्या उत्तम ५ विजेते राज्यस्तरीय फेरीसाठी पात्र ठरले जातील. विधानसभा मुंबई येथे त्यांचा प्रत्यक्ष सहभाग राहील. राज्यस्तरीय विजेते स्पर्धक दिल्ली येथील संसदेमध्ये सहभाग घेतील.संसदेचे मुख्य उद्देश्य युवकांध्ये नेत्तृत्व कौशल्य वाढवुन समाजाच्या उन्नती आणि योगदान करिता युवकांना प्रेरित करण्याचे आहे. या युवा संसदे करिता १८-२५ वयोगटातील तरुण यात सहभागी होऊ शकतात.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. देखमुख राहतील तर उपसंचालक मेरा युवा भारत मा. स्नेहल बासुतकर यांचे उपस्थिती लाभणार असून जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी युवा संसद कार्यक्रमांमध्ये सहभाग घेण्याचे आव्हान महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे. जिल्हास्तरीय युवा संसदेकरिता सहभाग नोंदवण्याकरिता mybharat.gov.in वर अर्ज करावे.



### सुरक्षा रक्षक व कंत्राटी कर्मचारी सेना मेळावा

**लेहेगाव-**अचलपूर विभाग व्दारा आयोजित महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक व कंत्राटी कर्मचारी कामगार सेनेचा मेळावा धारणी येथे विविध विषयांवर संपन्न झाला.मेळाव्यामध्ये विविध विषयांवर चर्चा करतांना सुरक्षा रक्षक यांना कळविण्यात आले की आपल्या कर्तव्यावर असताना संपूर्ण गणवेशात रहावे, प्रशासन केव्हा आपल्यावर हात टाकेल सांगता येत नाही संघटनेशी एक जुटीने रहाल तर टिकाल. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक व कंत्राटी कर्मचारी सेनेचे मोहम्मद वासिक, रामकृष्ण चिखलकर पंकज सोनटक्के, पंकज शिंदे, अजय पाटील, मंगेश घुलक्षे, श्रीकांत वानखडे यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.संचालन विनोद पोटे यांनी केले यावेळी शैलेश पाटील, विशाल दाभाडे, आठवले, ओमप्रकाश मेटकर अजय मावस्कर, गणेश मेटकर, शरद वाठोरे, भरत राठोड, गोपाल खडके, विजय मावस्कर, मुकेश कस्तुरे, अमर पवार, अनिल गिरी,शेख सलीम शेख हमीद, विजय खाडे, राजणे, इंगोले, कथे, युवराज ठाकुर, जच्चू भास्कर, राजु भाऊ काळमेघ,आदी उपस्थित होते.





### संत गाडगेबाबा यांना अभिवादन

**अमरावती-**थोर समाजसुधारक कर्मयोगी संत गाडगेबाबा यांची १५० वी जयंतीचा कार्यक्रम श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांचे प्रमुख उपस्थितीत महाविद्यालय सभागृहात साजरा करण्यात आला.संत गाडगेबाबा यांनी स्वच्छता, शिक्षण, नशामुक्ती, अंधश्रध्दा निर्मूलन व समाजप्रबोधन यासारख्या विषयावर आयुष्य खर्ची घातले. 'स्वच्छता हीच खरी सेवा' हा त्यांचा संदेश आजच्या समाजासाठी अत्यंत महत्वाचा असल्याचे मत अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाला रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. वसंत लुंगे, डॉ. क्रिष्णा विल्हेकर, डॉ. पवन टेकाडे, डॉ. स्वप्नील मोहोड, डॉ. गणेश पुंडकर, डॉ. अजय जावरकर,डॉ. सुषमा पांडे, डॉ. विनोद वासनीक, डॉ. अनंत काळबांडे, डॉ. अनिल रोहणकर, डॉ. कमलेश पाटील, डॉ. श्रीकांत फुटाणे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सर्वांनी अभिवादन केले.

---

### १० मार्चला अमरावतीत प्रकल्पग्रस्तांचा महा एल्गार मोर्चा

# सरकारने न्याय दिला नाही तर सिंचन भवन ताब्यात घेणार

**अमरावती/का.प्र.**

विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर सरकारकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ येत्या १० मार्च रोजी अमरावती येथे भव्य 'महा एल्गार मोर्चा' काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय वऱ्हाडे मंगल कार्यालय, अमरावती येथे पार पडलेल्या बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनाच्या राज्यस्तरीय नियोजन व आढावा बैठकीत एकमताने घेण्यात आला.बैठकीत मार्गदर्शन करताना संघटनेचे नेते मनोज चव्हाण यांनी सरकारवर तीव्र शब्दांत हल्लाबोल केला. 'राज्याच्या विकासासाठी पिढ्यानूपिढ्यांची शेती सरकारच्या स्वाधीन करणाऱ्या प्रकल्पग्रस्तांवरच अन्याय का?' असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

सिंचन व विविध विकास प्रकल्पांसाठी राज्यभरातील लाखो हेक्टर सुपीक जमीन कवडीमोल दरात अधिग्रहित करण्यात आली. मोबदल्यात ५ङ समांतर आरक्षणाअंतर्गत कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी देणे बंधनकारक असताना आजवर त्याची अंमलबजावणी झालेली नाही. परिणामी, लाखो प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रधारक तरुण



आजही बेरोजगार असून अनेकजण वयोमर्यादेच्या कडेला पोहोचले आहेत.चाळीस ते पन्नास वर्षे उलटूनही न्याय न मिळाल्याने शेकडो तरुणांनी आत्महत्या केल्याची वेदनादायक वस्तुस्थिती मनोज चव्हाण यांनी मांडली. 'आम्ही राज्याच्या विकासासाठी जमीन देऊन चूक केली का?' असा प्रश्न आज प्रकल्पग्रस्तांच्या मनात घर करून बसला आहे.

संघटनेच्या लढ्यामुळे विदर्भातील सरळ खरेदी धारक शेतकऱ्यांना हेक्टरी ५ लाख रुपये सानुग्रह अनुदान मंजूर करून ८३२ कोटी वाटपाचा निर्णय झाला.१६ एप्रिल २०२५ रोजी देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अमरावतीत धनादेश वितरणाचा शुभारंभही झाला. मात्र आजतागायत फक्त २०ङ निधीच उपलब्ध करून देण्यात आल्याचे जलसंपदा विभागाने स्पष्ट केले आहे. 'ही प्रकल्पग्रस्तांची थट्टा आहे,' असा आरोप संघटनेने केला.

समांतर आरक्षण ५ङ वरून १५ङ करण्याचे आश्वासन अद्याप कागदावरच,१६ डिसेंबर २०२५ च्या नागपूर महामोर्चादरम्यान लाठीचार्ज,मुख्य सचिवांनी दिलेले आश्वासन आजतागायत अपूर्ण,यामुळे प्रकल्पग्रस्तांचा संयम सुटत चालला असून, स्थानिक जलसंपदा व महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या हलगर्जी व उर्मट वागणुकीमुळे संताप अधिकच वाढला आहे.त्यामुळ १० मार्चच्या मोर्चादरम्यान सरकारने ठोस निर्णय न घेतल्यास सिंचन भवन ताब्यात घेण्याचा गर्भित इशारा बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेने दिला आहे.

बैठकीला जेष्ठ मार्गदर्शक राजा काळे, सचिव गौतम खंडारे, उपाध्यक्ष प्रा. निलेश ठाकरे, कोषाध्यक्ष संजय गीद यांच्यासह विदर्भ व महाराष्ट्रातील ५०हून अधिक जिल्ह्यांतील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विविध जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांच्या नियुत्त्याही करण्यात आल्या.

---

## नेरपिंगळाईत संत गुलाबपूरी महाराज पुण्यतिथी उत्सवाची भक्तिमय सांगता

**लेहेगाव/वार्ताहर**

नेरपिंगळाई येथे संत गुलाबपूरी महाराजांच्या १०२ व्या पुण्यतिथी महोत्सवाला उत्साहात आणि भक्तिभावात प्रारंभ झाला होता. सप्ताहाची सुरुवात होताच मंदिर परिसर वेदघोष, हरिनामाचा अखंड गजर आणि टाळ-मृदुंगाच्या निनादाने दुमदुमून गेला. हरिभक्त परायण दादा महाराज कोळसकर यांच्या मधुर वाणीतून भागवत सप्ताह संपन्न झाला. त्यांच्या रसाळ वाणीने भाविकांना अध्यात्मिक चिंतनाची अनुभूती दिली.श्री समर्थ गुलाबपुरी महाराज संस्थानतर्फे आयोजित या सप्ताहात विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम पार पडले. दररोज अभिषेक, पूजन, हरिपाठ,



भजन, कीर्तन आणि अन्नदान कार्यक्रमांमुळे संपूर्ण गाव भक्तीरसात न्हाऊन निघाले. यानिमित्ताने गावामध्ये पारंपरिक यात्रा देखील भरली होती, ज्यामुळे उत्सवाला धार्मिकतेबरोबरच सामाजिक स्वरूपही प्राप्त झाले.

सप्ताह आणि यात्रेच्या निमित्ताने पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने नेरपिंगळाई येथे दर्शनासाठी आणि महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी उपस्थित झाले होते. महाप्रसाद तयार करण्यासाठी गावातील शेकडो तरुण-तरुणी तसेच महिलांनी सहकार्य केले.ग्रंथ दिंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या ग्रंथ दिंडीत गावातील महिला भजन मंडळींचा उत्स्फूर्त सहभाग विशेष ठरला. भजनाच्या तालावर महिला मंडळींनी रस्त्यावरून सुरेख फेर धरत भक्तिमय वातावरण निर्माण केले. टाळ-मृदुंगाच्या नादात आणि हरिनामाच्या गजरात संपूर्ण गाव भक्तिरंगात रंगून गेले.कीर्तन प्रसाद महाराज काष्टी (परभणी) यांनी सादर केले. त्यानंतर सप्ताहाची सांगता करण्यात आली. समारोपाच्या दिवशी पुरणपोळीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हजारो भाविकांनी शिस्तबद्ध आणि शांततेत महाप्रसादाचा लाभ घेतला.कार्यक्रम शांततेत व सुरळीत पार पडावा यासाठी श्री समर्थ गुलाबपुरी महाराज संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, गावातील सामाजिक व राजकीय कार्यकर्ते तसेच पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

---

### इस्कॉनतर्फे श्री श्री गौर पौर्णिमा महामहोत्सव आज

**अमरावती-** राठी नगर स्थित सरस्वती कॉलनी येथील श्री श्री रुक्मिणी आध्यात्मिक संस्कार केंद्र (इस्कॉन) अमरावती तर्फे विविध कार्यक्रमांचे वेळोवेळी आयोजन करण्यात येते. या सर्व उद्देशांना अनुसरून इस्कॉन संस्थापक आचार्य ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांचे वरिष्ठ शिष्य, इस्कॉन पदयात्रा मिनिस्टर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाद्वारे जीवन गौरव सन्मानाने पुरस्कृत, विश्वविख्यात कीर्तन सम्राट, त्रीदंड संन्यासी परम पूज्य लोकनाथ स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रेरणेने ३ मार्च रोजी श्री गौर पौर्णिमा महामहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाकरिता अमरावती जिल्ह्याचे विभागीय आयुक्त मा. श्वेता सिंघल आणि अमरावती जिल्ह्याचे महापौर श्रीचंद तेजवाणी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. महोत्सवाची सुरुवात दिनांक ३ मार्च रोजी पहाटे ४:३० वाजता श्री श्री रुक्मिणी द्वारकाधीश यांच्या शुभमंगल आरतीने होईल त्यानंतर 'महामंत्राचा सामूहिक जप होईल. त्यानंतर ७:३० वाजता दर्शन आरती होईल आणि त्यानंतर इस्कॉन संस्थापक आचार्य ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांची गुरुपूजा संपन्न होईल. त्यानंतर सायंकाळी ७:०० वाजता म्हणजे ग्रहण काळ सुटल्यानंतर श्री श्री गौर निताई यांचा महाअभिषेक वरिष्ठ ब्रह्मचारी भक्तांद्वारे संपन्न होईल.

---

# कामुंजा येथे विधी सेवा व कायदेविषयक जागरूकता शिबीर

**अमरावती/का.प्र.**

श्री. शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचलित , डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि तहसील कार्यालय, (महाराष्ट्र शासन) यांच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा व कायदेविषयक जागरूकता शिबीर२०२६ अंतर्गत मौजा-कामुंजा यशस्वीरीत्या पार पडले.

कार्यक्रमाचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वर्षा एन. देशमुख उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा विधी सेवा



प्राधिकरणाचे सचिव डी. एस. वामने, तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी विजय लोखंडे, पोलीस निरीक्षक वैभव पानसरे आदी मान्यवर उपस्थित होते.कामुंजा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वागतगीत व नृत्य सादर करून उपस्थितांचे मन जिंकले.शिबिरात नागरिकांना मोफत विधी सहाय्य, महिला व बालकांचे हक्क, शासनाच्या विविध योजना, संविधान व कायदेविषयक अधिकार याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी संपूर्ण गावात पथनाट्य सादर करून तसेच घरोघरी जाऊन जनजागृती केली. नागरिकांनी आपल्या कायदेशीर समस्यांबाबत प्रश्न विचारून तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेतले.

उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती देत नागरिकांना त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.बार्टीच्या प्रकल्प अधिकारी अनिता गवई यांनी विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती दिली.डी. एस. वामने यांनी वैकल्पिक वाद निवारण प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करत कोर्टाबाहेरील सामंजस्याने वाद मिटविण्याचे महत्त्व स्पष्ट केले.अध्यक्षीय भाषणात प्राचार्या डॉ. वर्षा देशमुख यांनी कामुंजा गाव एक वर्षासाठी कायदेविषयक मदतीसाठी दत्तक

घेतल्याची घोषणा केली व गावकऱ्यांच्या कायदेशीर समस्यांचे निराकरण करण्यासाठी महाविद्यालय कटिबद्ध असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाला विविध शासकीय अधिकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामस्थ, आरोग्य विभागाचे कर्मचारी तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक प्रा. डॉ. नंदकिशोर रामटेके यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच प्रा. कीर्तीराज सावळे, प्रा. संदीप वानखडे, प्रा. अन्यक्ती कीर्तीकर, प्रा. उज्वल मानकर व आयोजन समितीतील विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.संचालन डॉ. राधिका देशमुख व डॉ. कीर्ती बजाज यांनी तर आभार प्रदर्शन प्रिती विधाते यांनी केले.

---

## माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेकरीता शिक्षकांना घेऊ नये

### महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीची मागणी

**अमरावती/का.प्र.**

फेब्रुवारी-मार्च महीण्यात दरवर्षी १२वी व १०वी वर्गाची बोर्डाची परीक्षा घेतली जाते.या परीक्षा करीता पेपर ठेवण्या करीता प्रत्येक तालुकास्तराव सुरक्षिता म्हणुन आणि परीक्षा केंद्राला पेपरचे वाटप करण्या करीता कस्टडी दिली जाते.या कस्टडीचा प्रमुख त्या तालुक्यातील गटशक्षिणाधिकारी,शिक्षण विस्तार अधिकारी असतो.आणि त्यांना सहकारी म्हणुन हे अधिकारी केंद्रप्रमुख कींवा प्राथमिक शिक्षकांना घेतात.ही परीक्षा जवळपास एक महीना चालते या शिक्षकांच्या नेमणुकी मुळे त्यांच्या वर्गाचे शैक्षणिक नुकसान होते.त्यामुळे या परीक्षे करीता प्राथमिक शिक्षकांना घेऊ नये अशी मागणी प्राथमिक शिक्षक समितीने केली आहे. १०वी व १२वी वर्गाची परीक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक बोर्डाव्दारे घेण्यात येते.परीक्षा केंद्राला पेपर पुरविण्याकरीता एका ठीकाणी सुरक्षित कस्टडी तयार करण्यात येते येथे शिक्षण विभागातील अधिकारी व सहाय्यक यांची नेमणूक असते.नियमानुसार या कस्टडीत सहाय्यक म्हणुन एका लिपिकाची व शिपाई यांची नेमणूक करावी लागते पण शिक्षण विभागातील अधिकारी या कस्टडीत प्राथमिक शिक्षकांची नेमणूक करतात.आणि घडणाऱ्या प्रकाराला बळी पडतात असे प्रकार घडू नये आणि प्राथमिक शिक्षकांचे नुकसान होऊ नये म्हणुन परीक्षा बोर्डाने अश्या कस्टडीत प्राथमिक शिक्षकांना नेमणूका देऊ नये आणि अश्या नेमणूका शिक्षकांनी नाकाराव्यात अश्या असे आवाहन प्राथमिक शिक्षक समितीने केले आहे.

नुकताच अमरावती जिल्हात घडलेला पेपर फुटिचा प्रकार आणि या प्रकरणात ठरवलेले प्राथमिक शिक्षकांना दोषी हे प्रशासनाचे बळी आहे.या प्रकरणात प्रभारी गटशिक्षणाधिकारी,प्रभारी प्राथमिक शिक्षक शिक्षण विस्तार अधिकारी यांच्यावर कायदेशीर कार्यवाही होण्यापूर्वी या बाबतची सत्यता पडतारणे आवश्यक आहे.प्राथमिक विभागाचे कार्य सोडून माध्यमिक विभागाची कामे प्राथमिक शिक्षकांना का दिली जातात या बाबत चौकशी व्हावी अशी मागणी प्राथमिक शिक्षक समितीने केली आहे.

---

### विद्यार्थ्यांचे करिअर घडावे यासाठी शासन कटिबद्ध -आ.राजेश वानखडे

**तिवसा-** देशातला प्रत्येक विद्यार्थी हा रोजगारक्षम व्हावा,त्याचे करिअर घडावे यासाठी शासनाच्या अनेक योजना आहेत. त्यातील प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता अभियाना अंतर्गत विविध प्रशिक्षण



केंद्राच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्यांच्या हाताला काम देण्याचा एक चांगला उद्देश सरकारचा आहे. आपल्यातील कला व कौशल्यगुण दाखवून नोकरीच्या भरवशावर न राहता यातून करिअर घडवावे व स्वतःच्या पायावर उभं राहावं,त्यासाठी सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन व अमूल्य मार्गदर्शन तिवसा विधानसभा मतदार संघाचे आ. राजेश वानखडे यांनी केले. यावेळी व्यासपीठावर जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र अमरावतीच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कार,धनश्री श्रीराव,माजी मुख्याध्यापक गुणवंत देवतारे,माजी सरपंच सचिन राऊत,प्रदीप गौरखेडे,ढोर, जिल्हा कौशल्य विकास कार्यालयाचे प्रवीण बांबोळे, वैभव तेटू,प्रशिक्षण केंद्र संचालक सूरज देवतारे व पूजा सूरज देवतारे आदी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून सूरज देवतारे यांनी सध्या सर्वत्र सोलर पॅनल व सीसीटीव्ही हे बसविण्यात येत आहे.

---



### प्रा. डॉ.हेमंत देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त शहरात विविध उपक्रम

# गुळ तुला, अन्नदान आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप

**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त अमरावती शहरात ठिकठिकाणी विविध सामाजिक व सेवाभावी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मित्रपरिवार व कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून वाढदिवस उत्साहात आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात आला. यावेळी गौरक्षण येथे गुळतुळा कार्यक्रम



पार पडला. तसेच गरजू नागरिकांसाठी नानक रोटी च्या माध्यमातून अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा संदेश देण्यात आला. विविध भागांत केक कापून व शुभेच्छा देत कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला.ज्येष्ठ नागरिक, महिला व युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक कार्यातून वाढदिवस साजरा करण्याची परंपरा कायम ठेवत प्रा.डॉ.हेमंत देशमुख यांनी सर्वांचे आभार मानले व पुढील काळातही समाजहिताचे उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.मित्रपरिवाराच्या वतीने आयोजित या कार्यक्रमांमुळे शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रथमेश कोचरम, संदेश खिलारे, डॉ.अभिजीत पवार, रोशन कडू, कुणाल विधळे,निखिल देशमुख, हितेश शेळके, रवींद्र गडेकर, आकाश हिवसे, प्रफुल डोंगरे, राहुल खुरसाण, निखिल भोजे, विशाल बोरखडे,मंगेश भटकर,अजित काळपांडे, हितेश शेळके, गौरव ठाकूर,म नोज गावंडे, मोहन चोरे ,सचिन रिठे आदींनी परिश्रम घेतले.

# रंगपंचमीः नवरंगांची उधळण करणारा

**हिं**दू संस्कृतीत फाल्गुन वद्य पंचमीला प्रामुख्याने महाराष्ट्रात रंगपंचमी साजरी केली जाते. या दिवशी एकमेकांच्या अंगावर रंग उडवून आनंदोत्सव साजरा केला जातो. या प्रसंगी विविध रंगांची चूर्णे पाण्यात मिसळून ते पाणी पिचकाऱ्यांमधून एकमेकांच्या अंगावर उडविले जाते. फाल्गुन पौर्णिमेपासून सुरू झालेला होलिकोत्सव फाल्गुन वद्य पंचमीपर्यंत साजरा केला जातो. रंगपंचमी साजरी करून होलिकोत्सवाची सांगता केली जाते.



वास्तविक रंग उडविण्याचा उत्सव फाल्गुन वद्य पंचमीला साजरा केला जात असला, तरी उत्तर भारत आणि अन्य ठिकाणी तो होळीच्या म्हणजेच फाल्गुन पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो. वसंत ऋतू , मदन, नववर्ष, जीर्ण झालेल्या सृष्टीच्या शक्तीचे नूतनीकरण यासंदर्भात हा उत्सव निगडित असल्याचे मानण्यात येते. धर्मसिंधू या ग्रंथाच्या मते, फाल्गुन वद्य प्रतिपदेला वसंतोत्सव सुरु होतो. द्वितीयेला शेंदूर, गुलाल, चंदन, बुक्का वगैरे उधळून आनंदसोहळा साजरा केला जातो. हा उत्सव वद्य पंचमीपर्यंत साजरा करतात. यावरून रंगपंचमी हा वसंतोत्सवाचाच एक भाग आहे, असे सांगितले जाते.

**पौराणिक कथा**

पौराणिक कथेनुसार, भगवान शंकराने फाल्गुन पौर्णिमेला आपल्या तिसऱ्या डोळ्याच्या अग्नीतून मदनाला जाळले होते. त्यानंतर त्याला अनंगरूपाने त्याला पुन्हा जिवंत केले. मदनाला पुन्हा जीवन मिळाल्याचा आनंद व्यक्त करणे, हाही या उत्सवामागील उद्देश असण्याची मान्यता आहे. फाल्गुन पौर्णिमा ही वर्षाची अखेरची तिथी असल्यामुळे होळीनंतर नव्या वर्षाला प्रारंभ होतो व त्यानुसार रंगपंचमी हा नववर्षाच्या स्वागताचा उत्सव म्हणून साजरा केला जातो. जीर्ण झालेली सृष्टी होळीमध्ये जळून नष्ट झाली असून, आता नव्या सृष्टीचा उदय झाला आहे, असेही या आनंदोत्सवातून सूचित केले जाते.

**रंगपंचमीचे शास्त्रीय कारण**

द्वापारयुगात गोकुळात श्रीकृष्ण आपल्या गोपाळ सवंगड्यांवर पिचकारीने रंगीत पाणी उडवून रंगपंचमी साजरी करत असे, असे सांगितले जाते. शरद ऋतू संपून वसंत ऋतू प्रारंभ होतो. या कालावधीत निसर्ग आपली कूस बदलत असतो. शांत वातावरण दाहकतेकडे झुकते. तीव्रता वाढल्यामुळे उन्हाची तलखी कमी करण्यासाठी पाण्याचा वापर केला जातो. एकमेकांच्या अंगावर पिचकारीने पाण्याचा मारा केल्यामुळे त्वचेला आणि शरीराला थंडावा मिळतो. यामुळे ही पारंपरिक पद्धत सुरू झाल्याचे सांगितले जाते. फुलांच्या पाकळ्या, मेंदी, गुलमोहराची पाने, टॉमेटो, डाळीचे पीठ, हळद, बीट अशा नैसर्गिक पदार्थांपासून तयार केलेले रंग पाण्यात मिसळून त्याची उधळण केली जाते.

# ‘धुळवड’ सामाजिक एकतेचे प्रतिक

**फा**ल्गुन हा शालिवाहन शके महिन्यातील शेवटचा महिना आहे. त्यामुळे होळी हा हिंदू दिनदर्शिकेनुसार येणा-या महिन्यातील शेवटचा सण असतो. होळी पेटवून दुस-या दिवशी म्हणजे धुलीवंदनाच्या दिवशी जमिनीला, मातीला नमस्कार करण्याची प्रथा आहे. प्रत्येक प्राणी मात्राचा देह हा पंचमहाभूतांपासून बनलेला असतो. पृथ्वी, आप, त्वज, वायू, आकाश असा या पंचमहाभूतांचा क्रम आहे. पृथ्वी पासून सुरुवात आणि आकाशापर्यंत शेवट असे पंचक असणा-या या तत्त्वांना आपल्या सणांच्या मधून आदर व्यक्त करण्याचा एक दिवस म्हणजे धूलिवंदन. यादिवशी पृथ्वीला वंदन केले जाते. त्यानंतर १५ दिवसांनी नववर्षाला म्हणजे पाडव्याच्या दिवशी आकाशाला भिडणारी गुढी उभारण्याची पद्धत आहे.



या दिवशी सकाळी घागरी, पाण्याने भरुन होळी पेटवलेल्या जागी ठेवतात. सूर्याच्या उन्हाने हे पाणी तापते. या पाण्याने लहान मुलांना आंघोळ घालतात. असे मानले जाते की या पाण्याने आंघोळ केली असता लहान मुलांना किंवा कोणालाही उन्हाळा बाधत नाही. या दिवसात कै-याही मिळू लागतात. कै-या उकडून त्याचा गर लहान मुलांना अंगाला लावून स्नान घालतात. मोठी माणसे होळीवर पाणी शिंपडून ती राख कपाळाला लावतात, अंगाला फासतात व नंतर स्नान करतात. काही ठिकाणी आजकाल लोकांनी आपापल्या सोयीनुसार होळीच्या दुस-या दिवशी रंगपंचमी साजरी करण्याची प्रथा सुरु केली आहे. त्यात लहान-मोठे, स्त्रिया-पुरुष सरसकट सगळे उत्साहाने रंग खेळतात. परंतु रंगपंचमी हा वेगळा सण आहे. वसंत ऋतूची चाहूल लागल्यामुळे या सुमारास झाडे नवीन पालवीने व विविध रंगी फुलांनी रंगीबेरंगी दिसत असतात. हवाही उष्ण झालेली असते. अशावेळी थंड पाणी अंगावर उडविणे सुखदायक असते. त्यामुळे रंगपंचमी हा सण सुरु झाला.

कुसुंबीच्या फुलांपासून काढलेल्या रंगाचे पाणी करून तसेच केशराचे पाणी करून ते एकमेकांच्या अंगावर उडविले जात असे. पेशवाईत तर हा सण शाही इतमामाने साजरा केला जात असे. रंगाच्या पिचका-या भरभरून हत्तीवरून गुलाल आणि इतर कोरडया रंगाची उधळण केली जात असे. आजकाल विविध प्रकारचे रंग पाण्यात कालवून ते एकमेकांवर उडवितात. विशेषत: तरुण स्त्री-पुरुषांना एकत्र येण्याची व थट्टा-मस्करी करण्याची संधी या सणामुळे मिळते. परंतु कालांतराने अश्लील शब्द उच्चारून शंखध्वनी करणे यासारख्या विकृत गोष्टीही या उत्सवात शिरल्या. आजकाल एखाद्या हौदातील पाण्यात रंग टाकून एकमेकांना त्यात डुबवून हसत खेळत या सणाची मजा लुटली जाते.

धूलिवंदन (धुळवड) हा होळीच्या दुस-या दिवशी फाल्गुन वद्य प्रतिपदेला साजरा केला जाणारा रंगांचा आणि आनंदाचा सण आहे. या दिवशी होळीची राख आणि माती अंगाला लावून पृथ्वीला वंदन करण्याची पद्धत आहे. महाराष्ट्रात या दिवशी एकमेकांवर रंगपाणी आणि चिखल उडवून वसंत ऋतूचे स्वागत केले जाते. तसेच परस्परांतील मतभेद विसरून हा सण साजरा केला जातो. होळी पौर्णिमेच्या दुस-या दिवशी फाल्गुन वद्य प्रतिपदेस सकाळी धुळवड साजरी करतात. पहिल्या दिवशी पेटवलेल्या होळीच्या पवित्र राखेला वंदन करून ती अंगाला लावतात ज्याला ’धूलिवंदन’ म्हणतात.

काही ठिकाणी विशेषतः ग्रामीण भागात चिखल उडवून धुळवड खेळली जाते. हा सण रंगप्रेम आणि वसंत ऋतूचे प्रतीक असून समाजातील बंध म्हणजेच सामाजिक एकता मजबूत करतो. पौराणिक संदर्भानुसार हिरण्यकश्यपूवर विष्णूच्या नरसिंह रुपाने मिळवलेल्या विजयाचे अर्थात वाईटावर चांगल्याचा विजयाचे हे स्मरण आहे. यामागिल वैज्ञानिक महत्त्व असा आहे की, हा सण रंगांचा वापर करून आरोग्यासाठी आणि वसंत ऋतूच्या बदलांमध्ये शरीरातील दोष संतुलित करण्यासाठीही साजरा केला जातो. एकंदरीत धूलिवंदन हे होळीच्या उत्सवाचा अविभाज्य भाग असून तो आनंदरंग आणि सामाजिक सलोख्याचा दिवस आहे.

**रंग उधळले आसमंती..**
**गोकुळ धुंद झाला..**
**राधा-कृष्णाचा प्रेम स्नेह..**
**चोहीकडे दरवळला..**

**सुनील शिरपुरे**
कमळवेल्ली, यवतमाळ
मो.७०५७१८५४७९

## रंग

**स्वामिनी आहे ती, तिच्या दीप्तमय दीप्ततेची.....**
**तेजाळत्या दिनकरासंगे तिची लढाई मर्यादेची.....**

**भीती तिला समाजातील भडक रंगांची....**
**आयुष्यातील वास्तवतेच्या संग्रहित घटनांची.....**

**सोज्वळतेचे एकरूपी रंग तिच्या आवडीचे......**
**पारखले आज तिने करडे रंग विरुपतेचे....**

**कोणता रंग निस्वार्थी? याच प्रश्नात जगतेय ती.....**
**इंद्रधनूच्या रंगीत रंगात आज स्वतःला शोधतेय ती.....**

**क्षितिज अभ्यासते ती रोज उड्डाण घेतांना.......**
**निस्वार्थी स्पर्शाचे देईल कुणी बळ तिच्या पंखांना......?**

**देवता शोधते ती दररोज राऊळी--मंदिरी....**
**उमजले आज तिला तिचीच प्रतिमा तिच्या अंतरी.....**

**तीही रंग खेळली होती निरागसतेच्या रंगात.....**
**बालपण स्पर्शते तिला आज तप्ततेच्या उन्हात......**

**रंग सात्विकतेच्या अस्तित्वाचा आज फिका हो झाला.......**
**इथे भ्रष्टाचाराचा रंग नवीन उदयास आला.....**

**वृषाली वानखडे, अमरावती**
**मो.९९२१४२४१२५**

# ४ मार्च लाईनमन दिवस विशेष

## प्रकाश पेरणारा माणूस महावितरणचा लाईनमन

**वी**जेने मानवी जीवन सहज आणि सुसह्य केले आहे, किंबहुना वीजेशिवाय जगण्याची कल्पनाच करता येत नाही. बटन दाबल्याबरोबर घर प्रकाशमान व्हावं एवढीच रास्त अपेक्षा सर्वसामान्यांची आहे.परंतु या बटणामागे असलेली भलीमोठी वीज यंत्रणा आणि या यंत्रणेच्या माध्यमातून विजेचे नियंत्रण करणारे व २४ तास अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी रात्रंदिवस धडपड करणारी माणसे म्हणजे महावितरणचे लाईनमन .

वीज वितरण क्षेत्रात महावितरण ही देशातील सर्वात मोठी सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी आहे. सुमारे ८३ हजार कर्मचारी, रक्तवाहिन्याप्रमाणे पसरलेल्या १२ लाख किलोमीटरच्या वीज वाहिन्या, ४ हजार २६७ उपकेंद्रे, तसेच ९ लाख ८२ हजार रोहित्राच्या माध्यमातून ३० हजार मेगावॅट वीज ,ही मुंबईचा काही भाग वगळता राज्यातील विविध वर्गवारीतील ३ कोटी १३ लाख ग्राहकांपर्यंत अखंड पोहचविण्याच काम महावितरणचा लाईनमन अविरत करत असतो.

वीजपुरवठा खंडित झाला की सर्वकाही ठप्प होते आणि वीज पुरवठा खंडित झाल्यावरच वीजेचे महत्वही कळते.परंतु गेलेली वीज परत कशी आली हे कोणी कधी जाणून घेतलं नाही किंवा तशी गरजही वाटली नसल्याने महावितरणचा लाईनमन आजवर दुर्लक्षीतच राहीला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. परंतु लाईनमनच्या कामाची दखल घेत देशभरातील लाईनमनबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी केंद्रशासनाने ४ मार्च हा ’लाईनमन दिवस ’ साजरा करण्याच्या सुचना सर्व सार्वजनिक आणि खाजगी आस्थापनांना दिल्या आहेत. महावितरणमध्ये ४ मार्च हा ’लाईनमन दिन’ साजरा करण्यात येत आहेत, त्यानिमित्ताने महावितरणच्या लाईनमनच्या कार्याची ओळख करून देण्याचा हा एक प्रयत्न.

सध्यातरी बंद पडलेली वीज यंत्रणा पुर्ववत करण्यासाठी प्रत्यक्ष माणुसच लागतो.त्यामुळे ठप्प झालेली किंवा रात्री- बेरात्री खंडित झालेला वीज पुरवठा पुर्ववत होतो, तथापि ते पुर्ववत करण्यासाठी त्याठिकाणी महावितरणचा लाईनमन प्रसंगी प्रतिकूल आणि धोकादायक परिस्थितीत खांबावर, रोहित्रावर चढुन काम करतो असतो, तेंव्हाच खंडित झालेली वीज पुर्ववत होते हे याठिकाणी आवर्जुन नमुद केले आहे. याची अनेक उदाहरणे देता येतील, एवढ्या धोकादायक क्षेत्रात महावितरणचा हा सैनिक आपले कर्तव्य बजावत असतो.

महावितरणची उघड्यावर असलेली संपूर्ण यंत्रणा, जंगल ,द-या -खो-यातून आलेल्या वीज वाहिन्या, वीज खांबे, रोहित्रे इत्यादीवर उन, वादळ -वारा, पाऊस याचा मोठा परिणाम होत असतो.त्यामुळे वीज यंत्रणेची नियमित देखभाल -दुरूस्ती करतांना किंवा वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर प्रसंगी एखादा फॉल्ट शोधण्यासाठी शेकडो किलो मीटर वीज वाहिन्यांचे पेट्रोलिंग करावे लागते, पावसाळ्यात ,तर अशा आव्हानांची नियमितपणे भर पडत असते आणि महावितरणचा लाईनमन या आव्हानांना समर्थपणे पेलत असतो. लाईनमनच्या कामाची दखल घेण्यासारखे अनेक प्रसंग आहे. विशेषता सन - उत्सव प्रधान राज्यात , सामान्य जनता घरी उत्सव साजरा करत असते, परंतू महावितरणचा लाईनमन या काळात उत्सवावर अंधाराचे सावट पडू नये म्हणून अखंडित विजेसाठी आपल्या कर्तव्यावर कार्यरत असतो. एवढेच काय तर

करोना सारख्या महामारीने संपूर्ण जगाला कुलूपबंद केले होते. परंतु अत्यावश्यक सेवा असल्यांने सर्वकाही वीजेवरच निर्भर असतांना महावितरणच्या लाईनमनने जीवाची पर्वा न करता चोखपणे या काळात रात्रं -दिवस अखंडित सेवा देण्याचे काम केले.त्यामुळे त्यांच्या कामाची दखल घेण हे त्यांचे कौतूक करणारे आणि त्यांचा आत्मविश्वास वृदिंगत करणारे आहेत.

एकेकाळी फक्त पुरूषप्रधान असलेल्या या क्षेत्रात ’लाईन वुमनही’ पुरूषांच्या खांद्याला खांदा लाऊन सक्षमपणे या क्षेत्रातील आपले कर्तव्य बजावत आहेत. वीज पुरवठा सुरळीत करण्यावरच लाईमनचे काम थांबत नाही तर, विविध वर्गवारीतील वीज ग्राहकांना नविन वीज जोडणी देणे, वीजबिलाची वसुली करणे, वीज चोरी पकडणे, थकबाकीदारांचा वीज पुरवठा खंडित करणे, ग्राहकांच्या तक्रारी सोडविणे इत्यादी कामे नित्याचाच भाग असणाऱ्या महावितरणच्या या जीगरबाजाला ४ मार्च ‘लाईनमन दिना ’निमित्य मानाचा मुजरा!


**फुलसिंग राठोड**
जनसंपर्क अधिकारी
महावितरण, अमरावती परिमंडल

## कलावंतांचा कहर..अन् मनोरंजनाचा बहर...

# ‘ऐन चौकीत अर्ध्या रात्री...’

**म**हाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अंतर्गत ७१ वा प्राथमिक नाट्य महोत्सव २०२५-२६ स्व.भाऊसाहेब लिमये सभागृह सीपना कॉलेज, अमरावती येथे कामगार कल्याण केंद्र पोलचौक अकोला वतीने ऐन चौकात अर्ध्या रात्री दोन अंकी नाटकाचा खेळ झाला.

लेखक संकेत तांडेल लिखित ऐन चौकात अर्ध्या रात्री नाट्य शो कमाल झाली सपनात आली...या गाण्याच्या ठेक्यावर पोलीस चौकीत कैद्याच्या पिंजऱ्यात अन् निरीक्षकाच्या वेशात नाच सुरू असताना वेड्याच्या भूमिकेतला उपटे झर्रकन प्रवेश करतो व नाटक सुरु होते. अभिनयाचे अंग उलगडत उपटे हे शब्द बहाद्दर आणि त्यावर इतर सह-पात्रे अभिनयांकित होतात.अभिनय करताना उपटे आपले दीर्घ नाम संबोधन उत्तम परशुराम टेंबेचे संक्षिप्तनाम वापरत पोलिस स्टेशनची चौकी जनू (निरीक्षक जनार्दन गायकवाड)च्या ताब्यातून स्वताब्यात घेत कैदीच्या भूमिकेत मरा उर्फ महेश राणे असा त्रिवेणी संवाद विनोदाचे आळीपाळीने सादरीकरण करणारे नाटक, ऐन चौकीत घडत असताना, घरच्या बायकोला घाबरणारे पोलिस पण असतात.ही मांडणी करत तर पुढे (पुढारी वेशात) निरगुडे पात्रची एन्ट्री बेधुंदिय व्यक्तीला सावरून आणले होते.मंचावर चार पात्र बोलके आणि शहीद अख्तर म्हणून नाव घेतले. तो



जमिनीवर झोपवाला.नंतर त्याला सोप्यावर आडवा केला.संपूर्ण नाटकात त्याचे काम फक्त ड्रायवर म्हणून सुचलेले डायलॉग चवीला मीठा सारखे बोलवून घेतले.नाटकाला विनोदाने सजवताना शब्दाचे संक्षिप्त काका म्हणजे कायद्याचे कारखानदार, खाटीवरच टोपण नाव ह्या पद्धती दिग्दर्शकाने कंचित वापरल्या.संगीताचा मार्मिक उपयोग करून प्रचलित गाण्यांचा भरणा सुद्धा भरण्याची संधी डायरेक्टरने डायरेक्ट घेतली. ‘त्रिशश का गाणा सुनेगा’क्या.बदाम- बदाम सारखे रीळने समाज माध्यमातील गीतांची दिलेली देणगी नाटकात सीलबंद करून त्याची शैली केली. नाटकाचे रहस्य प्रवेश दर प्रवेश दिसत नाही.टेंभेची पत्नी एन्ट्री करते तेव्हा कदाचित भांड फुटेल अशी उत्सुकता निर्माण होते.थेट पोलिस कमिश्नरची विचारणा ठाण्यात करते तेव्हा नाटकाला वेगळेच वळण लागणार अशी स्थिती मांडताना मध्यांतर होतो. आमदारकी थाटात असलेले निरगुडे चौकीमध्ये केवळ फोन चार्जिंग करून बाहेर गेले असतांत. हे सुद्धा नाटकाचा हेतू काय कळू देत नाही.

उत्तरार्धात वापरलेली प्रसंगाचे रिव्हर्स मोडचे सादरीकरण विशेषत्वाने हौशी नाटकाच्या वरच्या टप्प्यातील आहे.नाटकाचा फ्लो विनोदाने भरून होता.

राणे स्वरात (राजनेता) राणे होते.टेंभे मात्र त्यांच्या अभिनयाने इतरांचे अभिनय प्रच्छन्न रूपी होत असल्याचे प्रकर्षात आले.त्यामुळे हाच रोल लीड रोल म्हणून अभिनयाचा मध्यबिंदू आहे ह्याचे प्रेक्षकाने ठरवून घेतले.म्हणून तिथे टाळ्या वाजवून प्रेक्षकांची दाद होती.स्नेहलता ही टेंभेची मिसेस विनोदाच्या घरात वावरतांना विनोदाचा कस तिला लावता येत नव्हता.त्यामुळे नाटकात स्त्री पात्र विनोदासाठी जागा घेत नव्हते.कारण एकतर आवाजाची संवादनी स्वरात नव्हती;दुसरे अंगिक अभिनय वळणावळणावर दाखवण्याचा प्रयत्न; विनोदाचे वळण नसल्यागत होते.त्यामुळे सर्व अभिनयाचे क्यूब तयार व्हायला टेंभेच मिरवत.पोलिसनिरीक्षक चा अभिनय शरीरयष्टी नुसार होता.लवचिकपना सांभाळण्याचा प्रयत्न करीत करीत अंगिक, वाचिक अभिनय नाटकात पोलिस शिपायाखेरीज होता.ठाण्यात फक्त पी. आय. च लेखकाने टाकला. त्यामुळे ह्या नाटकाला चौकीत अर्ध्यावर भासली जात होती.

निरगुडे ह्याला पुढारी पदावरून बाईच्या नादात तृतीयपंथी बनवून त्याने अभिनयात घुसण्याचा प्रयत्न केला.नाना पाटेकरची शैली(दाढी मुळे) झलकलि बंदुकीच्या इशारावर स्नेहलतेने चौकीत केलेला घोडेलावपना, राणेंच्या इशारावर प्रेमळ प्रतिसाद, यातून कदाचित राणेलां सोडवायला ती आली की काय असे वळण.पण तो प्रेक्षकांचा भ्रम होता.सत्यनारायणाच्या पूजेला नवऱ्याने दिलेला नकार, भांडण आणि चौकीत तक्रार अशी उत्पती असेल असे नाटकात नाटके करताना दिसत होती.संवादातून अदृश्य पात्रे अर्धाङ्गनची गोखलेबाई प्रेक्षकांच्या दृष्टीने मांडली.अखिना-सखीना ट्रकमध्ये अधामधातच ड्रायव्हर(नेहमीच खरा) प्रस्तुत करतो.

**एक टक नाटक**
**समीक्षण**

नेपथ्यावर लक्ष देताना चौकी ठीक होती.त्यात लाकडी खुर्च्या आणि अडकलेल्या हथकडीचा अभाव, मुंशीची डायरी, कैद पिंजऱ्याला दगडी भिंताची झालर सुद्धा लावता आली असती.पोलिसाला हेडकॅप घ्यायची राहिली.लटकावून पण ठेवता आली नाही.पोलिस चौकीत निदान लाकडी टेबल असताना नाटकात इस्पितळाचा टेबल आणि त्यावर ग्रीन कापड ह्या एवढ्या दुरुस्तीच्या जागा चौकीत सापडतात.घरातील दारूपार्टी सीनमध्ये चौकीतील बल(लाईट) सुरूच असतात.कारण इथे चारित्र परिवर्तित केले. घरात चाललेली पार्टी, जाम,बाटली अन् बाई-बाटली.कारण नशेची झुळूक पेल्यातील पिल्याने कशी येते? याचा दृश्यात समावेश स्नेहलता मार्फत करण्यात आला.तेव्हा स्नेहलता पार्टीत सामील नवऱ्याचा पेला संपवत नाटकाला नवे वळण लागेल असा सस्पेन्स.मात्र संवादातून स्पष्ट करायला सोमरसपेक्षा कलारसेची झिंग नाटकाचा भेद खोलते.

एकीकडे नाटकाचा प्रवास विनोदाच्या गतीने सुखद आणि स्फोटक हास्याने करताना देहबोली, शब्दबोली, मंच सावरासावरीत ठिकाणे स्थित करण्याची कसोटी पूर्ण करताना कलावंत प्रामाणिक होते.उजेडात नाटकाचे मर्म टेंभे मांडताना चेहऱ्यावरचे भाव दाखवणारा दिवा मानेखाली होता.संगीताच्या पार्श्वभूमीवर संवाद थोडा एकाकी होता.कलेचे मार्मिकत्व आणि अस्तित्व पटवून देताना पार्श्वसंगीत लक्ष भेद करीत जाणवलं.त्यामुळे शब्द अभिनयातून जसे निसटले तसे प्रेषकांच्या अपेक्षेत जायला अडचण भासली.मात्र दमदार अभिनयाने टेंभे(अभिनयातपेटले) टिकून होते.पडदा पडायची वेळ होती तेव्हा घुंगराच्या आवाजाने नाटकाचा दुसरा सीन सुरू होते की काय रे बा!



ही डायरेक्टरची छुप्या रस्त्याची चाल लावणीच्या बाईने व पाटलाने ऐन चौकीत अर्ध्या रात्री धरली.मोहक रसरशीत बांध्याची स्नेहलता यात खुलून दिसली व वेडसर वेश्यात टेंभे जमीनदार काळातला सावकार रुबाबदार झाला. पैसे उधळीत नाटकाचा शिखरबिंदू कलाउपासकाला समर्पित होता.उजेड पडणारे हिमांशू बानले, पार्श्वसंगीताचा साज भूषण झडपे, नेपथ्याला बुद्धीसागर वाघयांची बुद्धी, रंग-वेष शर्वरी अँड अनुराधा मते कंपनी होती.रुबाबदार निरीक्षक वेदांत खटोड, कैदी विशाल गायगोळ, नगरसेवक दत्ता लुंगे, ड्रायव्हर कार्तिक दाभाडे,मिसेस टेंबे अनुश्री मोहने व विनोदाचा अधीर उत्तम टेंबे सचिन पाटील.संकेत तांडेल लिखित ‘ऐन चौकीत अर्ध्या रात्री’ चा नाट्य प्रयोग स्नेहल कहाळे यांच्या दिग्दर्शनात हौशी नाटकाच्या तुलनेत व्यावसायिक नाटकाच्या वाटेवर असण्याची फुल गॅरंटी प्रेक्षकांच्या प्रतिसादतून दिसली.उत्कृष्ट खेळता मंच कामगार कल्याण मंडळाच्या प्राथमिक फेरीत, ऐन चौकीत अर्ध्या रात्री वेळेवर पार पडला.

**कबीरफादर**
मो.७७९८६४५५६५

# खडकांची शेकडो ब्रास अवैध वाहतूक; महसूल विभाग झोपेत?

## गावंडगाव-पहाडसिंगी परिसरातील प्रकार; रस्त्याच्या कामासाठी विहिरीतील खडकांचा वापर

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील अतिदुर्गम गावंडगाव–पहाडसिंगी शेतशिवारात विहिरीतील खडकांची शेकडो ब्रास अवैध वाहतूक होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मळसूर–पहाडसिंगी मार्गावरील सुरू असलेल्या नवीन डांबरीकरण रस्त्याच्या कामासाठी हे खडक वापरले जात असल्याची चर्चा असून, महसूल विभागाच्या दुर्लक्षामुळे शासनाच्या महसुलाला लाखो रुपयांचा फटका बसत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.



माहितीनुसार, संबंधित रस्त्याच्या कामासाठी गिट्टीऐवजी विहिरीतील कच्च्या खडकांचा वापर करण्यात येत आहे. कंत्राटदार व संबंधित अभियंत्यांच्या संगनमताने विहिरीवरून अवघ्या शंभर रुपये प्रति ट्रॉली (एक ब्रास) दराने खडक खरेदी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या आठवडाभरापासून रात्रीच्या वेळी जेसीबीच्या साहाय्याने खडक भरून ट्रॅक्टरद्वारे शेकडो ब्रास खडकांची वाहतूक करण्यात आली.

वाहतूक केलेल्या खडकांचे ढिगारे रस्त्याच्या कडेला टाकण्यात आले असून, काही खडक फोडून रस्त्याच्या कामात टाकण्यात आल्याचे दिसून येते. अतिदुर्गम भाग असल्याने महसूल विभागाचे अधिकारी या परिसरात फिरकत नसल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे. संबंधित प्रकाराबाबत तहसील प्रशासनालाही अद्याप अधिकृत माहिती नसल्याचे सांगण्यात येत आहे.

या प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून चौकशी करावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

*'खडकांच्या अवैध वाहतुकीसंदर्भात चौकशी करण्यात येईल. अवैध प्रकार निदर्शनास आल्यास तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांकडून पंचनामा अहवाल मागवून योग्य ती कारवाई केली जाईल,' असे पातूरचे तहसीलदार राहुल वानखेडे यांनी सांगितले.*

....................

*'खडकांची अवैध वाहतूक सुरू असल्याची माहिती नाही. संबंधित परिसरात पाहणी करून चौकशी करण्यात येईल व अहवाल तहसीलदारांकडे सादर केला जाईल,' अशी प्रतिक्रिया मंडळ अधिकारी पियुष गंगाखेडकर यांनी दिली.*

# शहरप्रमुखांवर जीवघेणा हल्ला; 'सात दिवसांत गोळी मारू' ची धमकी

■ प्रतिनिधी | अकोला ■

**मोठी उमरी परिसरात रविवारी रात्री उघड दहशतीचा थरार पाहायला मिळाला असून यावेळी शिवसेना उबाठा गटाचे शहरप्रमुख राहुल सुरेश कराळे यांच्या बोलेरो गाडीवर अज्ञातांनी नियोजित पद्धतीने हल्ला चढवत जीवघेणी धमकी दिली असल्याची घटना उघडकीस आली. यावेळी 'आज बच गया, सात-आठ दिवसांत गोळी मारू' अशा शब्दांत हल्लेखोर उघड इशारा देत आरोपी पसार झाले. या प्रकरणी सिव्हिल लाईन पोलीस स्टेशन, अकोला येथे गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलीस सूत्रांनुसार, १ मार्च रोजी रात्री सुमारे ९.४० वाजता कराळे घरी परतत असताना त्यांच्या घराजवळ आधीच 'रेकी' लावून बसलेल्या हल्लेखोरांनी हल्ला चढवला. मोटारसायकलवरून आलेल्या तिघांपैकी एकाने हातोड्यासारख्या घनाने ड्रायव्हर साईडची काच फोडली, तर इतरांनी गाडीवर सपासप वार केले. 'बंदूक काढ' अशी आरडाओरड करत दहशत माजवली. कराळे यांनी जीव वाचवण्यासाठी गाडीतील सीटच्या मागे लपून स्वतःचा बचाव केला. नागरिक धावून आल्याने आरोपींना पळ काढावा लागला. या प्रकारामुळे मोठी उमरी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. राजकीय वैमनस्यातून हा कट रचल्याची चर्चा रंगली आहे.

### दोन तासांत चार संशयित आरोपी अटक



दरम्यान, पोलिसांनी अवघ्या दोन तासांत तपासाची चक्रे वेगाने फिरवत सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे संशयित आरोपींना जेरबंद केले. हर्षल दिलीप मंडलीक (रा. लहान उमरी), चेतन विजय खंडारे (रा. मोठी उमरी), सागर संतोष इंगळे (रा. खरप बु.), वैभव दिनेश गोपनारायण (रा. न्यू तापडिया नगर) यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत जुन्या वैमनस्यातून हल्ला केल्याची कबुली दिल्याची माहिती आहे. प्राथमिक तपासात अग्निशस्त्र किंवा तलवारीचा वापर झाल्याचे दिसून आले नसल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे; मात्र धमकीचे गांभीर्य लक्षात घेता तपास अधिक तीव्र करण्यात आला आहे.

# विजय अग्रवाल तिस-यांदा 'मनपाचे कुबेर'

## स्थायी समितीवर शहर सुधार समितीची पकड कायम; काँग्रेसचा ९–६ ने पराभव, एमआयएम पुन्हा तटस्थ



■ प्रतिनिधी | अकोला ■

महापालिकेच्या तिजोरीची चावी पुन्हा एकदा विजय अग्रवाल यांच्या हाती गेली आहे. स्थायी समिती सभापतीपदी विजय अग्रवाल यांची ९ विरुद्ध ६ मतांनी निवड होत त्यांनी तिसऱ्यांदा 'मनपाचे कुबेर' होण्याचा मान पटकावला. काँग्रेसचे महंमद फजलु पहेलवान यांचा त्यांनी थेट मुकाबल्यात पराभव केला, तर एमआयएमने यावेळीही तटस्थ भूमिका घेतली.

१६ सदस्यीय स्थायी समितीत शहर सुधार समितीकडे ९ सदस्यांचे स्पष्ट संख्याबळ असल्याने विजय अग्रवाल यांचा मार्ग जवळपास मोकळाच होता. काँग्रेसकडे ४, तर उबाठा, वंचित आणि एमआयएमचा प्रत्येकी एक सदस्य आहे. मतदान प्रक्रियेत काँग्रेसला केवळ ६ मते मिळाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी वर्षा मिना यांनी कामकाज पाहिले.

महापालिकेतील ८० पैकी ३८ जागा जिंकून भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी स्पष्ट बहुमत नसल्याने भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), शिवसेना आणि महानगर विकास आघाडी यांच्या एकत्रित येण्याने 'शहर सुधार समिती'ची स्थापना झाली. या ४४ सदस्यीय आघाडीने स्थायी समितीवर वर्चस्व राखत पुन्हा एकदा आपली ताकद दाखवून दिली.

एकूणच, स्पष्ट बहुमत नसतानाही शहर सुधार समितीने स्थायी समितीवर नियंत्रण राखत राजकीय समीकरणांवर आपली पकड कायम ठेवली आहे. आता आगामी अर्थसंकल्प, विकासकामांच्या मंजुरी आणि निधी वाटपात विजय अग्रवाल यांची भूमिका निर्णायक ठरणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

### तिसऱ्यांदा तिजोरीची चावी

विजय अग्रवाल यांची ही स्थायी समिती सभापतीपदी तिसरी निवड ठरली आहे. जून २०१२ मध्ये काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस-वंचितच्या पाठिंब्याने ते प्रथम सभापती झाले. त्यानंतर भाजपमध्ये पुनरागमन करत मार्च २०१६ मध्ये त्यांनी पुन्हा ही जबाबदारी सांभाळली. आता तिसऱ्यांदा सभापतीपदी विराजमान होत त्यांनी राजकीय सातत्य आणि सत्तासमीकरणांवरील पकड अधोरेखित केली आहे. स्थायी समिती ही महापालिकेची आर्थिक धोरणे ठरवणारी प्रमुख यंत्रणा मानली जाते. कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांना मंजुरी देण्याचा अधिकार या समितीकडे असल्याने सभापतीला 'मनपाचा कुबेर' म्हटले जाते. अशा परिस्थितीत अग्रवाल यांच्या निवडीमुळे शहर सुधार समितीचा आर्थिक कारभारावर प्रभाव कायम राहणार आहे.

### महिला-बालकल्याण व झोन समित्या बिनविरोध

महिला व बालकल्याण समिती तसेच पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण झोन समित्यांच्या सभापतीपदासाठी प्रत्येकी एकच अर्ज आल्याने पाचही सभापती बिनविरोध निवडले गेले. महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी आरती घोगलिया, पूर्व झोनसाठी प्रतिभा अवचार, पश्चिम झोनसाठी राजेश्वर धोटे, उत्तर झोनसाठी जैनब बी शेख इब्राहिम, तर दक्षिण झोन समितीसाठी पुजा गावंडे यांची निवड झाली.



महिला व बाल कल्याण, सभापती – आरती प्रकाश घोगलिया



प्रभाग समिती (पूर्व), सभापती – अवचार रश्मी प्रशांत



प्रभाग समिती (दक्षिण), सभापती – गावंडे पुजा पंकज



स्थायी समिती सभापती – श्री विजय अग्रवाल



प्रभाग समिती (पश्चिम), सभापती – धोटे राजेश्वर केशव



प्रभाग समिती (उत्तर), सभापती – जैनब बी शेख इब्राहिम

### जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २६६/२०२६ प्रोसेस नं.२५५४/२०२६
चौ.ता. ०२/०४/२०२६ दिनांक : २३/०२/२०२६

**अर्जदार :** १. शिला मच्छिंद्र डोंगरे २. आम्रपाली मच्छिंद्र डोंगरे ३. स्वप्निल मच्छिंद्र डोंगरे अर्जदार कः १ ते ३ रा. त्रिमुर्ती व्यायाम शाळेजवळ, न्यु भिम नगर, बोधीसत्व विहार, कृषी नगर, अकोला. ता. जि. अकोला. ४. सौ. सपना स्वप्निली हिवराळे रा. जाजु नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. ५. सौ. संध्या इशांत प्रधान रा. कुटासा, ता. अकोट जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मच्छिंद्र विश्वनाथ डोंगरे
**पत्ता :-** रा. नवीन भीम नगर, बोधीसत्व विहार जवळ, कृषी नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मच्छिंद्र विश्वनाथ डोंगरे यांचे दि. ०९/०९/२०२१ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३ / ०२ / २०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २६२/२०२६ प्रोसेस नं.२६३३/२०२६
चौ.ता. ०९/०४/२०२६ दिनांक : २४/०२/२०२६

**अर्जदार :** १. संजय कुमार रामनारायण गुप्ता रा. अंजली पार्क, फ्लॅट नं. २, मोहीते हॉस्पिटलच्या मागे, गीता नगर, अकोला. ता. जि. अकोला. २. विनोद रामनारायण गुप्ता रा. ३१/ए, साईनिकेतन बिल्डिंग, मुंबई पुणे रोड, मेघा मार्टच्या समोर, फुगेवाडी, पुणे सिटी, पो. दापोडी, जि. पुणे. ३. निरंजन रामनारायण गुप्ता मयत तर्फे वारस अ. मनिषा निरंजन गुप्ता ब. मोनिष निरंजन गुप्ता दोघेही रा. फ्लॅट नं. १०२, बी विंग, श्री गणेश ग्रेसलँड सोसायटी, फेज १, शिवर गार्डन व रेस्टॉरंट पार्किंगच्या समोर, शिवर चौक, राहतनी, पुणे सिटी, पुणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : तारादेवी रामनारायण गुप्ता
**पत्ता :-** रा. अंजली पार्क, फ्लॅट नं. २, मोहीते हॉस्पिटलच्या मागे, गीता नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत तारादेवी रामनारायण गुप्ता यांचे दि. १६/०५/२०२५ रोजी पिंपरी चिंचवड येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०९/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे सुरजितसिंग प्यारा सिंग रंधावा यांचे मालकीचे प्लॉट चे साखळी चे मूळ रजी. खरेदी खत क्र. २४३३ दिनांक ०४/१२/२०१२ या क्रमाकाचे मूळ खरेदी खत दि. ०४/०२/२०२६ रोजी बाळापुर येथून हरवले आहे त्याबाबत सुरजितसिंग प्यारा सिंग रंधावा यांनी दि. २७/०२/२०२६ रोजी online तक्रार दाखल केली आहे, त्याचे तक्रार क्र. १९३७३००४०७२६००००५ असा आहे.

तरी सदरहु वरील क्रमांकाचे मुळ खरेदी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, गहाण, बोजा, बक्षीस, अधिकार संबंध, तसेच न्यायालयीन प्रकरणे अथवा इतर अधिकार इत्यादी असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. सदरहु वरील वर्णनाचे मुळ खरेदी खत कोणासही मिळाल्यास खालील नमुद पत्यावर ७ दिवसाचे आत आणुन देण्यात यावे याची नोंद घ्यावी.तरी सदरहु वृत्तपत्रामध्ये संबंधीत जाहीर नोटीस प्रकाशित करण्यात यावी, ही विनंती. करीता ही जाहीर नोटीस.

ठिकाण :-
दिनांक :- ०२/०३/२०२६

**ॲड. अजय. वा. गोडे**
शॉप क्र. २३– ए, दुसरा माळा, शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला, ता. जि. अकोला,
मो.क्र. ९९७५८३८२४२

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ९३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

### जाहीर समन्स

**मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. २५२/२०२५ जा. क्र. ८३०/२०२६
ने.ता. ३०/०३/२०२६ दिनांक : २७/०२/२०२६

**वादी :-** भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या. अकोला शाखा - मुर्तिजापुर

**विरुद्ध**

**प्रतिवादी :-** नौशाद अहेमद अब्दुल रशीद व इतर
प्रति,
प्रतिवादी क्र . ३) रोशन ओंकार वरोकार रा. वणी रंभापुर ता. जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. १,०५,५२६/- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवुनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दि. ३० माहे मार्च, २०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजर राहण्याचे सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची / वादाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी. आज दि. २७ माहे फेब्रुवारी, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये.

शिक्का
**(ए. डब्ल्यू. इंगळे)**
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

### जाहीर समन्स

**मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. ३६२/२०२३ जा. क्र. ८२९/२०२६
ने.ता. ३०/०३/२०२६ दिनांक : २७/०२/२०२६

**वादी :-** भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या. अकोला

**विरुद्ध**

**प्रतिवादी :-** अखिलेश अनिलपंत अकर्ते व इतर
प्रति,
प्रतिवादी क्र. ३) राम बच्चाराम देवाणी रा. नवरंग पार्क, राधाकिसन प्लॉट, अकोला ता. जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. ११,४०,५९९/- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवुनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दि. ३० माहे मार्च, २०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजर राहण्याचे सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची/वादाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी. आज दि. २७ माहे फेब्रुवारी, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये.

शिक्का
**(ए. डब्ल्यू. इंगळे)**
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

### जाहीर समन्स

**मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. ७८/२०२४ जा. क्र. ८२८/२०२६
ने.ता. २४/०३/२०२६ दिनांक : २७/०२/२०२६

**वादी :-** सन्मित्र अर्बन को-ऑप. बँक लि. अकोला

**विरुद्ध**

**प्रतिवादी :-** दिनेश तुळशीराम डाबी व इतर
प्रति,
प्रतिवादी क्र. ३) सौ. सोनल दिनेश डाबी
रा. माउली अपार्टमेंट, पाठक चक्की जवळ, गोडबोले प्लॉट, डाबकी रोड, अकोला ता. जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. २,११, ८३६/- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवुनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दि. २४ माहे मार्च, २०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजरराहण्याचे सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे. उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची / वादाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी.

आज दि. २७ माहे फेब्रुवारी, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये.

शिक्का
**(ए. डब्ल्यू. इंगळे)**
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

# प्रश्नांची ज्योत विझू देऊ नका : गजेंद्र सुरकार

## राष्ट्रीय विज्ञान दिनी लोक विद्यालयात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा जागर



**वर्धा/जनमाध्यम**

हातांची घडी आणि तोंडावर बोट ठेवणारी पिढी नव्हे, तर डोळ्यात प्रश्नांची ठिणगी आणि मनात शोधाची ज्योत असणारी पिढी घडली पाहिजे,असा भावनिक सूर लावत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांनी विद्यार्थ्यांना विचारांचे बळ दिले.

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त लोक विद्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सभागृहात विद्यार्थ्यांची उत्सुक नजर, प्रश्नांनी चमकणारे डोळे आणि प्रयोगांच्या प्रत्यक्ष सादरीकरणाने भारलेले वातावरण अनुभवास आले.सुरकार म्हणाले, आज घरात, शाळेत किंवा समाजात कोणी प्रश्न विचारला तर त्याला 'अति शहाणा झाला का असे ऐकावे लागते. लहानपणापासूनच 'शांत बसा' ही शिकवण दिली जाते. त्यामुळे प्रश्न विचारण्याची सवय बालवयातच दाबली जाते. परिणामी विज्ञानापेक्षा अंधश्रद्धेची मुळे घट्ट होत आहेत.त्यांनी भारतातील वैज्ञानिक परंपरेचा उल्लेख करत सी.व्ही. रमण यांचे उदाहरण दिले. रमण यांना नोबेल मिळाले, पण त्यानंतर भारतात राहून भारतीय शास्त्रज्ञाला ते यश मिळाले नाही, ही खंत आहे. दैववादाचा पगडा मोठा असल्याने प्रयत्नवाद मागे पडतो. म्हणून वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चिकित्सक वृत्ती जोपासणे ही काळाची गरज आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी २५ फेब्रुवारीला आयोजित 'चमत्कार प्रशिक्षण शिबिरा'तील विद्यार्थिनींनी रंगतदार प्रयोग सादर केले. तथाकथित चमत्कारांमागील हातचलाखी, फसवणूक आणि कार्यकारणभाव त्यांनी उलगडून दाखविला. प्रयोग पाहताना सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. अनेक विद्यार्थ्यांनी पुढे येत प्रश्न विचारले आणि वातावरण अधिकच संवादात्मक झाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सुषमा कोटेवार यांनी केले. शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला. मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.विज्ञान दिनाच्या निमित्ताने केवळ प्रयोग नव्हे, तर विचारांची बीजे पेरली गेली; आणि त्या बीजांमधून उद्याची प्रश्न विचारणारी पिढी उभी राहील, अशी आशा व्यक्त करण्यात आली.

# वर्धा श्रमिक पत्रकार संघाचे नवे कार्यालय सुरू

## कृषी भवनातील गाळ्याचे उद्घाटन



**वर्धा/जनमाध्यम**

स्थानिक बजाज चौकस्थित कृषी भवनात वर्धा श्रमिक पत्रकार संघच्या नव्या कार्यालयाचे उद्घाटन उत्साहात पार पडले. वर्धा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अमित गावंडे यांच्या हस्ते फित कापून कार्यालयाचा शुभारंभ करण्यात आला.

उद्घाटनप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते सुनील बुरांडे यांच्यासह मान्यवरांचा शाल-श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला वर्धा एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण हिवरे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मनोज चांदुरकर, शिक्षण संस्थाध्यक्ष राजेंद्र शर्मा तसेच वर्धा व्यापारी असोसिएशनचे सचिव इद्रिस मेमन यांनी सदिच्छा भेट देत संघटनेला शुभेच्छा दिल्या.यावेळी बोलताना अमित गावंडे म्हणाले की, कृषी भवनातील एक गाळा पत्रकार संघटनेसाठी आरक्षित होता; मात्र तो अनेक वर्षे दुरवस्थेत होता. संघटनेने लेखी मागणी केल्यानंतर नियमानुसार गाळा कार्यालयाकरिता उपलब्ध करून देण्यात आला. हक्काचे कार्यालय मिळाल्याने संघटनेचे कामकाज अधिक सुसूत्र होईल व पत्रकारांच्या कल्याणासाठी उपक्रम राबविण्यास चालना मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.कार्यक्रमाचे संचालन इक्राम हुसैन यांनी केले, तर प्रवीण धोपटे यांनी आभार मानले. उद्घाटन सोहळ्यास पत्रकारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. आयोजनासाठी संघटनेच्या पदाधिकारी व सदस्यांनी सहकार्य केले.

# ग्राहक हक्कांना बळ देणारा ऐतिहासिक निर्णय

## डिजिटल बोर्ड दोषप्रकरणी कंपनीला दणका

## १.३६ लाख परतावा व व्याजासह भरपाई; ग्राहक आयोगाचा आदेश

**वर्धा/जनमाध्यम**

दोषपूर्ण इंटरॅक्टिव्ह डिजिटल बोर्ड विक्री प्रकरणी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने कंपनीला दणका देत तक्रारदारास १,३६,८५७/- रक्कम ९ टक्के वार्षिक व्याजासह परत करण्याचे आदेश दिले. तसेच मानसिक त्रास व न्यायालयीन खर्चापोटी स्वतंत्र भरपाई देण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

ही तक्रार सतीश मनोहरराव सुपारे (रा. वर्धा) यांनी दाखल केली होती. ते 'अ‍ॅस्ट्रॉन्स इंटरनॅशनल लँग्वेजेस अ‍ॅकॅडमी'चे संचालक असून अध्यापनासाठी आधुनिक साधनांचा वापर करण्याच्या उद्देशाने त्यांनी Softlogic Pvt Ltd निर्मित इंटरॅक्टिव्ह डिजिटल बोर्ड, Technosale Multimedia Technology, नागपूर यांच्या माध्यमातून खरेदी केला होता. मात्र सुरुवातीपासूनच बोर्डमध्ये लेखनातील अडचणी, सॉफ्टवेअर बिघाड, हँग होणे आदी तक्रारी उद्भवत राहिल्या.तक्रारदाराने अनेक वेळा दुरुस्तीची मागणी केली. तंत्रज्ञांकडून तपासणी व दुरुस्ती करण्यात आली; मात्र दोष कायम राहिल्याने अध्यापन कार्यात अडथळे निर्माण झाले. दोन वर्षे पाठपुरावा करूनही समाधान न झाल्याने त्यांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, वर्धा येथे दाद मागितली.सुनावणीनंतर आयोगाने तक्रारदार हा कायद्यानुसार 'ग्राहक' असल्याचे स्पष्ट करत Softlogic Pvt Ltd यांना मूळ रक्कम ९ टक्के व्याजासह ४५ दिवसांत परत करण्याचे आदेश दिले. तसेच Softlogic Pvt Ltd, पुणे व Technosale Multimedia Technology, नागपूर यांना संयुक्तपणे १५,००० मानसिक त्रासभरपाई व १०,००० न्यायालयीन खर्च देण्याचे निर्देश दिले. आदेशाचे पालन न केल्यास १२ टक्के व्याज आकारण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले.ग्राहकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी दिलेला हा निर्णय महत्त्वाचा मानला जात असून, दोषपूर्ण वस्तूविक्रीबाबत कंपन्यांनी जबाबदारी स्वीकारावी, असा संदेश या निकालातून देण्यात आला आहे.

# दुचाकीवरून पडलेल्या महिलेला दिली चारचाकीने धडक

**वर्धा/जनमाध्यम**

शहरातील गोंडप्लॉट चौक परिसरात दुपारी घडलेल्या भीषण अपघाताने नागरिकांच्या अंगावर शहारे आले. पावडे नर्सिंग होमजवळील रस्त्यावरच्या खोल खड्ड्यामुळे दुचाकी उसळली आणि मागे बसलेली महिला रस्त्यावर कोसळली. त्याच वेळी समोरून वेगात येणाऱ्या कारने तिच्या अंगावरून जात तिला गंभीर जखमी केले.

माहितीनुसार, पती-पत्नी दुचाकीने पावडे नर्सिंग होम परिसरातून छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जात होते. रस्त्यातील खड्ड्यात दुचाकी अडकल्याने वाहन अचानक उसळले. मागे बसलेली महिला रस्त्यावर फेकली गेली, तर चालकाचे संतुलन बिघडून तोही रस्त्याच्या कडेला पडला. याच क्षणी विरुद्ध दिशेने येणारी कार महिलेला चिरडत पुढे गेली. क्षणात घडलेल्या या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली.महिलेच्या आक्रोशाने परिसर दणाणून गेला. नागरिकांनी तातडीने धाव घेत जखमी महिलेला ऑटोरिक्षाच्या मदतीने उपचारासाठी रुग्णालयात हलविले. शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधला असता ठाणेदार टाले यांनी या घटनेची अधिकृत नोंद अद्याप प्राप्त नसल्याचे सांगितले.दरम्यान, शहरातील वाढते खड्डे आणि भरधाव वाहनांचा वेग नागरिकांच्या जिवावर उठत असल्याची तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे.

# क्रीडा-सांस्कृतिक स्पर्धेत आर्वीचा झंझावात

## क्रिकेट, बॅडमिंटनमध्ये निर्विवाद वर्चस्व

**आर्वी/जनमाध्यम**

जिल्हास्तरीय नगरपरिषद व नगरपंचायत अधिकारी-कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत आर्वी नगर परिषद ने अक्षरशः झंझावाती कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तीन दिवस रंगलेल्या या स्पर्धांमध्ये आर्वीने क्रीडांगणापासून ते रंगमंचापर्यंत आपले वर्चस्व सिद्ध केले.

या स्पर्धेत जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद व नगरपंचायतीतील अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले होते. क्रिकेटच्या अंतिम सामन्यात आर्वीच्या संघाने चुरशीच्या लढतीत प्रतिस्पर्ध्यांना नमवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. गोलंदाजांची धार आणि फलंदाजांची संयमी खेळी यामुळे आर्वीचा विजय निश्चित झाला.बॅडमिंटनमध्येही आर्वीचीच सरशी ठरली. एकेरी गटात प्रमोद नागरे यांनी अचूक फटक्यांनी प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करत विजेतेपद मिळवले. दुहेरी गटात श्रीकांत निनावे व प्रमोद नागरे या जोडीने सुरेख समन्वय साधत प्रथम क्रमांक पटकावला. हॉलीबॉल स्पर्धेत आर्वी संघाने उपविजेतेपद मिळवून आपली दमदार उपस्थिती नोंदवली.सांस्कृतिक स्पर्धेत 'माजी वसुंधरा' या नाटिकेने सामाजिक आशय आणि प्रभावी सादरीकरणाच्या जोरावर प्रथम क्रमांक मिळवला.स्फूर्ती गोळे यांच्या एकल नृत्याने उपस्थितांची मने जिंकत पहिला क्रमांक पटकावला.स्पर्धेतील सर्व विजेत्यांचा गौरव सोहळा २८ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या भव्य सभागृहात पार पडला. यावेळी वानमथी सी यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच सौरभ कावळे (जिल्हा सहआयुक्त, नगर प्रशासन, वर्धा) आणि जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी उपस्थित होते.या यशाबद्दल डॉ. किरण सुकलवाड यांनी खेळाडू व कलाकारांचे अभिनंदन करत संघभावनेचे कौतुक केले. नगराध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच सर्व नगरसेवकांनीही विजेत्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.क्रीडा कौशल्य, सांस्कृतिक जाण आणि संघभावना यांचा संगम साधत आर्वी नगरपरिषदेने जिल्ह्यात आपली छाप उमटवली असून या यशामुळे शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

# महाबळानजीक पलटी टिप्परला कारची धडक

## सुदैवाने जीवितहानी टळली

**सेलू/जनमाध्यम**

नागपूर महामार्गावरील महाबळानजीक पेट्रोलपंपाजवळ केळझरकडून सेलूकडे जात असलेला टिप्पर चालकाचे नियंत्रण सुटल्याने पलटी झाला. तो दुभाजक तोडून विरूद्ध दिशेने जाऊन पलटल्याने त्यातील चुरी रोडवर पडली. याचदरम्यान यवतमाळकडून नागपूरकडे जाणारी कार टीप्परला धडकली. या अपघातात सुदैवाने कोणतीही दुखापत झाली नसून, वाहनाचे नुकसान झाले आहे.

टिप्पर क्रमांक एमएच ४०, बीजी ६५१९ केळझरकडून सेलूकडे जात असताना टिप्पर चालकाचे नियंत्रण सुटले. यात महाबळा शिवारातील पेट्रोलपंपासमोर दुभाजकावरुन विरुद्ध दिशेच्या रोडवर पलटी होवून चुरी रोडवर पडल्याने काहीवेळ वाहतूक ठप्प झाली होती. यात सुदैवाने कोणतीही हानी झाली नाही.घटनेची माहिती मिळताच सेलू पोलीस स्टेशनचे सहाय्यक फौजदार मनोहर मुडे, सचिन वाटखेडे, विनोद कोडापे यांनी घटनास्थळी दाखल होत रोडवरील कामगारांच्या साहाय्याने तसेच पोकलॅण्डच्या मदतीने कार बाहेर काढून रोडवरील चुरी हटविली व वाहतूक सुरळीत केली. तसेच या अपघातात बचावलेल्या गाडे परिवारास खासगी वाहनात बसवून नागपूरकडे रवाना केले.

# सेवापूर्ती निमित्त समशेर शेख यांचा सत्कार



**वर्धा/जनमाध्यम**

वर्धा प्रकल्प कार्यालयातील कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री समशेर शेख यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित सत्कार समारंभात कृतज्ञतेची आणि आठवणींची भावुक सरमिसळ पाहायला मिळाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रकल्प अधिकारी गीतांजली निकम होत्या. त्यांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन श्री शेख यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकात कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी राजेंद्र जगताप यांनी शेख यांच्या प्रदीर्घ सेवाकाळाचा आढावा घेत त्यांच्या कार्यतत्परता, समन्वयक वृत्ती आणि सहकार्यशील स्वभावाचा विशेष उल्लेख केला. सेवानिवृत्त मुख्याध्यापक सविता घोडे यांनी सेवाकाळातील अनुभव कथन करताना शेख सरांनी अडचणीच्या काळात दिलेल्या आधाराची आठवण करून दिली. सेवानिवृत्त पदवीधर शिक्षक आर. के. पिंपळकर यांनीही जुन्या आठवणींना उजाळा देत शुभेच्छा व्यक्त केल्या. सहाय्यक प्रकल्प अधिकारी धावंजेवार यांनी मनोगत व्यक्त केले.सत्काराला उत्तर देताना शेख यांनी सेवाकाळात सहकाऱ्यांचे लाभलेले सहकार्य कृतज्ञतेने स्मरले. कार्यक्रमास त्यांची कन्या रजिया शेख व जावई खालिद खान उपस्थित होते. सूत्रसंचालन चिकटे यांनी, तर आभार प्रदर्शन सहाय्यक प्रकल्प अधिकारी खडसे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# रेशन दुकानदारांच्या कमिशन वाढीसाठी विधानसभेत आवाज

## आ. राजेश बकाने यांची मागणी



**वर्धा/जनमाध्यम**

राज्यातील सार्वजनिक वितरण प्रणाली सुरळीत चालविण्यात रेशन दुकानदारांची भूमिका महत्त्वाची असताना त्यांना मिळणारे कमिशन अत्यल्प आहे. त्यामुळे त्यांच्या आर्थिक अडचणी वाढत असून शासनाने कमिशनमध्ये तातडीने वाढ करावी, अशी मागणी देवळी-पुलगाव मतदारसंघाचे आमदार राजेश बकाने यांनी विधानसभेत केली.

राज्यातील हजारो शिधावाटप दुकानदार अन्न सुरक्षा योजनांची प्रभावी अंमलबजावणी करीत आहेत. गरीब व गरजू नागरिकांपर्यंत धान्य पोहोचविताना त्यांना वाहतूक खर्च, वीजबिल, दुकान भाडे, संगणक प्रणाली व ई-पॉस मशिनची देखभाल तसेच मनुष्यबळाचा खर्च करावा लागतो. मात्र या तुलनेत मिळणारे कमिशन अपुरे असल्याचे बकाने यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.देवळी-पुलगाव मतदारसंघातील रेशन दुकानदारांच्या समस्या मांडताना त्यांनी सांगितले की, वेळेवर धान्य वितरणाबरोबरच ऑनलाइन नोंदी, आधार प्रमाणीकरण व विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची अतिरिक्त जबाबदारी दुकानदारांवर आहे. यासाठी स्वतंत्र आर्थिक मोबदला दिला जात नाही.त्यामुळे शासनाने वास्तव परिस्थितीचा विचार करून कमिशन वाढवावे, वितरणावर आधारित प्रोत्साहनपर मानधन लागू करावे तसेच डिजिटल यंत्रणेच्या देखभालीसाठी स्वतंत्र अनुदान द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. रेशन दुकानदारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत लवकर सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

# संक्षिप्त

### शेळ्या बांधण्यावरून वाद; भावाला मारहाण

**सेलू** - तालुक्यातील पिंपळगाव येथे शेळ्या बांधण्याच्या कारणावरून दोन सख्ख्या भावांमध्ये झालेल्या वादाचे रूपांतर मारहाण झाल्याची घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, बंडू दमडू जोगे हे वाद मिटविण्यासाठी पुढे सरसावले असता किसना दमडू जोगे हा संतप्त अवस्थेत शिवीगाळ करीत होता. वाद अधिक चिघळल्याने किसना याने बंडू जोगे यांना मारहाण केल्याची तक्रार देण्यात आली आहे. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. जखमीवर स्थानिक पातळीवर उपचार करण्यात आले. याप्रकरणी देहेगाव (गो.) पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

---

### अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**हिंगणघाट** - साखरा पाटी शिवारात अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार जखमी झाल्याची घटना १४ जानेवारी रोजी घडली. संकेत सिद्धार्थ जांभुळकर (वय ३६), रा. बल्लारपूर, जि. चंद्रपूर हे एमएच ३४ बीपी ९२७० क्रमांकाच्या दुचाकीने सेवाग्रामकडे जात होते. दरम्यान, अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात ते जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले. अपघातानंतर संबंधित वाहनचालक पसार झाला. घटनेची तक्रार नोंदविल्यानंतर हिंगणघाट पोलिस ठाणे यांनी अज्ञात वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून पुढील तपास सुरू आहे.

---

### इलेक्ट्रॉनिक मशिनवर जुगार

**हिंगणघाट** - येथील सरकारी दवाखाना चौक परिसरात सुरू असलेल्या इलेक्ट्रॉनिक मशिन जुगारावर पोलिसांनी धाड टाकत सात मशिन जप्त केल्या. ही कारवाई हिंगणघाट पोलिस ठाणे यांच्या पथकाने केली. छाप्यात वेगवेगळ्या कंपनीच्या सात मशिनसह अन्य साहित्य जप्त करण्यात आले. एकूण १ लाख ४६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणी चेतन अंकुश कोहाड व गुरुदयालसिंग भादा (दोघेही रा. हिंगणघाट) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अवैध जुगाराविरोधातील कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून पुढील तपास सुरू आहे.

---

### अपघातातील जखमी युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू

**वर्धा** - सिंदी (मेघे) येथील युवकाचा अपघातानंतर उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. भावेश महेश चांदेकर (वय १९), रा. वृंदावन नगर, सिंदी (मेघे) याचा हिंदी विश्वविद्यालयाजवळील उड्डाणपुलावर अपघात झाला होता. गंभीर जखमी अवस्थेत त्याला सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. याप्रकरणी सावंगी (मेघे) पोलिस यांनी नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

---

### प्रकृती बिघडल्याने इसमाचा मृत्यू

**हिंगणघाट** - आजंती शिवारात ट्रकचालकाचा प्रकृती अचानक बिघडल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली. शेख अफसर शेख अकबर हे ट्रकने तार साहित्य घेऊन कंपनी परिसरात आले होते. कामाच्या दरम्यान त्यांची प्रकृती अस्वस्थ झाली. तातडीने वैद्यकीय मदत देण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच हिंगणघाट पोलिस ठाणे यांनी नोंद केली. अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली असून पुढील चौकशी सुरू आहे.

---

### हृदयविकाराच्या धक्क्याने ज्येष्ठाचा मृत्यू

**हिंगणघाट** - येथे हृदयविकाराच्या धक्क्याने ६५ वर्षीय इसमाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. अशोक देविदास भुसारी, रा. हिंगणघाट यांना प्रकृती अस्वस्थ वाटू लागल्याने उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांकडून उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. याप्रकरणी हिंगणघाट पोलिस ठाणे येथे नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

---

### लाकडी झिलपीने मारहाण; आर्वीत गुन्हा

**आर्वी** -टाकरखेडा (लहानुजी) येथे शेजाऱ्यांतील वादातून एका मजुरावर लाकडी झिलपीने मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी आर्वी पोलीस स्टेशन येथे अप.क्र. १०१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१) (दुखापत) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.राजू देवराव मारबते (वय ४०) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी चारच्या सुमारास शेजारी प्रभाकर मधुकरराव बावणे यांच्याशी झालेल्या वादातून आरोपीने डाव्या डोळ्याखाली व डोक्यावर वार केला. जखमी अवस्थेत त्यांना प्रथम आर्वी येथील रुग्णालयात, त्यानंतर सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम येथे दाखल करण्यात आले. उपचारानंतर १ मार्च रोजी तक्रार नोंदविण्यात आली. पुढील तपास सुरू आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ९६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# महाअँग्रो-एआय डिजिटलमध्ये आमूलाग्र बदल घडवण्याची क्षमता-आ.संजय खोडके

## राज्यविधीमंडळात शासनाच्या कृषी विकास धोरणांवर चर्चा

**अमरावती/का.प्र.**

राज्याच्या विकासामध्ये कृषी क्षेत्रातील अर्थव्यवस्थेचा फार मोठा वाटा असून कृषी व्यवसायामुळे महाराष्ट्राचा जिडीपी वाढतो. महाराष्ट्र शासनाने वर्ष २०२५-२९ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कृषी धोरण आखले आहे. राज्यात कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्यासाठी मागील अर्थसंकल्पात स्व. अजितदादा पवार यांनी ५०० कोटी रुपयांची तरतूद केली होती. अँग्री विथ एआय च्या माध्यमातून शेतीला अधिक प्रभावित आणि सुरक्षित करण्याचे धोरण महाराष्ट्र शासनाने आणले असून या धोरणामुळे संपूर्ण देशभरात महाराष्ट्राला एक अग्रगण्य राज्य होण्याचा बहुमान मिळाला आहे. शासनाच्या महॲग्रो -एआय डिजिटल धोरणांमुळे कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवण्याची क्षमता असून कृषी क्षेत्रात भरमसाठ गुंतवणूक व कृषीआधारित व्यवसाय व रोजगाराच्या संधी निर्माण होणार असल्याचे निवेदन आ.संजय खोडके यांनी राज्यविधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहातून केले.

राज्यविधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये विधानपरिषदेच्या कामकाजादरम्यान नियम २९३ -अन्वये प्रस्तावावर चर्चा करतांना आ. संजय खोडके यांनी कृषी क्षेत्रातील एआय तंत्रज्ञानाच्या वापरासंदर्भात आपली भूमिका विशद केली. त्यांनी सभागृहा समक्ष सांगितले कि, या धोरणातील निर्मितीक्षम संसाधनांचा कार्यक्षम वापरामुळे पिकांच्या उत्पादनाचा अचूक अंदाज वर्तवणे, हवामानातील बदलांचे सूक्ष्म निरीक्षण करणे, रोगांची व किडीची वेळीच ओळख पटवणे आणि उपलब्ध संसाधनाचा कार्यक्षम वापर करणे शक्य होणार आहे.अमरावती विभागात प्रामुख्याने कापूस ,सोयाबीन, तूर, तसेच डाळजन्य पिकांची मोठ्या प्रमाणात लागवड होते. तसेच अमरावती जिल्ह्यात १ लाख हेक्टरमध्ये संत्रा उत्पादन केल्या जाते. मात्र दरवर्षी अतिवृष्टी ,अस्मानी व सुलतानी संकटांमुळे शेतकऱ्यांना नुकसानाचा सामना करावा लागतो. म्हणून महाराष्ट्राचे धोरण ठरवीत असतांना अमरावती विभागातील शेतकऱ्यांना सुद्धा कृषी आधारित डिजिटल तंत्रज्ञानाचा लाभ मिळण्यासाठी अमरावती विभागातील कृषी परिस्थितीचे निरीक्षण व व्यवस्थापन करून स्थानिक भागातील पीक पद्धती व हवामानाची परिस्थिती लक्षात घ्यावी लागेल, अशी सूचना आ. संजय खोडके यांनी सभागृहासमक्ष मांडली.तालूकास्तरीय विभाग जिल्हास्तरावर आणले जात आहे. कृषी धोरणाची अंमलबजावणी करत असतांना तालुकास्तरावर चांगल्या सुविधा मिळाल्या पाहिजे, म्हणून कृषी अधिकारी , कर्मचारी यांचा एक चांगला आकृतिबंध ठरविण्याची गरज आहे. म्हणून या संबंधित काम करणारे लोक प्रतिनिधी व कृषी संघटनांशी चर्चा करून निर्णय घ्यावा.शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी व आपला कृषी माल शेतातून बाहेर आणण्यासाठी रस्ते सुविधा व्हावी म्हणून आता महाराष्ट्र शासन मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजना राबविली जात आहे. शेतकऱ्यांच्या बांधापासून ते बाजारपेठेपर्यंत कृषी माल नेण्याची सुविधा व्हावी म्हणून मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजनेचा एक चांगला आराखडा तयार करून उत्तम पद्धतीने प्रत्येक विभागात व जिल्ह्यात हि योजना राबविण्यात यावी, याबाबत आमदार महोदयांनी सभागृहाला अवगत केले. यातून गावपातळीवर १ हजार सोलर चरका आणि २५० हातमाग उपलब्ध होत असल्याने कापूस उत्पादनातील अडचण दूर होऊन रोजगार निर्मिती होणार असल्याचे संजय खोडके म्हणाले. तसेच शासनाच्या नवीन बांबू धोरणांतर्गत ५० हजार कोटींची गुंतवणूक दहा वर्षासाठी करण्याचे शासनाचे धोरण आहे. यामधून राज्यभरात जवळपास ५ लाख रोजगार निर्मिती होणार आहे. राज्यात हे बांबू धोरण प्रभावीपणे राबविण्यास शेतकऱ्यांना पर्यावरण पूरक उत्पन्न घेणे शक्य होणार असून शेतकऱ्यांच्या कृषी उत्पन्नात वाढ होणार आहे. यातून हरित महाराष्ट्र - समृद्ध महाराष्ट्राची संकल्पना सुद्धा साकारली जात



आहे. मागील काळात शासनाने कृषी विकासासाठी नवनवीन धोरण तयार करून कृषी पीक लागवड, उत्पन्न वाढ, पूरक व्यवसाय व प्रशिक्षण व रोजगारक्षम उद्योग निर्माण केल्याने कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल होत असल्याने आ.संजय खोडके यांनी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन केले आहे.

## संक्षिप्त



### जि.प.शाळा वडूरा येथे शिक्षण परिषद

**खल्लार**-जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी शाळा, वडूरा येथे केंद्र चंडिकापूर आणि सांगवा (बु) च्या संयुक्त विद्यमाने शिक्षण परिषद नुकतीच पार पडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उर्दू शाळा चंडिकापूरचे मुख्याध्यापक शेख दाउद प्रमुख पाहुणे केंद्र शाळा सांगवा येथिल मुख्याध्यापक गणेश भातजोडे मुख्य मार्गदर्शक म्हणून दोन्ही केंद्राचे केंद्रप्रमुख अनिलकुमार वांगे उपस्थित होते.केंद्र प्रमुख अनिलकुमार वांगे उपस्थित सर्व शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक वृंद यांना शासन स्तरावरून निर्गमित होणाऱ्या विविध प्रकारच्या शासकीय परिपत्रकानुसार आपल्या शाळेमध्ये कार्यवाही करावी याबाबत माहिती देण्यात आली.मागिल शिक्षण परिषदेमधिल गुणवत्तेसंदर्भात आढावा घेण्यात आला.विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास, वर्ग पातळीवर केलेल्या अध्ययन निष्पत्ती आधारित नियोजनाचे प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे. सूलभकांनी सदर विषयानुसार अध्ययन निष्पत्ती निहाय मासिक नियोजन करण्यात यावे. शिक्षण परिषद यशस्वी करण्याकरिता जि.प. शाळा वडूरा च्या मुख्याध्यापिका श्रीमती वणमालाताई शेवतकर यांनी विशेष परिश्रम घेतले. अंगणवाडी सेविका मिना उंबरकर प्रधानमंत्री पोषण आहार सेविका सुलभा नांदणे प्रतिक्षा हरणे यांनी विशेष सहकार्य केले.कार्यक्रमाला केंद्राचे मुख्याध्यापक,शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक विजय मकेश्वर यांनी केले, तर आभार प्रदर्शन मनिषा लोणकर यांनी केले.

## ‘पेट शो’द्वारे मूक प्राण्यांसाठी संवेदनशीलतेची जागृती

# प्राणीप्रेमासह सामाजिक जबाबदारीचा संदेश; शाश्वत कॉन्सेप्ट स्कूलचा पुढाकार

**अमरावती/का.प्र.**

अमरावती शहरातील गजबजलेल्या आणि वेगवान जीवनशैलीमध्ये एक हृदयस्पर्शी आणि समाजाभिमुख उपक्रमाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. शाश्वत कॉन्सेप्ट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत आयोजित केलेल्या ‘पेट शो’ ने केवळ प्राणीप्रेमींची उपस्थितीच वाढवली नाही, तर समाजात मूक प्राण्यांबद्दल जागरूकता आणि जबाबदारीची भावना रुजवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. अमरावती महानगरपालिका क्षेत्रात पार पडलेल्या या कार्यक्रमाने बालनेतृत्वाची ताकद आणि सामाजिक जाणीवेचे उत्कृष्ट उदाहरण सादर केले.

हा कार्यक्रम केवळ शालेय उपक्रम न राहता शहरातील अनेक प्रमुख संस्थांच्या सहकार्याने एक व्यापक सामाजिक चळवळ ठरला. जीवन रक्षा संस्था, वासा प्राणि कल्याणकारी संस्था, जयदीप कैनल आणि पांडे डॉग सेंटर यांनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेत प्राणी कल्याणासाठी एकत्रित प्रयत्नांचे दर्शन घडवले.या संस्थांनी प्राण्यांच्या आरोग्य तपासणी, लसीकरण, आहार नियोजन आणि प्रशिक्षणाविषयी माहितीपर स्टॉल्स उभारले होते. अनेक नागरिकांनी आपल्या पाळीव प्राण्यांसाठी आवश्यक मार्गदर्शन घेतले.

कार्यक्रमात विविध जातींचे कुत्रे, मांजरी आणि इतर पाळीव प्राणी सहभागी झाले होते.‘बेस्ट ग्रूमिंग’, ‘मोस्ट ॲक्टिव्ह पेट’, ‘बेस्ट ट्रेनिंग रिस्पॉन्स’ अशा विविध स्पर्धांनी कार्यक्रमात रंगत आणली.

तरुण पाळीव प्राणीमालकांनी आपल्या प्राण्यांसोबत स्टेजवर आत्मविश्वासाने सादरीकरण केले. काही विद्यार्थ्यांनी आपल्या पाळीव



प्राण्यांबद्दल भावनिक अनुभव कथन केले, ज्यामुळे उपस्थित प्रेक्षक भारावून गेले. प्राण्यांशी असलेला जिव्हाळ्याचा आणि विश्वासाचा बंध सर्वांना स्पष्टपणे जाणवला.

**विजेत्यांची नाव-** १) दीपक सावे – उंट २) कैटिक वेखांदे – मांजर ३) मोहीनी चावंडे – मांजर ४) पटेल भाऊ – घोडा ५) श्रिम्मयी आणि आर्यन बॉंद्रे – ससे ६) वैशाली ठाकूर – पग ७) रोहन – चाऊ चाऊ ८) जयदीप सेराफ – जर्मन शेफर्ड (जोडी) ९) अरुण चापटे – गोल्डन रिट्रिव्हर १०) संचिता देशमुख – पग

विजेत्यांना सा फाउंडेशनतर्फे ट्रॉफी प्रदान करण्यात आल्या, तसेच सर्व सहभागींना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

**तज्ज्ञांचे मार्गदर्शन सत्र ठरले विशेष आकर्षण**

कार्यक्रमातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे तज्ज्ञांचे मार्गदर्शन सत्र. पशुवैद्यक आणि प्रशिक्षकांनी पाळीव प्राण्यांच्या लसीकरणाचे वेळापत्रक, स्वच्छतेचे नियम, संतुलित आहार, मानसिक आरोग्य आणि योग्य प्रशिक्षण पद्धती यांवर सविस्तर मार्गदर्शन केले.प्राण्यांवरील वाढत्या दुर्लक्ष आणि क्रूरतेच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर जबाबदार पाळीव प्राणीमालक होणे किती आवश्यक आहे, यावर विशेष भर देण्यात आला. ‘प्राणी हे कुटुंबातील सदस्यच असतात; त्यांच्या आरोग्य आणि सुरक्षेची जबाबदारी आपलीच आहे,’ असा संदेश तज्ज्ञांनी दिला.

**विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व आणि सहानुभूतीची जाणीव**

या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन, समन्वय आणि अंमलबजावणी विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली केली होती. नोंदणी प्रक्रिया, स्टेज व्यवस्थापन, अतिथी स्वागत, स्पर्धांचे नियोजन अशा विविध जबाबदाऱ्या विद्यार्थ्यांनी समर्थपणे सांभाळल्या.आयोजकांच्या मते, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संघभावना, व्यवस्थापन कौशल्य आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सहानुभूतीची भावना विकसित होते. बालपणीच सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण झाल्यास भविष्यात संवेदनशील आणि जागरूक नागरिक घडू शकतात, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाला शहरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अनेक पालक, प्राणीप्रेमी आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या नियोजनकौशल्याचे आणि प्राणीप्रेमाच्या भावनेचे सर्वांनी कौतुक केले.कार्यक्रमाच्या शेवटी विविध स्पर्धांतील विजेत्यांना ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. विजेत्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि इतर सहभागींचा उत्साह पाहण्यासारखा होता.

# शिरखेड समुह साधन केंद्राची शिक्षण परिषद

**लेहेगाव/वार्ताहर**

शिरखेड केंद्रांतर्गत केंद्रस्तरीय शिक्षण परिषद जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्रीय शाळा शिरखेड येथे शांत, आल्हाददायक आणि चिंतनशील वातावरणात यशस्वीरित्या झाली. मनिष काळे केंद्रप्रमुख, शिरखेड केंद्र यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या परिषदेने शिक्षकांमधील सुसंवाद, शैक्षणिक गुणवत्ता आणि संघटित कृतीची नवी दिशा अधोरेखित केली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय राजेश ठाकरे, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा नया वाठोडा हे होते. विशेष अतिथी म्हणून पंचायत समिती मोर्शी येथील शिक्षण विस्तार अधिकारी डी. सी. गायकवाड, तसेच संजय अंबाडकर, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा शिरखेड उपस्थित होते.या शिक्षण परिषदेचे प्रमुख उद्दिष्ट मागील परिषदेतील मुद्द्यांचा सखोल आढावा घेणे, शिक्षकांमधील सुसंवाद वृद्धिंगत करणे आणि शासनाच्या नव्या शैक्षणिक धोरणांचा परामर्श घेऊन त्यावर विधायक चर्चा करणे हे होते. विशेषतः इयत्ता चौथी व सातवी शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसंदर्भात सखोल मार्गदर्शन हा परिषदेचा केंद्रबिंदू ठरला.पहिल्या सत्रात शाळा व्यवस्थापन समितीच्या मासिक बैठका, शैक्षणिक आढावा व पालक सभांचे महत्त्व यावर मार्गदर्शन करण्यात आले.दुसऱ्या सत्रात ‘विद्यार्थी वैयक्तिक सुरक्षा आणि शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका’ या अत्यंत संवेदनशील विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.तिसऱ्या सत्रात संजय साबळे यांनी इयत्ता चौथी व सातवी शिष्यवृत्ती परीक्षेबाबत सखोल मार्गदर्शन केले. प्रश्नपत्रिकेचा कल, अभ्यासाचे नियोजन, विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे तंत्र याविषयी त्यांनी दिलेले विवेचन उपस्थित शिक्षकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरले.परिषदेमध्ये सुमारे ५० शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रभावी प्रास्ताविक केंद्रप्रमुख मनीष काळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिक्षक मनोहर दाभाडे यांनी केले. पुढील शिक्षण परिषदेचे यजमानपद जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा खोपडा या शाळेने स्वीकारल्याची घोषणा करण्यात आली.

# म.ज्योतिबा फुले महाविद्यालयात एक दिवसीय नेत्र चिकित्सा शिबीर

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर अंतर्गत दत्तक ग्राम परलाम या ठिकाणी एक दिवसीय नेत्र तपासणी शिबीर प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांचे मार्गदर्शनात नुकतेच झाले. या नेत्र तपासणी शिबिराचे उद्घाटक गावचे सरपंच रेखा गंगाधर मालठाणे, अध्यक्ष डॉ. सुशांत ठोके रासेयो कार्यक्रमाधिकारी, प्रमुख अतिथी डॉ. प्रणाली चांभारे, नेत्र चिकित्सक, डॉ. अनिल देशमुख,नेत्र पेढी तंत्रज्ञ हिमांशू बंड, नेत्र पेढी तंत्रज्ञ दिशा फाऊंडेशन अमरावती, हे व्यासपीठावर उपस्थित होते. या शिबिराचे आयोजन डॉ.स्वप्नील गावंडे दिशा फाऊंडेशन अमरावती यांच्या सौजन्याने करण्यात आले होते.



याप्रसंगी विद्यार्थ्यांना व गावकऱ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. प्रणाली चंभारे यांनी डोळ्याचे आरोग्य उत्तम ठेवणे या बद्दल उदबोधन करून आहाराविषयक उत्तम सवयी,डोळ्याचे व्यायाम,यासंबंधी मार्गदर्शन केले. कोणत्या वयापासून मोतीबिंदू आणि काचबिंदुची लक्षणे दिसतात आणि त्याची प्राथमिक ओळख कशी पटवावी,कोणत्या दक्षता घ्याव्यात ई.चे प्रतिपादन केले. अनिल देशमुख यांनी नेत्र दानाचे मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित केले.नेत्र दान करून दोन दृष्टिहीन व्यक्तीला दृष्टि दान करण्याचे महत कार्य करण्याचे आवाहन त्यांनी या प्रसंगी केले.हिमांशू बंड यांनी नेत्र दान करण्याबाबतची पद्धती उपस्थितांना समजावून सांगितली.या नेत्र तपासणी शिबीरात एकूण १३६ रुग्णांची तपासणी करण्यात आली. शिबिरासाठी डॉ स्वप्नील गावंडे दिशा फाऊंडेशन अमरावती यांनी केलेल्या सहकार्य बद्दल प्रा.डॉ. सुशांत ठोके यांनी आभार मानले.

या नेत्र चिकित्सा शिबिरासाठी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक यांनी अथक परिश्रम घेतले. या शिबिरात परलाम ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

# राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त प्रश्नमंजूषा

**अंजनगाव बारी** - न्यु एज्युकेशन सोसायटी संचालित गांधी विद्यालय, बडनेरा येथे ‘राष्ट्रीय विज्ञान दिना’निमित्त वर्ग ५ ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान विषयाची प्रश्नमंजुषा स्पर्धा उत्साहात पार पडली.यावेळी महान भारतीय वैज्ञानिक सी. व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या वंदना टिक्कस होत्या. तसेच पर्यवेक्षक दिगंबर करडे, प्रमुख अवघड यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगील चौधरी, दारोकार, काळे उपस्थित होते. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून ज्येष्ठ शिक्षिका खंडारे, भैसने, सरोदे व देशमुख यांनी काम पाहिले. संचालन ठाकूर यांनी



प्रभावीपणे केले. प्रश्नमंजुषेची जबाबदारी उके, घाटे, देऊळकर, चिंचोळकर, कोल्हे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

# भिक्खू संघाला भोजनदान; तथागतांच्या प्रतिमेस वंदन

**अमरावती** - अचलपूर तालुक्यातील भुगांव येथे नानासाहेब धुळे यांच्या निवासस्थानी भिक्खू संघासाठी भोजनदानाचे आयोजन करण्यात आले. धार्मिक व सामाजिक सलोख्याचे दर्शन घडविणाऱ्या या कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून वंदन करण्यात आले.या प्रसंगी अनाथ पिंडक बुद्ध विहाराचे अध्यक्ष बुद्धघोष महाथेरो, प्रभात एज्युकेशन सोसायटी अमरावतीचे संस्थापक अध्यक्ष वि. दा. पवार, आकाशवाणी केंद्र अमरावतीचे स्तंभलेखक व स्वाभिमानी श्रमिक



पत्रकार अमरावती जिल्हा सचिव संजय वाघुळे, तसेच अमरावती जिल्हा अध्यक्ष संजय सरवटकर उपस्थित होते.

सर्व मान्यवरांनी बुद्धांच्या प्रतिमेस अभिवादन करत सामाजिक ऐक्य, करुणा आणि बंधुतेचा संदेश दिला.कार्यक्रमादरम्यान भिक्खू संघाला आदरपूर्वक भोजनदान करण्यात आले. उपस्थितांनी बुद्धांच्या शिकवणीतील शील, समाधी आणि प्रज्ञा या तत्त्वांचे महत्त्व अधोरेखित करत समाजात शांतता व सद्भावना वाढविण्याचे आवाहन केले.भोजनदानाच्या या उपक्रमामुळे परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून आयोजक नानासाहेब धुळे यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# विश्वमांगल्य छात्र सभामध्ये ‘शक्ती संवाद २०२६-भारतीय अभिव्यक्ती की खोज’

**अमरावती/का.प्र.**

विश्वमांगल्य छात्र सभा तर्फे ‘शक्ती संवाद २०२६-भारतीय अभिव्यक्ती की खोज’ या एक दिवसीय परिषदेचे आयोजन श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात झाले. संपुर्ण विदर्भातील विविध महाविद्यालयांमधून एकूण ३२० विद्यार्थिनींचा सहभाग परिषदेकरिता होता. या परिषदेच्या उद्घाटन सत्राला विश्वमांगल्य छात्रसभा अखिल भारतीय संरक्षक तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारणी सदस्य हेमंत काळमेघ, २०१९ च्या मिसेस इंडिया युनिव्हर्स रूपल मोहता, विश्वमांगल्य सभा विदर्भ प्रांत संरक्षक अंजली देव, विश्वमांगल्य छात्रसभा अखिल भारतीय



संयोजिका श्रुती देशपांडे, विश्वमांगल्य छात्रसभा विदर्भ प्रांत अध्यक्ष डॉ. स्मिता देशमुख या मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन तथा प्रतिमा पुजन करून कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. यावेळी बोलताना हेमंत काळमेघ यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले तसेच विश्वमांगल्य छात्र सभेचे कार्य संपुर्ण देशात अधिक वृद्धिंगत होवो अशा शुभेच्छा देत, विद्यार्थ्यांना कार्य करण्यास प्रोत्साहन दिले. उद्घाटनानंतर झालेल्या दुसऱ्या सत्रात ‘युवतींच्या जीवनात भारतीयतेचे चिंतन’ या विषयावर श्रुती देशपांडे यांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. युवतींच्या माध्यमातून येणाऱ्या पन्नास वर्षात कोणते भारतीय विमर्श (इंडीयन नॅरेटीव्ह) स्थापित केले पाहिजे यावर या सत्रात चिंतन झाले. तसेच सांस्कृतिक नेतृत्व करणाऱ्या युवतींची गरज आज समाजाला आहे हे त्यांनी प्रतिपादित केले. तिसऱ्या सत्रात ‘गर्ल्स पार्लमेंट’ हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या सत्रात विद्यार्थिनींनी भारतीय संस्कृती, कुटुंबव्यवस्था, निसर्गसंवर्धन, भारतातील प्रेरणादायी कथा तसेच सामाजिक जबाबदारी यावर आपले स्पष्ट व अभ्यासपूर्ण विचार मांडले. विद्यार्थिनींच्या प्रभावी सादरीकरणामुळे सत्रात सशक्त संवाद घडून आला. कार्यक्रमाच्या समारोपीय सत्रासाठी बियाणी महाविद्यालयाच्या प्राध्यापिका प्राची अग्रवाल उपस्थित होत्या. युवतींची संसद तसेच मागील दोन आठवड्यांत आयोजित करण्यात आलेल्या ‘रीलोत्सव’ उपक्रमाचे बक्षीस वितरण या सत्रात करण्यात आले. या उपक्रमातून भारतीय संस्कृती, कुटुंबसंस्था व जीवनमूल्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

विद्यार्थिनींमध्ये भारतीय अभिव्यक्ति चा विकास, संस्कृती व मूल्यसंवर्धन करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. संवादात्मक व सहभागात्मक पद्धतीने राबविण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थिनींना भारतीय परंपरांमागील वैज्ञानिक, तात्त्विक व सामाजिक दृष्टिकोन समजून घेण्याची संधी मिळाली. वंदे मातरम ने परिषदेची सांगता झाली.

## रामविलास मुंदडा हायस्कूलचे विद्यार्थी स्कॉलरशिप परीक्षेत उत्तीर्ण

**काटपुर** - मोर्शी तालुक्यातील रामविलास मुंदडा हायस्कूल उदखेड येथील इयत्ता आठवीतील विद्यार्थी भूमिका नरेश जवंजाळ व क्रिष्णा गजानन लोणारकर वर्ग आठवी मधील विद्यार्थी एन.एम. एम. एस. स्कॉलरशिप परीक्षा २०२५ मध्ये उत्तीर्ण झाले. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई - वडील मुख्याध्यापक व वर्गशिक्षक तसेच मार्गदर्शक अक्षय यावले तसेच सीमा गांधी, प्राजक्ता वाटाणे, अतुल पचारे, नंदलाल डागा,उषा शहाणे, पूजा ठाकरे, राज ठाकरे यांना दिले आहे.

GHARKUL Masale
पाहिजेत
ब्रॅंडेड अगरबत्ती घरोघरी विक्रीकरिता महिला व पुरुष पाहिजे.
: संपर्क :
घरकुल मसाले फॅक्टरी,
एमआयडीसी. अमरावती

# अंजनगाव पेपर फुटीचे प्रकरण
# गटशिक्षणाधिकाऱ्याच्या पोलीस कोठडीत वाढ

## चार मार्चपर्यंत पोलीस कस्टडी

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी येथील कस्टडी रूम मधील दहावीच्या इंग्रजी विषयाच्या उत्तरपत्रिका चोरीला गेल्याच्या खळबळजनक प्रकरणाने संपूर्ण शिक्षण क्षेत्र हादरले आहे. या प्रकरणाचा 'मास्टरमाइंड' प्रभारी शिक्षण विस्तार अधिकारी सुशील अभ्यंकर असल्याचे समोर आले असले, तरी आता या कटाच्या मुळाशी असलेल्या 'आक्का' नावाच्या संशयास्पद पात्राभोवती चर्चेचे मोहोळ उठले आहे. खोडे या बड्या अधिकाऱ्यांच्या अटकेनंतर आता खऱ्या सूत्रधारापर्यंत पोलीस पोहोचणार का, असा प्रश्न जनसामान्यातून उपस्थित केला जात आहे.



**काय आहे 'आका' कनेक्शन?-**

अंजनगावच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात सध्या एका 'आक्का' नावाच्या व्यक्तीची दबक्या आवाजात जोरदार चर्चा सुरू आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या पेपर चोरीच्या कटाचे धागेदोरे केवळ दोन उत्तरपत्रिकांपुरते मर्यादित नसून, त्यामागे एक मोठे रॅकेट असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या 'आका'च्या वरदहस्तामुळेच इतक्या धाडसाने परीक्षा केंद्रावरून पेपर बाहेर काढण्याचे धाडस अधिकाऱ्यांनी केले का? अशी शंका आता उपस्थित होत आहे. जर पोलिसांनी निष्पक्ष तपास केला, तर या 'आका'चे काळाबाजार उघड होऊन अनेक बड्या धेंडांचे पितळ उघडे पडू शकते.

**राजकीय दबाव?**

दुसरीकडे, या प्रकरणात अडकलेले अधिकारी हे वजनदार असल्याने आणि त्यांचे धागेदोरे थेट राजकीय नेत्यांशी जोडलेले असल्याने, 'चौकशीचे घोडे पाण्यात न्हाणार' अशी भीती व्यक्त केली जात आहे. पोलीस तपासाची दिशा भरकटवण्यासाठी आणि 'आका' सारख्या प्रभारी शिक्षण विस्तार अधिका-याला वाचवण्या (पान २ वर)

### धक्कादायक खुलासे

१ मार्च रोजी पहाटे गटशिक्षणाधिकारी सुधीर खोडे यांना अटक करण्यात आली. भरारी पथकाने जेव्हा अचानक छापा टाकला, तेव्हा ४४३ पैकी ४४२ च उत्तरपत्रिका मिळून आल्या होत्या. गहाळ झालेली एक उत्तरपत्रिका आणि बाहेर लिहून आणली जाणारी दुसरी उत्तरपत्रिका, असा हा संपूर्ण काळाबाजार उपशिक्षणाधिकारी रजनी शिरभाते यांच्या सतर्कतेमुळे उघड झाला. एकीकडे सुधीर खोडे यांना आदर्श शिक्षक आणि अधिकारी पुरस्काराने गौरवण्यात आले होते, तर दुसरीकडे अशाच जबाबदार पदावरील व्यक्तीने हा गलिच्छ प्रकार केल्याने संताप व्यक्त होत आहे. आता एसडीपीओ मनीष ठाकरे आणि ठाणेदार सूरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या तपासात 'आका नावाचे गूढ उकलणार की हे प्रकरण नेहमीप्रमाणे दडपले जाणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

## रेतीघाटावरील सिमावादातून रक्तरंजित शेवट
# भाजप शहर महामंत्री भारत नागपाल यांची हत्या





**वर्धा । हिंगणघाट ।** होळीच्या उंबरठ्यावर जिल्ह्याच्या सीमेवरील नदीपात्र रक्ताने लाल झाले. हिंगणघाट (जि. वर्धा) आणि वरोरा (जि. चंद्रपूर) यांच्या सीमेलगत असलेल्या बांबर्डा–ढिवरी पिपरी रेती घाटावर रविवारी (१ मार्च) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास सिमावादातून पेटलेल्या वादाने थेट रक्तरंजित रूप घेतले. पुलगाव येथील भाजपचे शहर महामंत्री भारत नागपाल (वय ३८) यांच्यावर तलवार, फर्सा व इतर धारदार शस्त्रांनी सपासप वार करून निर्घृण हत्या करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, घाटाच्या ठेक्यावरून आणि आर्थिक व्यवहारांवरून दोन्ही गटांमध्ये मागील काही दिवसांपासून तणाव सुरू होता. रविवारी आरोपी गट घाटावर पोहोचताच पोकलँड मशीन रस्त्यात आडवी उभी करून नागपाल यांच्या वाहनांचा मार्ग अडविण्यात आल्याचा आरोप आहे. शाब्दिक वादानंतर अचानक हल्ला चढविण्यात आला. नागपाल यांच्यावर वारांचा मारा करण्यात आला. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र डॉक्टरांनी (पान २ वर)

# मध्यरात्री भरधाव कारची दुचाकीला भीषण धडक
## दोन तरुण जागीच ठार; न्यू हनुमान नगरात शोककळा




**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील बेफाम वेगाने पुन्हा दोन निष्पाप जीव घेतले. विलास नगर मार्गावरील नॅशनल मार्केटिंगसमोर मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेने न्यू हनुमान नगर परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (दि.१) रात्री सुमारे १२.३० वाजता अभिषेक बाळासाहेब महल्ले (वय २२, रा. न्यू हनुमान नगर, व्ही.एम.व्ही. कॉलेज मागे) आणि श्रीकृष्ण उर्फ जग्गू उर्फ जगदीश देवगडे (वय ३४, रा. न्यू हनुमान नगर) हे दुचाकीने विलास नगरकडून जुन्या कॉटन मार्केटच्या दिशेने जात होते. त्याचवेळी समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या कारने त्यांच्या दुचाकीला जबर धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दुचाकीचे अक्षरशः तुकडे झाले. दोन्ही तरुण गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळले आणि घटनास्थळीच त्यांचा मृत्यू झाला. अपघाताचा मोठा आवाज ऐकताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. सुरुवातीला गाडगे नगर पोलीस स्टेशन चे पथक दाखल झाले. मात्र अपघाताचे ठिकाण सिटी कोतवाली पोलीस स्टेशन अमरावती हद्दीत येत असल्याने पुढील (पान २ वर)

# धारणीत ह्युमन मिल्क बँक, अमरावतीत आयटी पार्कसाठी वेग

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील दुर्गम असणाऱ्या धारणी येथे ह्युमन मिल्क बँक आणि अमरावतीमध्ये आयटी पार्क स्थापन करण्यासाठी प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे आज खासदार डॉ. अनिल बोंडे आणि जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जिल्ह्यातील विकासकामांचा आढावा घेतला.

यावेळी उपवनसंरक्षक अर्जुना के. आर., निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, उपजिल्हाधिकारी महसूल विवेक जाधव, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार उपस्थित होते.



खासदार डॉ. बोंडे यांनी जिल्ह्यातील विविध विषयांवर चर्चा केली. यात प्रामुख्याने मेळघाटातील कुपोषण निर्मूलनासाठी धारणी येथे 'ह्युमन मिल्क बँक' स्थापित करण्यात यावी. या योजनेची उपयोगिता मेळघाटात सर्वाधिक आहे. डफरीन येथील ह्युमन मिल्क बँकेचे उत्तम परिणाम मिळत आहे. त्याच धर्तीवर ह्युमन मिल्क बँक कार्यान्वित करताना तपासणी, साठवणूक, स्वच्छता घटकांवर लक्ष केंद्रित करण्यात यावे.

जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात वन विभागाच्या जमिनीवर 'वड उद्यान' निर्माण करण्यात यावे. शहरात आयटी क्षेत्राला चालना देण्यासाठी एमआयडीसीमध्ये जागा आरक्षित करण्यात (पान २ वर)

# बोगस प्रमाणपत्र सादर करून पॅरोलवर गेले कैदी
## अमरावती मध्यवर्ती कारागृहातील १५ कैद्यांवर गुन्हे

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिक्षा भोगत असताना 'अभिवचन रजा' (पॅरोल) मिळवण्यासाठी बनावट वैद्यकीय प्रमाणपत्रांचा आधार घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. अमरावती मध्यवर्ती कारागृह प्रशासनाने छाननीदरम्यान १५ कैद्यांचा बोगसगिरीचा कारनामा पकडला असून, संबंधितांविरुद्ध फ्रेजरपुरा पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कारागृह वर्तुळात या घटनेने मोठी खळबळ उडाली आहे.



मध्यवर्ती कारागृहातील काही कैद्यांनी आई-वडील, भाऊ-बहीण किंवा मुलं गंभीर आजारी असल्याचे कारण पुढे करत पॅरोलसाठी अर्ज केले. अर्जांसोबत विविध खासगी डॉक्टर व रुग्णालयांची वैद्यकीय प्रमाणपत्रे जोडण्यात आली होती. मात्र कागदपत्रांची प्राथमिक छाननी करताना प्रशासनाला प्रमाणपत्रांतील स्वाक्षऱ्या, शिक्के आणि आजारांचे तपशील संशयास्पद वाटले. त्यानंतर सर्व कागदपत्रे पडताळणीसाठी जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, अमरावती येथे पाठवण्यात आली. जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाने सखोल चौकशी केली असता सादर करण्यात आलेली सर्व प्रमाणपत्रे बनावट असल्याचे स्पष्ट झाले. काही ठिकाणी डॉक्टरांच्या (पान २ वर)

# जिल्ह्यात महाराजस्व शिबीरात ९५ मंडळात कार्यक्रम
## -महसूल सेवा आता थेट जनतेच्या दारी

**अमरावती/प्रतिनिधीः-** सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांच्या महसूल विभागाशी संबंधित तक्रारींचे निराकरण करण्यासाठी राज्य शासनाकडून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचा पहिला टप्पा राबविण्यात येणार आहे. पाच टप्प्यात प्रत्येक महसूल मंडळात एक कार्यक्रम याप्रमाणे ९५ कार्यक्रम घेण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.


महाराजस्व अभियान मार्च ते मे या कालावधीत महसूल मंडळ आणि नगर परिषद, नगर पंचायत स्तरावर राबविले जाणार आहे. या अभियानात महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. या शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना एकाच दिवसात सेवा देण्यात येणार आहे. यात प्रलंबित आणि विवादग्रस्त फेरफार प्रकरणांचा तात्काळ निपटारा करणे, सातबारामधील चुका दुरुस्त करणे आणि डिजिटल सातबारा व आठ अ उतारे उपलब्ध करून देणे, उत्पन्न, रहिवासी, जात आणि नॉन-क्रीमीलेअर यांसारखी महत्त्वाची प्रमाणपत्रे वितरीत करणे, अकृषिक परवानगीबाबत नवीन सुलभ तरतुदी, सनद प्रणाली रद्द झाल्याचे फायदे आणि सुधारीत तुकडेबंदी कायद्याची माहिती नागरिकांना दिली जाणार आहे.



अभियानाची सुरवात ७ मार्च रोजी होणार आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत वलगाव येथे या अभियानाची सुरवात होणार आहे. ७ मार्च रोजी १८, १४ मार्च रोजी १७, १० एप्रिल रोजी १८, १७ एप्रिल रोजी (पान २ वर)

# रस्त्याची मागणी मान्य न झाल्यामुळे युवकाचे 'शोले स्टाईल' आंदोलन

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील शिवर धामोडी हिंगणी या गावातील मुख्य रस्त्याच्या दुरुस्ती व डांबरीकरणाच्या मागणीसाठी युवकाने आज (दि.२) शोले स्टाईल आंदोलन छेडले. अनेक वेळा निवेदन देऊनही प्रशासनाकडून ठोस निर्णय न झाल्याने संतप्त ग्रामस्थांसह रोहन डिक्कर या युवकाने 'शोले स्टाईल' आंदोलन करित महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या पाण्याच्या टाकीवर चढून घोषणाबाजी केली.



गेल्या अनेक वर्षांपासून रस्त्याची अत्यंत दयनिय अवस्था असून पावसाळ्यात चिखल तर उन्हाळ्यात धुळीचे साम्राज्य असते. शालेय विद्यार्थी, रुग्णवाहिका व शेतकरी यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. वारंवार तक्रारी करूनही कामास मंजुरी मिळत नसल्याने हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागला, असे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

घटनेची माहिती मिळताच प्रशासनातील अधिकारी व पोलीस घटनास्थळी दाखल झाले. परिस्थिती चिघळू नये म्हणून लोकप्रतिनिधींनीही मध्यस्थी (पान २ वर)

# मेळघाटात १० मोबाईल टॉवरला मंजुरी
## जिल्हा सनियंत्रण समितीची मान्यता

**अमरावती/प्रतिनिधीः-** मेळघाटातील मोबाईल नेटवर्क सेवा सुधारण्यासाठी जिल्हा संनियंत्रण समितीने १० मोबाईल टॉवरच्या कामाला मंजुरी दिली आहे. यात ९ बीएसएनएल आणि एक ऑप्टीक फायबरच्या टॉवरचा समावेश आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने हा निर्णय घेतला आहे.जिल्हाधिकारी कार्यालयात आज मेळघाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्राचे संनियंत्रण समितीची सभा पार पडली. यावेळी परतवाड्याचे विभागीय वन अधिकारी अनंता दिघोळे उपस्थित होते.



मेळघाटातील दहा बीएसएनएलच्या टॉवरला राष्ट्रीय वन्यजीव मंडळाने मंजुरी दिली आहे. मात्र प्रत्यक्ष काम सुरू करण्यासाठी जिल्हा संनियंत्रण समितीची मंजुरी आवश्यक असते. त्यानुसार मेहरीआम, बिच्छुखेडा, खोकमार, घाणा, खामदा, धोकडा, मारीता, खंडुखेडा, भुत्रुम आणि चौराकुंड ते चोपन, रंगुबेली ते धोकडा, रूईपठार ते भुत्रुम येथे भुमिगत ऑप्टीकल फायबर टाकण्यासाठी मान्यता देण्यात आली.जिल्हा सनियंत्रण समितीच्या मान्यतेमुळे बीएसएनएलच्या मोबाईल टॉवरचे काम सुरू होणार आहे. यामुळे नेटवर्कींगमध्ये गती येणार असून मोबाईलची सेवा जलद गतीने आणि विनाव्यत्यय होण्यास मदत मिळणार आहे. यासोबतच वनक्षेत्रात करण्यात येणारे जलसंधारण तसेच इतर कामांनाही मंजुरी देण्यात आली.

# जिल्हाधिकारी कार्यालयात 'मराठी भाषा गौरव दिन' उत्साहात साजरा




**अमरावती/प्रतिनिधीः-** ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवनात उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे आणि प्रमुख वक्ते अविनाश दुधे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. सुरज मडावी, अधिक्षक निलेश खटके आणि विधी अधिकारी नरेंद्र बोहरा प्रमुख उपस्थित होते.

यावेळी प्रमुख वक्ते दुधे यांनी मराठी भाषेच्या समृद्ध वारशावर प्रकाश टाकला. त्यांनी मराठीला दोन हजार वर्षांहून अधिक काळाचा गौरवशाली इतिहास असल्याने (पान २ वर)

# एसटी ची सवलत बंद होणार असल्याची अधिकृत माहिती नाही-आशिष बाहुलकर



**खल्लार/प्रतिनिधीः-** प्रवाशी वर्ग व विशेषतः महिलांना एस. टी. सवलत बंद होणार असल्याची माहिती सध्या सोशल मिडीयावर व्हायरल होत आहे.एस. टी. ची सवलत बंद होणार असल्याची कोणतीही अधिकृत माहिती अद्यापपर्यंत प्राप्त झाली नसल्याची माहिती दर्यापूर आगाराचे आगार व्यवस्थापक आशिष बाहुलकर यांनी दिली असून गर्दी वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन दर्यापूरात आणखी चार ठिकाणी नोंदणीकरण शाखा लवकरच सुरु होण्याची प्रक्रिया सुरु असून त्या सुरु झाल्यावर तिथेही नोंदणीकरण करता येईल. नोंदणीकरण शांततेने करुन घ्यावे असे आवाहन नागरिकांना आगार व्यवस्थापक आशिष बाहुलकर यांनी केले आहे.

# महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवरील हातभट्टीवर कारवाई
## ४.४८ लाखांचा मुद्देमाल जागीच नष्ट

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र–मध्यप्रदेश सीमेवरील घनदाट जंगलात सुरू असलेल्या अवैध गावठी हातभट्टी दारू निर्मितीवर पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ४ लाख ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल जागीच नष्ट केला. ब्राम्हणवाडा थडी पोलिस व मध्यप्रदेशातील आठनेर पोलिसांच्या संयुक्त पथकाने ही धडक कारवाई केली.

गोपनीय माहितीनुसार, हिरादेही, सोनोरा आणि येनखेडी परिसरातील नदीकाठी मोठ्या प्रमाणात मोहफुलांपासून हातभट्टी दारू तयार केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून वरिष्ठांच्या आदेशानुसार सोमवारी पहाटे जंगलात सापळा रचत छापा टाकण्यात आला.

कारवाईदरम्यान २०० लिटर क्षमतेच्या तब्बल २२ ड्रममध्ये साठवलेले ४,४०० लिटर मोहफुल सडवा (अंदाजे किंमत ४,४०,००० रुपये) आढळून आला. यासोबतच सुमारे ८,००० रुपयांचे दारू निर्मिती साहित्यही जप्त करण्यात आले. एकूण ४,४८,००० रुपयांचा मुद्देमाल घटनास्थळीच नष्ट करण्यात आला.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही मोहीम विशाल आनंद (पोलीस अधीक्षक), पंकज कुमावत (अपर पोलीस अधीक्षक), शुभम कुमार (सहायक (पान २ वर)

# अमृत पेठ-२०२६ उद्योजक मेळाव्याला ६ मार्चपासून सुरवात

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक उद्योजकांना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आणि ग्राहकांना थेट उत्पादकांकडून खरेदीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) तर्फे 'अमृत पेठ २०२६' या उद्योजक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा दिनांक ६ ते ८ मार्च २०२६ या कालावधीत शहरांतील जाधव पॅलेस येथे संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमाला 'अमृत' पुणे येथील व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी, सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर, अमृतचे विभागीय व्यवस्थापक प्रवीण कोळेश्वर उपस्थित राहणार आहे. स्थानिक नवउद्योजक, महिला बचत गट आणि स्टार्टअप्स यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

अमरावतीकरांनी आपल्या कुटुंबासह या मेळाव्याला भेट द्यावी. या मेळाव्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला बळ मिळेल. हा मेळावा महिला उद्योजकांसाठी आपली कौशल्ये आणि उत्पादने प्रदर्शित करण्याची संधी निर्माण करणार आहे. उत्पादक आणि ग्राहक यांच्यातील थेट संपर्कामुळे स्थानिक उद्योगांना नवी गती प्राप्त होईल. या प्रदर्शनाबाबत अधिक माहितीसाठी ९५२७३१७०६८ किंवा ७२४९४५११५२ या क्रमांकावर संपर्क साधवा, असे आवाहन करण्यात आले आहे.